# प्रभुतरुण दिवाळी अंक २०१९

## अंतरंग


संपादकीय ........ ४

गोडव्याचे बेट (व्यक्तीचित्रण) - सुहासिनी कीर्तिकर ........ ५

चुटपूट (कथा) - डॉ. सुमन नवलकर ........ ८

रामागडी (व्यक्तीचित्रण) - दीपक माधव धैर्यवान ........ ११

Essay-My Hobbies (बालविभाग) - ईवा निमिष धैर्यवान ........ १४

व्रत (कथा) - उज्ज्वला ब्रह्मांडकर ........ १५

**चिंतनिका**

नलिनी तळपदे ........ २१

Modern/Modified Vanaprastha (लेख) - रश्मी वेलकर ........ २२

चलो थायलंड-बँकॉक-पटाया (प्रवासवर्णन) - अपर्णा कीर्तिकर ........ २५

Switzerland- Heaven on Earth & Picturesoue Europe (प्रवासवर्णन) - नूतन जयंत कीर्तिकर .. २९

औषधे तारक की मारक (लेख) - रसिक विजयकर ........ ३४

अनुभव पत्र (चिंतनिका) - मिलिंद कोठारे ........ ३५

वसुधा (कथा) - हेमंत तळपदे ........ ३६

नाव असतं, नसतं (पान उलटताना) - डॉ. सुमन नवलकर ........ ४१

नीतिमत्ता (भवताल) - प्रणिता प्रभाकर ........ ४२

The Veracious Velkars of Good OL' Mumbai (व्यक्तीचित्रण) - डॉ. रायकर ........ ४४

कडू बदाम (कथा) - कै. शालिनी शामराव कोठारे ........ ४६

अनुवाद संवाद - कल्पना कोठारे ........ ५०

नटखट 'ट' (कथा) - अनामिक ........ ५५

**कविता**

सुहासिनी कीर्तिकर, उज्ज्वल ब्रह्मांडकर, हेमंत तळपदे, स्वागता विजयकर

**वात्रटिका**

डॉ. सुमन नवलकर

**जरा हसा**

(संकलक:) सुहासिनी कीर्तिकर


**मुखपृष्ठ : सौ. जान्हवी नील कीर्तिकर**

भाऊबीज, देणगी, परीक्षेतील सुयश, अभिनंदन इत्यादी

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

**दिवाळी अंक**

**मूल्य रुपये दहा**

**( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )**

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

कार्यकारी संपादक मंडळ:
**मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

सहाय्यक संपादक:
**त्वरिता दळवी, भक्ती शेटये, राजेश नवलकर**

**www.prabhutarun.com**

**वर्ष ५३ वे)** **ऑक्टोबर २०१९** **(अंक ५**


# संपादकीय

वाचक मित्रहो,

दिवाळी अंक ही केवळ महाराष्ट्राचीच (मराठीचीच) सांस्कृतिक ठेव आहे. हा ठेवा जपण्याचा आनंद दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 'प्रभुतरुणाने' लुटला आहे. मात्र दिवसेंदिवस जाणवणाऱ्या वाढत्या महागाईची, इतर प्रश्नांची झळ त्यालाही लागली आहे. म्हणूनच या दिवाळी अंकाची पृष्ठसंख्या आटोपशीर आहे. (नाही तरी सडपातळ रहाण्याची धडपड आपण करतोच ना?.... हे उगाच गंमतीत बरे का!) पृष्ठसंख्या नेमकी असली तरी दरवर्षीप्रमाणे याही अंकात लेखनाची समृद्धी आणि विविधता आहे. कथा, कविता, चुटके, वात्रटिका, चिंतनिका, प्रवासवर्णन, व्यक्तीचित्रण याचबरोबर वैचारिक लेखही आहेत. अन् हो! सौ. जान्हवीच्या कुंचल्यातून उतरलेले सुंदर मुखपृष्ठ आहे.

'कीर्तिरूपे उरावे' या रामदासांच्या वचनाची आठवण व्हावी अशी घटना म्हणजे पद्मश्री सदाशिव गोरक्षकर यांच्या नावे महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेला 'जीवन गौरव पुरस्कार'. त्याबद्दल शासनाचे अभिनंदन. शासन राखत असलेली कृतज्ञता प्रभुतरुणही राखतो. म्हणूनच कै. शालिनी कोठारे यांची पारितोषिकप्राप्त कथा या अंकात समाविष्ट आहे. अश्या 'नेटका सडपातळू' असलेल्या प्रभुतरुणाला चित्रकार, लेखक, कवी, जाहिरातदार, देणगीदार, हितचिंतक यांनी 'ठकारे पर्वताऐसा' केले आहे. त्याबद्दल मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करते.

ही दिवाळी आणि नूतन वर्ष तुम्हा सर्वांना अत्यंत आनंदाचे, समृद्धीचे, समाधानाचे जावो!

**-सुहासिनी कीर्तिकर**

## व्यक्तीचित्रण

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# गोडव्याचे बेट

### ✶ सुहासिनी कीर्तिकर ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

१९६३-६४ची गोष्ट. इस्माइल युसुफ महाविद्यालयाची मी बी.ए.ला असलेली विद्यार्थिनी. विषय - मराठी, संस्कृत. मराठी शिकवायला त्याआधी आम्हाला धोंडसर (म.वा. धोंड) होते. विजया राजाध्यक्ष होत्या. सरकारी कॉलेज असल्याने ही दोघे पुढे बदली होऊन एलफिन्स्टन महाविद्यालयात गेली. सरोजिनी शेंडे होत्याच. पण आता बदली कोण येणार?- आम्हाला उत्सुकता होती. विजयाबाईंच्या जागी आठवड्या, दोन आठवड्यांनी अमरावतीहून वैद्यसर आले. (शंकर वैद्य) आम्हाला आधीच्या शिक्षकांचा लळा असल्याने कोणत्याही सबळ कारणाविना वैद्यसरांशी आम्ही 'पंगा' घेतला. त्यांच्या तासाला आम्ही बसतच नव्हतो. आठ दिवस झाले, पंधरा दिवस झाले. ते वर्गात यायचे, परत जायचे. मग त्यांनी युक्ती केली. नोटीसबोर्डवर बी.ए.मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी ट्युटोरियल म्हणून काही विषय दिले. ते त्यांना न दिल्यास कारवाईची भाषा होती. मग करता काय? आम्ही आमच्या वह्या विषयांनी भरल्या, कॉमनरुममध्ये कुणीतरी एकीने जाऊन दिल्या. आठ दिवसांनी त्या मुलीलाच गाठून त्यांनी सांगीतले की त्या वह्या घ्यायला वर्गात या. जावेच लागले. त्यांनी एकेकाकडे रोखून पाहात, अजमावत (त्यांची नावं लक्षात ठेवत) वह्या परत केल्या. मला त्या ट्युटोरिअलमध्ये दहापैकी आठ गुण होते! संदर्भ वाचनासाठी त्यांनी अधिकच्या पुस्तकांची यादी दिली. पु. शि. रेगेंच्या कविता त्यांच्या हाताशी होत्या. त्यावर ते बोलले. त्यांचे बोलणे, अभ्यास, विद्यार्थ्यांना आपले मानणे यातून मग आमच्या 'कट्टी'ची आपोआप 'बट्टी' झाली. नंतर आमचे वर्ग सुरळीत सुरू झाले. त्यांचं शिकवणं, त्यांचा शिक्षकधर्म, त्यांची साहित्यजाण हे आमच्यासाठी लोहचुंबक ठरलं नंतर. याच वर्षांत त्यांचा 'आला क्षण... गेला क्षण' कथासंग्रह प्रसिद्ध झाला. गम्मत पहा! ते कवी, समीक्षक, शिक्षक म्हणूनच जास्त प्रसिद्ध आहेत. पण त्यांचे पहिलं पुस्तक आहे; कथासंग्रह. ज्याची मोजकीच; पण योग्य दखल घेतली गेली. 'मनोहर' मधील आपल्या लेखात विद्याधर पुंडलिकांनी गाडगीळोत्तर काळातील कथांमध्ये 'भिंत' कथेचा आवर्जून उल्लेख केला. दि. बा. मोकाशींना वैद्यांच्या कथेतील विषय कांदबरीचा वाटे. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी 'भिंत' वाचून 'तुझी कथा वाचली. भिंत माझ्या छातीवर पडली' अशी प्रतिक्रिया दिली. या संग्रहात 'भिंत' बरोबर 'पंडितरत्न', 'बंडुदेव' अशा इतरही ताकदीच्या कथा आहेत. माणसाचं मन, नियती आणि आयुष्य पेलताना येणाऱ्या हालचालींचं, वागणुकीचं नाट्य या कथांच्या केंद्रस्थानी आहे. गंमत म्हणजे या कथांतील पात्रांची नावं आम्ही वैद्य सरांना बहाल केली होती. 'पंडितरत्न' नावाचा 'फिशपॉण्ड'मध्ये फिशही दिला होता! हातातील तपकिरीच्या डबीवर बोटांचा ताल धरून वैद्यसर मिश्कील हसले होते तेव्हा. (पुढे सरांशी घसट वाढल्यावर त्यांनी सांगीतलं होतं की ते एक व्यसन करतात, पूर्णपणे सोडतात; दुसरं करतात! आधी ते सतत सिगरेट ओढायचे म्हणे! ती सोडली तर पान खायचा छंद जडला. पान जमवून गप्पा तर आमचे धोंडसरही जमवायचे. पान खाणं कदाचित विदर्भातून आले असेल. पान सुटले आणि तपकीर आली.)

कथा त्यांनी तितक्याच लिहिल्या. पुढे 'हा हंडा आहे' सारखी 'सत्यकथेतून' आलेली कथा किंवा 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये प्रकाशित झालेली 'विलास' नावाची कथा या अपवादात्मकच.

ते अधिक रमले ते कवी म्हणून, समीक्षक

म्हणून. चांगला कथाकार वा चांगला कवी हा चांगला समीक्षक असतोच असं नाही. पण वैद्यसरांची समीक्षा त्यांच्या कथाकवितांच्या तोलामोलाची आहे. त्याकाळी सत्यकथेतून त्यांचा कुसुमाग्रजांच्या कवितेतील नाट्य, विरोधाभास, शब्दकळा दाखवणारा फार छान लेख आला होता. ज्ञानेश्वरांपासून सुर्वे, ढसाळांपर्यंत ते कवितेचा आस्वादात्मक, चिकीत्सात्मक वेध घेत राहिले सतत. पुढे त्यांनी 'रसयात्री' बनून कुसुमाग्रजांची कविता संपादित केली. कवी मनमोहनांच्या कवितेतील 'आदित्य' पाहिला. 'प्रवासी पक्षी' संपादित केले. संपादनातील त्यांची दीर्घ प्रस्तावना आस्वाद आणि चिकित्सा यांचे सुंदर रसायन आहे. कवीच्या मूळ बीजाचा शोध त्यांना आस्वादक म्हणून घ्यावा वाटायचा. म्हणूनच 'नाविका मी सदैव फिरतो सात नभाखाली' म्हणणारे कुसुमाग्रज त्यांना प्रवासी वाटायचे. केशवसुत सदैव धरेवर नंदनवन निर्माण करण्याची धडपड करणारे जाणवायचे. बालकवींना सतत स्थिती-गती वेधत रहाते असे त्यांना भान यायचे. गती असणारा झरा बालकवींना जेथे दिसतो तेथे त्यांच्या कवितेतून आनंद ओसंडतो आणि स्थिती असलेला त्याचा डोह झाला की उदासीनता कवितेत झिरपत जाते; असा काव्यास्वादातून त्यांना 'प्रवाहो' जाणवे. त्याबद्दल वर्गात ते यासंबंधी आमच्याशी बोलत. आम्ही तर अशा विधानांमुळे चकीतच व्हायचो. सौंदर्य, कला, कलानुभव यांचे नाते नीट समजून घेण्यासाठी आम्ही एम.ए.ला असताना ते इस्माईलच्या बागेत सौंदर्यशास्त्रावर (मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रीय विवेचनावर) आठवड्यातून एकदा अशी अनौपचारिक चर्चा घडवायचे. या चर्चांना कधी 'चं. प्र.' (ते तेव्हा त्याच महाविद्यालयात विद्यार्थी होते.), कधी इंग्लिश घेतलेला प्रभाकर गाडगीळ, इंग्रजीच्या प्राध्यापिका लीला साळगावकर, क्वचित्, इंग्रजीच्याच रॉयमॅडम उपस्थित असायच्या. मजा यायची. बी. ए. ला असताना प्राचार्य होते पु. शि. रेगे. (नंतर तेही एलफिन्स्टनला गेले.) कधी कधी तेही सामील व्हायचे. पण फक्त ऐकायचे ते. आम्हाला ते मंतरलेले दिवसच भासायचे.

'निषाद'मधून 'लावण्याच्या वेली' या सदरातून त्यांनी गोविंदाग्रज, मर्ढेकर, मनमोहनांवर दीर्घ लेख लिहिले ते याच काळाच्या आगेमागे. मी एम. ए. झाल्यावर लगेचच एलफिन्स्टन कॉलेजला प्राध्यापक म्हणून लागले. नंतर इस्माईलला माझी बदली झाली. तेव्हा वैद्यसरच माझे विभाग प्रमुख. प्राध्यापकांच्या विश्रांतीखोलीत अटीतटीने आम्ही बुद्धीबळ खेळत असू तेव्हा. एकेक खेळी ते कवितेतील शब्द चाचपल्यासारखी बराच वेळ घेऊन खेळायचे; पुन्हा रडीचा डाव खेळल्यासारखे खेळी मागे घ्यायचे. मी परीक्षेसाठी काढलेले प्रश्न बारकाईने पहायचे (कधीतरी हसत हसत 'पुन्हा चूक केलीस तर पायावर छडी मारेन' म्हणायचे.) एखादी कविता सुचत असेल वा केली असेल तर शब्दाशब्दासाठी सोसलेले हाल सांगायचे. 'शतकांच्या यज्ञातून उठली एक केशरी ज्वाला

दहा दिशांच्या हृदयामधुनी अरुणोदय झाला' या लता मंगेशकरांच्या आवाजात सुरकेशराने रंगलेल्या कवितेची अशीच दर्दभरी जन्मकहाणी त्यांनी मला सांगीतली होती. यातल्या 'यज्ञ' संकल्पनेतून 'केशरी ज्वाला' शब्दाने त्यांना अख्खी रात्र जागवलं होतं. मग 'केशरी' विशेषणाच्या अन्वयाची त्यांनी माझ्यासमोर किमान तासभर चर्चा केल्याचं स्मरतेय. विषाद वाटतो की सातत्याने तीन दशके कविता लिहीणाऱ्या या कवीचे दोनच कवितासंग्रह आलेत. एक 'कालस्वर' आणि नंतर 'दर्शन'. 'दर्शन'तर त्यांच्या वयाच्या सत्तरीत आला! खरं तर गीते, कविता, काही कणिका त्यांनी लिहिल्या. पण 'स्वरगंगेच्या काठावरती' हे अरुण दातेंच्या आवाजातले गीत, 'पालखीत कोण आता पुसायाचे नाही' हे वाडकरांच्या गळ्यातून झिरपलेले गीत फक्त आपल्या कानांवर आले. मी त्यांच्याबरोबर प्राध्यापकी करत असताना त्यांनी एकदा माझ्यासमोरच गीत रचले होते.

'जेवढे पंगुत्व माझे तेवढे माझे रहावे
जे सामर्थ्य माझे ते तुझ्या साह्यास यावे
अंतरीच्या वेदनांना ठाऊका नाही किनारा
गोडव्याचे बेट आहे त्यात ते तुझे असावे'...

या त्यातील ओळी मला लख्ख आठवताहेत कारण 'अंतरीच्या वेदनांना किनाराच ठाऊक नसणे' या कल्पनेनेच मी गुंगून गेले होते. (पुढे हे गीत कुठे प्रसिद्ध झाले का?.... आठवत नाही!) शब्दांचा नाद, लय, अचूक बांधणी याबद्दल ते फारच दक्ष असत. 'केली रतीला आजला मी मस्तकाखाली उशी

गारेप्रमाणे टाकिला मी आज खावोनी शशी' या त्यांच्या ओळी याच प्रकारातल्या. पण गीतेच नव्हे फक्त; त्यांनी मुक्त कविताही दिल्यात. 'एक खाष्ट म्हातारा काळोखासारखा भरून माळ्यावर आपला असतो पडलेला' असे काळरूपी माणसाचे चित्रण त्यांनी केलेय. त्यांच्या कवितांत रम्य अद्भूताचा स्पर्शही जाणवतो. 'दर्शन' मधल्या अनेक कविता स्वप्नातील जाणीवांवर, चित्रांवर उभ्या आहेत. 'मी उठून पहाता रात्री ती नव्हती शय्येवरती' किंवा 'मज दिसली दिसली.

उभी उंच सरस्वती' - ही स्वप्नातील चित्रे आहेत. अशी स्वप्ने त्यांना खरोखरीच पडत. त्यांना काष्ठशिल्प, चित्रकलाही अवगत होती. त्यांच्या घराच्या दरवाज्यामागे भिंतीवर त्यांनी रेखाटलेले रंगचित्र होते. मी त्याची वाखाणणी करताच म्हणाले होते - 'द. ग. गोडसे यांनाही हे आवडलेय.' त्यांच्या घरी गेल्यावर ते आम्हाला जवळपास असलेल्या रस्त्यावरून, बागेतून हिंडवत. 'ते फूल पहा कसे, मुलीच्या कानात कर्णफूल असावेसे.' 'ल' अक्षर कसे?; तर सागरगोटे खेळणाऱ्या मुलीच्या फतकल घातलेल्या मांडीसारखे', 'तुला उंच उडी मारून ते पान काढता येईल? आज खिडकीत मी अर्धा बटाटा कापून ठेवलाय. त्यात खोचता येईल.'.... अशा त्यांच्या गप्पा असत.

'विश्वी पावलोंपावली
बीजे जन्मांची सांडली
पाय पाय टाकताना
त्यांची फुले उमलली' असा तो सगुण-निर्गुण अनुभव असे.

त्यांनी पुढे तीन, चार ओळींच्या 'मुनिया'ही लिहिल्या. 'तू दोऱ्यात झेंडुची फुले ओवीत होतीस. फुले ओवता ओवता सगळा दोरा केशरी होत गेला...

तुझ्या माझ्या संबंधात मला इतकेच सांगायचे आहे' ही मुनिया तर वैद्यसर आणि मी विद्यार्थिनी या संबंधावरचीही असावी! निवृत्त झाल्यावर त्यांनी 'इस्मैलचे दिवस' म्हणून 'ललित' मधून लेख लिहिला होता. माझे 'इस्मैलचे दिवस' वैद्यसरांच्या छायेखाली बहरलेले होते.

ते शेवटपर्यंत तसेच राहिले. विद्यापीठात शिकविण्याचा माझा विषय ते मला विचारीत. त्यावर भराभरा मुद्दे सांगत. असे ते आदर्श शिक्षक. माझ्या यजमानांच्या शेवटच्या दुखण्यात सरांचा न चुकता एक दिवसाआड फोन असायचा. इतर गप्पांसाठी! केवळ मला विरंगुळा मिळावा म्हणून. यजमानांना इस्पितळात दाखल केल्यावर मी तेथेच अडकलेली. तर माझ्या घरी फोन करून ते सांगायचे, 'तिला सांगा-माझा फोन आल्याचं'. (तेव्हा मोबाईल नव्हते.) 'तिचे चित्त पिलापाशी' अशी ही अवस्था. साहित्य संघातलं माझं काम, माझी भाषणे, माझं लेखन, माझं घर, माझ्या मुली... या सगळ्या सगळ्यांवर 'माझं लक्ष आहे बरं का.' असं म्हणून त्यांनी अखेरपर्यंत पाखर घातली. कुठल्याशा समारंभात मंचावर आम्ही एकत्र होतो. दुसऱ्या दिवशी फोनवर म्हणाले, 'माझ्यापेक्षा तुझं भाषण छान झालं. खोटं नाही हं'... अन् मग ते त्यांचं परिचित हसणं. (त्यांचं अक्षरही त्यांच्या मनोधर्मासारखंच देखणं होतं) सिद्धी असूनही तितकी प्रसिद्धी न लाभलेल्या या कवीने बालगीतेही लिहिली. ती त्यांनी माझ्या मुलींसाठी आवर्जून पाठवली होती. त्यातली 'बिंदुमाधव' ही अनुस्वाराची गंमत दाखवणारी कविता आठवतेय. अनुस्वार कसा? तर - इंद्राच्या बसे मस्तकी! तो तर त्यांच्या नावातील 'शंकर' वरतीही बसलाय. ते त्या कवितेत विचार करतात 'तो नसता तर?' मग म्हणतात, 'तो नसता तर मम नावाची शक्कर केवळ उरली असती!'

त्यांच्यातील कवीमुद्रेची, व्याख्यात्याची, समीक्षकाची, शिक्षकाची 'शक्कर' ते गेल्यावरही पुरून उरली आहे. त्यांच्या कवितेतीलच शब्दांचा आधार घेऊन बोलायचे तर आज ते आठवणीतही 'गोडव्याचे बेट' आहेत. कलाकार म्हणून बाबासाहेब पुरंदरेंच्या लग्नातील मंगलाष्टका रचल्याचे ते सांगत. मंगेश पाडगावकरांच्या शेवटच्या पुस्तक प्रकाशनावेळी रवीन्द्र नाट्य मंदिरात सगळे जमलेले असताना पाडगावकर म्हणाले की 'ही माझी अखेरची कवितेची वही' त्यावर तत्क्षणी वैद्यसर म्हणाले, 'अखेरची वही, भाग १.' म्हणजे दुसरा भाग येणार, कविता झरतच राहणार. असा हा शंकर नावाचा माणूस! म्हणूनच त्यांच्या सहवासाने माझेही 'इस्मैलचे दिवस' मंतरलेले राहिले कायम. ते माझ्यातून कधीच 'डिलीट' होणार नाहीत. आनंदाने मनापासून जगण्यासाठी असे 'वैद्य' राज हवेतच!

*

**कथा**

# चुटपूट

**✶ डॉ. सुमन नवलकर ✶**

''आजी, आज आमचे विज्ञानाचे पेपर मिळाले. मला पन्नासापैकी सेहेचाळीस मिळाले आजी. पहा ना, खरं तर मला सत्तेचाळीस मिळायला हवे होते. एक गाळलेला शब्द बरोबर होता माझा. पण बाईंनी चुकून चूक दिलाय. त्यामुळे एक मार्क कमी झालाना माझा.''

''अरे, पण मग तू बाईकडे गेला का नाहीस? वाढवून का नाही घेतलास तो तुझा चुकून कापलेला मार्क?''

''अगं, बाईंजवळ खूप गर्दी जमली होती. त्यात आणखी मी कुठे जाऊ?''

''पण आता चुटपूट लागून राहिलीय तिचं कायं?''

''अगं चुटपूट तर लागणारच ना? एकेका मार्कानं नंबर किती खाली जातो ते माहितीय ना? शिवाय नंबराचं जाऊ दे. पण बरोबर असलेला गाळलेला शब्द चूक दिला म्हणजे वाईट वाटणारच ना?'' बोलताना मीतचा चेहरा हिरमुसला.

''आज नाही तर नाही, पण उद्या तरी दाखव तुझा पेपर बाईंना. आणि वाढवून घे तो मार्क. नाहीतर ही चुटपुट कायम लागून राहील मनाला.'' एका मार्कासाठी आजी दुसऱ्या दिवशी बाईकडे जायला सांगतेय हे ऐकून मीत चकितच झाला. नाहीतर 'जाऊ दे रे'', हे आजीचं आवडतं वाक्य.

धाकट्या जीतने मीतची सायकल जोरात चालवून भिंतीवर आपटली, तरी आजी म्हणणार, ''जाऊ दे रे; मोठा भाऊ आहेस ना त्याचा?''

जीतच्या चार चापट्या खाल्ल्यावर जीतने त्याच्यावर हात उगारला तरी आजी म्हणणार, ''जाऊ दे रे; लहान आहे ना तो?''

''जीतच्या आधी उठूनही मीतला आधी आंघोळीला जायला नाही मिळालं, तरी आजी म्हणणार, ''जाऊ दे रे; तुला आरामात मिळेल बघ आंघोळ करायला.''

दोन कॅपस्पैकी कोणती जीतला हवी असेल ती दिल्यावर उरलेली मीतला देताना बाबाही म्हणणार, ''जाऊ दे रे; पुढल्या वेळी तुला देईन आधी निवडायला. बस्स?'' दोन पेन्सिली असोत, दोन पेनं असोत, दोन कंपासपेट्या असोत, दोन वेगवेगळच्या चित्रांच्या वह्या असोत. आईसुद्धा पहिली निवड जीतला देणार आणि मीतला म्हणणार, ''जाऊ दे रे.'' त्यामुळे ''उद्या जा आणि मार्क वाढवून घे'' असं आजीने म्हटल्यावर चकितच झाला मीत.

''आजी, 'तू आज जाऊ दे रे' असं नाही म्हणालीस?'' त्याने आजीला विचारलंही. मग आजी म्हणाली, ''ही चुटपूट फार वाईट असते मीत. ती आयुष्यभर आपला पाठलाग करते. माझ्या बाबतीतही अशीच चुटपुट लावणारी गोष्ट घडली बघ.''

'गोष्ट' शब्द ऐकल्यावर जीतपण धावत आला. म्हणाला, ''सांग ना आजी ती गोष्ट'' दोघे आजीच्या समोर बसलेच. मग आजीने केलीच सुरुवात सांगायला.

''मी ना रे तुमच्याएवढीच लहान होते बघ.'' आजीच्या पहिल्याच वाक्याला जीतला शंका आली, ''माझ्याएवढी की मीतएवढी? कोणाएवढी होतीस आजी?''

''हे बघ, अधे-मधे प्रश्न नाही विचारायचे. नाहीतर काय सांगत होते ते विसरायलाच होतं बघ.'' आजीने पुढे गोष्ट सांगायला सुरुवात केली.

''तर आमच्या कॉलनीत गणेशोत्सव असायचा. रोज रात्री करमणुकीचे कार्यक्रम असायचे. नाटकं, नाच, गाणी आणि रविवारी सकाळी वेगवेगळ्या

स्पर्धा असायच्या. पळायची, लंगडीची, संगीत-खुर्ची, चमचा-लिंबू, पीठ पैसा.''

'चमचा-लिंबू आणि पीठ-पैसा या कसल्या शर्यती गं आजी?'' यावेळी मीतलाच शंका आली. शर्यत कसली आहे हे कळल्याशिवाय गोष्ट ऐकायला मजा तरी कशी येणार?

''अरे, चमचा-लिंबू म्हणजे चमचा तोंडात पकडायचा. चमच्यात लिंबू ठेवायचं. एक-दोन-तीन म्हटलं की धावत सुटायचं. समोरच्या रेषेपर्यंत जो आधी पोहोचेल तो जिंकला. अट एकच, की लिंबू चमच्यातून पडता कामा नये. आणि पीठ-पैसा म्हणजे एका ताटलीत नाणं ठेवून त्यावर बचकाभर पीठ टाकून ठेवायचं. एक-दोन-तीन म्हटलं की मुलं समोरून पळत पळत येणार. बशीतलं किंवा ताटलीतलं पीठ फुंक-फुंक फुंकणार. पिठाखालचं नाणं दिसलं की ते लगेच तोंडात पकडणार आणि पळत परत आपल्या जागेवर येणार. अट एकच, की पिठाला किंवा नाण्याला हात लावायचा नाही.''

''बाप रे! किती भयंकर स्पर्धा आजी! पीठ सगळं तोंडावर उडत असेल ना?'' जीतला पुन्हा शंका आली. ''आणि तोंडातही जात असेल ना गं पीठ?''

''तर रे! तोंडातच नव्हे, तर नाकात, डोळ्यांत, केसात सगळीकडे पीठच-पीठ! मग स्पर्धा झाल्यावर झाडायचं ते पीठ, सुकं-सुकंच. लगेच पाणी नाही लावायचं. नाहीतर सगळं तोंड चिकट. मग शेवटी जाऊन चूळ भरायचे.''

''परवा त्या मोनाच्या वाढदिवसाला तिच्या तोंडालाच केक फासला. तसंच नै आजी?'' मीतच्या या प्रश्नावर आजी म्हणाली, ''अरे, केक किती चविष्ट. तोंडावर पोहोचेल तिकडे जीभ तरी फिरवता येईल. पीठ तोंडात गेलं तर त्याला ना चव ना ढव.''

'ढव म्हणजे काय गं आजी?'' या जीतच्या प्रश्नावर मात्र आजी म्हणाली, ''प्रश्न शेवटी. तर त्या पीठ-पैसा शर्यतीत मी भाग घेतला होता. 'एक-दोन-तीन' म्हटल्यावर धावत जाऊन फू-फू-फू-फू करत जोरजोरात पीठ फुंकलं. खालचा पैसा पटकन तोंडात पकडला. धावत परत आले. पाहते तो काय? बाकी सगळे अजूनही पीठ फुंकत होते. मी चक्क पहिली आले होते.' सांगता-सांगता आजीचे डोळे चमकले. आत्ताच स्पर्धा जिंकून आल्यासारखे.

''आम्ही लहान मुलं स्पर्धेत भाग घ्यायचो. त्यावेळी कॉलेजमध्ये असलेली मुलं बश्या मोडणं, त्यात नाणी ठेवणं, वर पीठ टाकणं, स्पर्धकांची नाव लिहून घेणं, जिंकलेल्या मुलांची नावं लिहून ठेवणं अशी जबाबदारीची कामं करायची. तर झालं असं की आम्हा पहिल्या आलेल्या तीन मुलांची नावं त्यापैकी एका मोठ्या मुलाने लिहून घेतली. कॉलनीत बहुतेक सगळ्यांची नावं सगळ्यांना ठाऊक असायची. त्या मोठ्या मुलाने आमची नावं लिहून घेतल्यावर आम्ही पीठ झाडायच्या कामाला लागलो. बक्षिससमारंभ गणेशोत्सवाच्या शेवटच्या दिवशी असायचा. गणपती विसर्जन करून झाल्यावर रात्री मोठ्या समारंभात बक्षिसं मिळायची.

मी खूप खुशीत होते. घरी आल्यावर आई-बाबांना सांगितलंही मला पहिलं बक्षिस मिळालं म्हणून. माझे दोघे भाऊ, म्हणजे तुमचे अमर आजोबा आणि सागर आजोबाही खूश झाले. शेवटच्या दिवशी बक्षिस समारंभाच्या वेळी आईने मला नवा फ्रॉक घालायला दिला. स्टेजवर बक्षिस घ्यायला जायचं म्हणजे नवा फ्रॉक हवाच ना? भाषणं, अहवालवाचन असं सगळं झाल्यावर बक्षिससमारंभ सुरू झाला. लंगडी, धावी, चमचा लिंबू अशी एकेका स्पर्धेची बक्षीसं जाहीर होता होता पीठ-पैसा शर्यतीचं नाव घेतलं. मी सरसावून बसले. आता आपलं नाव घेतलं की जायचं बक्षीस घ्यायचं. अध्यक्षांना नमस्कार करायचा. प्रेक्षकांकडे पाहूनही नमस्कार करायचा. बक्षिस काय असेल बरं?

पण माझं नाव न घेता वाचणाऱ्याने भलत्याच मुलीचं नाव घेतलं. 'मीना'. आमचं दोघंचं आडनाव एकच होतं. पण माझं 'सीमा' नाव घेण्याऐवजी त्याने तिचं नाव घेतलं. ती माझ्या जवळच बसली होती. ती काही उठण्याच्या तयारीत नव्हती. करण तिला बक्षीस मिळालेलंच नव्हतं. पण मग तिच्या आजूबाजूला बसलेल्या तिच्या मैत्रिणी तिला म्हणायला लागल्या, 'जा जागं. एवढं बक्षिस मिळतंय तर घे ना.' तिने जरासे आढेवेढे घेतले. इकडे तो स्टेजवरला माणूस पुन्हा-पुन्हा तिचं नाव घेत होता. मग काय? उठली ती. गेली सरळ आणि घेऊन आली बक्षिस. मी हे सगळं पाहत होते. मग हुशारी दाखवून गेले असते स्टेजवर आणि सांगितलं असतं की बक्षिस मला मिळालंय म्हणून, तर मिळालं असतं ना माझं बक्षिस मला.''

बक्षिस घेऊन ती पुन्हा तिच्या जागेवर येऊन

बसली. बक्षिसावरचा कागद उघडला. आत गोष्टीचं पुस्तक होतं. खरं तर माझं होतं ते. पण होतं तिच्या हातात. असे तर आमचे आई-बाबा आम्हाला खूप गोष्टींची पुस्तक घेऊन द्यायचे. कपाटभर गोष्टींची पुस्तक होती आमच्याकडे. पण बक्षीस ते बक्षीस ना रे?'' बोलता-बोलता आजीचा आवाज भरून आला. डोळेही भरून आल्यासारखे वाटले. म्हणाली, ''तेव्हा दहा वर्षांची असेन मी. आणि आता पासष्ट वर्षांची आहे. म्हणजे पंचाव्वन वर्ष झाली त्या गोष्टीला. पण अजून जसंच्या तसं आठवतं सगळं मला. घरी आले. आई बाबांना सांगितलं सगळं आणि रडलेही. बक्षिस मिळणार म्हणून नवा हिरवा फ्रॉक घालून गेले होते आणि रिकाम्या हातांनी परत आले.''

''तेव्हा माझे आईबाबा काही बोलले नाहीत मला. बोलून उपयोगच नव्हता. बक्षीस समारंभ तर होऊन गेला होता. पण चुटपुट अजून वाटतेय; इतक्या वर्षांनी म्हणून सांगतेय तुला मीत, उद्या पेपर घेऊन जा. आणि तुझा तो कापला गेलेला मार्क वाढवून आण. हक्कच आहे तो तुझा. परीक्षा तर तीनमाहीच आहे. गुण नाही मिळाला, तरी काही फार मोठं बिघडणार नाहीये. पण चुटपुट कायम राहते आणि पुन्हा-पुन्हा त्रास देत राहते!''

जीत आणि मीत गप्प झाले होते. गोष्ट ऐकताना खूप-खूप प्रश्न विचारायचं ठरवत होते. पण आता तर एकदेखील प्रश्न आठवत नव्हता. पीठ फुंकून-फुंकून आजीने मिळवलेल्या, पण तरीही आजीला मिळू न शकलेल्या बक्षिसाची रुखरुख आजीबरोबर आज नातवांनीही अनुभवली होती.

रात्री वेळापत्रकाप्रमाणे पुस्तकंवह्या बॅगेत भरताना मीतने आठवणीने विज्ञानाची ती उत्तर-पत्रिका बॅगेत ठेवली, 'उद्या आठवणीने हा गुण वाढवून घ्यायचा' असं पक्कं ठरवून. एकदा का गुण वाढवायचं मनाशी ठरवलं; मग चटकन झोपही लागली त्याला आज. आजीचंही मन थोडं हलकं झालं होतं. नातवांना बक्षिसाची गोष्ट सांगितल्यावर चुटपूट खूप कमी झाली होती. पण तरीही झोपेत ते मीनाला मिळालेलं गोष्टीचं पुस्तक आलंच आजीच्या स्वप्नात.

*


WITH BEST COMPLIMENTS FROM:

# SWIFT ENGG. CO.

**MANAFACTARERS OF PRESSURE DIE-CAST COMPONENTS IN ALUMINIUM / ZINC ALLOYS**

**PRODUCT RANGE : COOKWARE ITEMS, MIXER COMPONENTS, LIGHTING FIXTURES ETC.**

**MR. JAGDISH G. KIRTIKAR,**
**MR. NEEL J. KIRTIKAR**
4 GANGA, TUNGARESHWAR INDL. COMPLEX,
SATIVALI, VASAI (E.). PIN CODE 401208
TEL NO. 02502481043
EMAIL : nee1kirtikar21@gmai1.com

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# रामागडी

**✶ दीपक माधव धैर्यवान ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

आपल्याकडे पूर्वापार एकत्र कुटुंबपद्धतीच होती. अशा ह्या कुटुंबातील सर्व सदस्य म्हणजे अगदी पणजी-पणजोबांपासून ते लहान बाळांपर्यंत जसे आपण एकत्र रहात आलो; त्याचप्रमाणे त्यात आणखी एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे आपल्या घरातील 'रामागडी'.

रामागडी ही एक व्यक्ती नसून ती एक वेगळी संस्थाच म्हणता येईल. ह्या संस्थेचे सदस्य हे फार पूर्वीपासून आपल्या दैनंदिन आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग. त्या काळी रामागडी नसलेल्या घराची मी तरी कल्पनाच करू शकत नाही. घर म्हटलं की रामा आलाच. केवळ तो एकटाच नाही तर त्याच्याबरोबर मग पुढे त्याची बायको व मुलेदेखील आपल्या सर्वांच्या घरात अगदी आनंदाने, समाधानाने व महत्त्वाचे म्हणजे आपलेपणाने नांदत आले आहेत.

रामा ही व्यक्ती म्हणजे एक अजब रसायन. घरातील पडेल ती सर्व कामं तर ती करतच होती; पण त्याबरोबरीने पार पाडीत असलेली दुसरी कर्तव्येदेखील विनातक्रार करत आली आहेत. तक्रार कसली म्हणा! आपलेपणाच इतका नैसर्गिक असायचा आणि आजही असतो की कोणत्याही कामाला नाही म्हणणं हे जणू त्यांच्या रक्तातच नसायचं! हे घर म्हणजे 'माझंही घरच आणि घरातील सर्व लहानथोर कुटुंबीय म्हणजे माझे नातलगच, ही भावना त्यांना संपूर्ण कुटुंबाशी अगदी एकरस करून टाकायची. आमच्या लहानपणापासून आमचा हात धरून, आमचे शाळेचे दप्तर खांद्यावर टाकून तो नित्यनेमाने आम्हाला शाळेत न्यायला व परत घरी आणायला अगदी तत्पर असायचा. किंबहुना आमची व त्याची ही पहिली ओळख व त्यातूनच पुढे वृद्धिंगत झालेली त्याची व आमची नुसती मैत्रीच नव्हे; तर वेगळीच जवळीक ही एक भावनाच निर्माण होऊन आम्ही एकमेकांशी इतके मिळून मिसळून जायचो की त्याची जाणीव व्हायच्या आतच आमचे भावबंध घट्ट बांधले जायचे आणि तेही चिरकाल टिकणारे! आमच्या नवीवाडीतील घरात तर आम्ही अन् आमचे तीन काका ह्यांचे काही काळ वेगवेगळे रामागडी असायचे. पण त्यांच्यात कधीही भेदभाव मात्र नसायचा. कोणी कोणाचंही काम अगदी सहजपणे करायचे.

रामागडी ह्या व्यक्तीची अनेक उदाहरणे आहेत. पण त्यातील काही प्रातिनिधीक; पण बोलकी उदाहरणे मी येथे नमूद करतो.

आमच्या आईचे माहेरी आणि मामांकडे त्या काळी पांडू, लक्ष्मण व गणू असे तीन गडी होते. आमची मावशी फणसवाडीत राहायची. माझे व माझ्या बहिणीचे त्यांचे घरी नेहमीच जाणे येणे असायचे. नेहमी आईला आमच्या सोबत येणे शक्य नसायचे. मावशीकडे गेल्यानंतर रात्री जेवल्याशिवाय मावशी व नाना (म्हणजे तिचे पती) आम्हा दोघांना कधीच घरी पाठवत नसत. सांगायचा मुद्दा म्हणजे रात्री जेवल्यानंतर आम्हाला आमचे घरी सोडायला हा पांडू आमच्या बरोबर अगदी सावलीसारखा सोबत करायचा व आम्ही घरात गेल्यानंतरच माघारी फिरायचा आणि हे सर्व अगदी हसतमुखाने. लक्ष्मण आणि गणू तर आमची आई सासरी येऊन किती वर्ष झाली; आम्ही दोघं लहानाचे मोठे होत आलो तरी त्यांच्या गावाला ते जाऊन आल्यानंतर गावची भेट म्हणून नारळ, वरी, कोकम, वेगवेगळी भाकरीची पिठं अशा अनेक वस्तू भेट म्हणून आवर्जून आणायचे. त्या दोघांमधला फरक म्हणजे लक्ष्मण निर्व्यसनी होता. पण गणूला चिलीम ओढायची सवय होती. 'काय लिलीबाय कशी हाव?'' ह्या त्याच्या ठरलेल्या वाक्याबरोबर तंबाखूचा

तो उग्र दर्प आजही माझ्या नाकात अगदी ठाय मांडून बसलेला आहे. चिलीम म्हणजे काय, ती का ओढतात आदी आम्हाला पडत असलेले प्रश्न व आमचे त्याबद्दलचे कुतूहल हा एक वेगळाच विषय. त्याचे निराकरण करण्याची सोय त्याकाळी नव्हती; हे वेगळे सांगायला नकोच. महत्त्वाचे म्हणजे ह्या तिघांची आमची आई, मावशी, बायमावशी व मामाप्रती असलेली आपुलकी व भक्ती ह्यांचे शब्दांत वर्णन करणे केवळ अशक्य. त्यांच्या मनाची ती पारदर्शकता व अंत:करणपूर्वक असलेली आत्मीयता समजून घेणे त्या वयात तर सोडाच; पण आजही समजून घेणे केवळ अशक्य!

दुसरे उदाहरण म्हणजे आमच्या मावशीकडे (मीना (कस्तूर) विष्णू कोठारे) राजाराम नावाची व्यक्ती काम करू लागली. इतकी हसतमुख व व्यवस्थित वागणूक असलेली व्यक्ती बोलबोलता तिच्या कुटुंबातील एक महत्त्वाचा घटक बनली. आमच्या भावोजींनी (श्री. विष्णू कोठारे) त्याला एका कंपनीत चांगली नोकरी मिळवून दिली. परंतु ही नोकरी करत असतानादेखील राजारामने मावशीच्या घरातील सर्व कामे करण्यात कोणतीही उणीव ठेवली नाही. इतकेच नाही तर; आमच्या मावशी व तिच्या भावोजींच्या भाऊ बहिणी, भाचे अशा सर्वांशी त्याचे भावबंध इतके जुळले की तो त्या कुटुंबाचा एक अविभाज्य घटक बनला. महत्त्वाचे म्हणजे आमच्या भावोजींच्या निधनानंतर राजारामने आमच्या मावशीची ज्याप्रकारे सर्वतोपरी सेवा केली की आम्ही सर्व कौतुकमिश्रीत अचंबित झालो. मावशीच्या निधनानंतर केवळ नाइलाजाने त्याला नवीन बिऱ्हाड थाटावे लागले. मावशी गेल्यानंतरही त्याने आमच्या आईशी, आमच्या सर्वांशी आणि आमच्या मावशीच्या व आईच्या इतर नातेवाईकांशीदेखील आपलेपणाने संबंध जपले. आमच्या आईच्या निवर्तण्यानंतरही आजपर्यंत राजाराम आमचे घरी त्याची पत्नी सुनंदासोबत नित्यनेमाने येत असतो. त्याच्या दोन मुलींची लग्न होऊन आता तो जावई व नातवंडांतही रमला आहे. परंतु त्याच्या आपलेपणाच्या वागणूकीत जराही फरक पडलेला नाही. गावावरून आल्यानंतर तो व सुनंदा आमचेकडे गावची भेट म्हणून कडवेवाल, कोकम अशा अनेक वस्तू आवर्जून घेऊन येतात. आम्हीही त्या दोघांना व त्यांच्या मुली, जावई, नातवंडांना सन्मानाची व आपुलकीची वागणूक देतो व त्यामुळेच आमच्यातील हे रेशमीबंध दिवसेंदिवस अधिकच घट्ट विणले जाताहेत.

तिसरे उदाहरण म्हणजे आमच्या सासुरवाडीत वर्षानुवर्षे सेवेत असलेला शंकर! आमचे श्वशूर श्री. पुष्पराज नवलकर व सासूबाई कमलिनी (बालगो) ह्यांचा तर तो उजवा हात व भक्कम आधार. आपल्या पाठारे प्रभु ज्ञातीचे पारंपारिक अन्नपदार्थ; जसे भुजणे, खडखडले, कोलंबीचे कालवण, आटले, भानवले, मुंबरे असे अनेक प्रकार करण्यात तो तरबेज होता. माझ्या पत्नीला (नीलनला) बेबी अशी हाक मारत असताना त्याचे ते प्रेम, आपुलकी अगदी प्रकर्षाने जाणवत असे.

ह्या रामागड्यांची पुढील तरुण पिढी शिकून सवरून कालांतराने नोकरी व्यवसायाला लागली व मग हळूहळू ह्या रामागड्यांच्या पत्नींनी त्यांची ही पुढे सेवा सुरू करण्यास सुरुवात केली. आज अनेक कुटुंबात ह्या बायकाच अधिक प्रमाणात आढळतात. त्यांनी देखील रामागड्यांनी जपलेली वर्षानुवर्षांची आपलेपणाची, प्रेमाची व आदराची भावना अगदी व्यवस्थित सांभाळलेली आहे. किंबहुना ती अधिकच वृद्धिंगत ठेवली आहे.

रामागड्यांच्या बायकांचे एक बोलणे उदाहरण आमच्या घरात आहे. तिचं नाव मीना. ही मीना आमचेकडे काम करू लागली तेव्हा ती शाळेत होती. आज तिच्या मुलाचे व मुलीचे लग्न होऊन ती आजी झाली आहे व तिची नात शाळेत चौथी इयत्तेत शिकत आहे. असं सगळं असूनही आजही मीना आमच्या कुटुंबातीलच एक सदस्य म्हणून तिची सर्व कर्तव्ये व्यवस्थित पार पाडीत आहे. वयोमानानुसार तिची तब्बेत नीट रहात नाही. पण तिच्या सेवेत मात्र कसली उणीव ती ठेवत नाही. आमच्या आईची ती अत्यंत लाडकी व जणू तिचा उजवा हातच. आम्ही दोघेही व्यवसायानिमित्त दिवसभर बाहेर असताना तिने आमच्या आईची जी मनोभावे सेवा केली त्याचे वर्णन शब्दात करणे केवळ अशक्यच. आमच्या आईनेही तिला आमच्या कुटुंबातील सदस्य म्हणून जे प्रेम व आपुलकी दिली, त्याची पूर्ण जाणीव ती आजही जपून आहे. आमच्या मुलाचे म्हणजे चि. संकेतचे तर तिचे त्याच्या जन्मापासूनच नाते. आमच्या घरातील प्रत्येक गोष्टीची व्यवस्थित मांडणी व जपणूक करणे आम्हाला

तिच्यावाचून जमलेच नसते. प्रामाणिकपणा तर पराकोटीचा. घरातील पैसा अडका, दागदागिने आणि इतरही अनेक वस्तू मीनाकडे इतक्या व्यवस्थित आहेत की आमचा संकेततर त्याला काहीही हवे असल्यास प्रथम 'मीना माझं अमूक कोठे आहे?' अशीच विचारणा करतो. अर्थात् आधी आमची आई आणि आता आम्ही दोघेही ह्या परंपरेला अपवाद नाहीत. मीना म्हणजे अमाच्या कुटुंबाचे एक आदर्श भूषण! तिच्यावाचून आमचे जीवन अपूर्णच!

आमच्या आईच्या मार्गदर्शनाखाली आणि नंतर तिच्या निधनानंतर नीलनच्या मार्गदर्शनाखाली ती आपल्या पाठारे प्रभुंचा संपूर्ण स्वयंपाक अगदी सर्व पक्वानांसहित करण्यात तरबेज झाली आहे. मीना म्हणजे आम्हालाच आमच्या भाग्याचा हेवा वाटेल असा अनमोल ठेवा. ऋणानुबंध आणखी काय! अनेक योगायोगाचं स्पष्टीकरण आपल्याकडे आहेच कोठे?

रामागड्यांच्या बाबतीतील आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्यांच्या मनोरंजनाच्या अगदी माफक कल्पना. गौरी गणपती आणि होळी म्हणजे त्यांचे हक्काचे, आनंदाचे आणि एका वेगळ्याच आत्यंतिक समाधानाचे खास सण! ह्या सणांना मात्र बहुतेक रामागडी अगदी आठवड्याची सुट्टी घ्यायचे व एकतर गावी जायचे किंवा येथे राहून अतिशय वेगळ्या पद्धतीने ते साजरे करावयाचे व आजही करताहेत. त्यांचे गाण्याचे व नाचण्याचे विशिष्ट ग्रुप असतात. शिमग्याला घरोघरी जाऊन ती गाणी गाऊन व त्यांचा एक आगळा नाच दाखवून ते सर्वांचे मनोरंजन करीत असत. काहींच्या पायात घुंगरू, एक ढोलकी, एक बाजाची पेटी, टाळ असे अगदी मोजकेच साहित्य. त्यांची गाणीही सर्वसाधारण ठरलेली. आमच्या लहानपणी आम्हाला आवडणारे त्यांचे एक गाणे म्हणजे 'शरवणबाळ जातो काशीला, जातो काशीला'. हे गाणे आम्हा सर्व मुलांना इतके आवडायचे की ते सर्व हा नाच करून गेल्यानंतर आम्ही सर्व मुलं त्या गाण्यावर ताल धरून त्यांच्यासारखे गाण्याचा व नाचण्याचा प्रयत्न करत असू व त्याचा सर्वतोपरी आनंद घेत असू. शिमग्यातील ह्या रामागड्यांची विविध सोंगं तर कायम आमच्या कुतुहलाचा विषय असत. ह्या त्यांच्या नाचगाण्याव्यतिरिक्त रामागड्यांची आणखी एक करमणूक म्हणजे त्यांची भजनी मंडळं. दिवसभराची आपआपल्या घरातील सर्व कामे आटपून रात्री ते सर्व

## जरा हसा!

✳ एका महिलेने फेसबुक स्टेटस लिहिले,
'नवरा पाहिजे'
१४० महिलांनी लिंक करून प्रतिक्रिया दिली,
'माझा घेऊन जा....!'

✳

एकत्र जमून जिथे मिळेल त्या जागेत आपली भजनं गात, रात्र जागवीत असत. टाळ मृदंगाच्या गजरात एका सुरात गायली जाणारी ती भजनं व त्यात तल्लीन होऊन गेलेली त्यांची रूपं बघण्यात मला तरी एका वेगळ्याच आनंदांची अनूभुती होत आली आहे. त्यांच्यात अनेक चांगले गायक, वादक व नर्तक असायचे. करमणुकीच्या किती माफक कल्पना! पण त्यांना त्यातून मिळणाऱ्या परमानंदाचे त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे ते विलोभनीय तेजोवलय केवळ शब्दांच्या पलिकडले! मला लहानपणापासूनच ते जाणवत आले आहे व आजतागायत ते चिरंतन आहे. मी स्वत: माझ्या काही मित्रांसोबत ह्या भजनांच्या अगदी मनमुराद आस्वाद घेत असे.

तेव्हा मंडळी, असे हे रामागडी. त्यांचे यथार्थ वर्णन करण्यात आपले शब्दसामर्थ्यच अपुरे पडेल. तो एक आपल्या पिढ्यान्‌पिढ्यांनी घेतलेला एक नितांत सुंदर प्रत्यक्षानुभव!

शेवटी वैभव म्हणजे तरी काय हो? ऐहिक अर्थाने वैभव म्हणजे काय हे आपण जाणतोच. पण आपल्या सर्वांच्या आयुष्याचे सोने करणारी ही आपलीच माणसे आणि त्यांच्याशी असलेली आपले ऋणानुबंध आणि आपल्या सर्वांच्या मनाच्या कोंदणात नकळतपणे पण चपखलपणे बसलेले हे खरे हिरे, माणिक, मोती अशी मौल्यवान रत्ने हे एका विशिष्ठ अर्थाने का होईना; पण आपले अनन्यसाधारण व आगळे वैभवच नाही का?

अशावेळी आपल्या अंतर्मनाचा हुंकार सहजच उमटतो आणि तो म्हणजे- ''लागो न दृष्ट आमुची, आमुच्याच वैभवाला''!!

✳

बालविभाग

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

**Essay**

# My Hobbies

## ✶ Eva Nimish Dhairyawan ✶

**4th Std.**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Everyone has a hobby. Everyone's likes and interests are different. We have one or two hobbies. They keep your mind fresh and peaceful. The best recreation of your mind and body are hobbies. I have two hobbies. They are drawing and reading. They make me feel nice.

Drawing and reading make me feel great. When I'm bored, I start to draw something to entertain myself. And reading the a stilton books, make me very interested in the mystries.

When I have nothing to do, I draw something. It makes my creativity improve. Reading mystery books gives me some ideas to make something and also gives me knowledge. Thank you for reading my hobbies.

✳

## जरा हसा!

✳ बायकोने केलेल्या स्वयंपाकात कधीही उणीव काढू नका. तिने जवळजवळ दीड तास मोबाइल बाजूला ठेवलेला असतो रे त्यासाठी!

---

✳ शामराव पुण्यातील मित्राला फोनवर म्हणाले, ''गुड न्यूज? काल मी कानाचे यंत्र बसवून घेतले. आता फोनवर किंचाळू नकोस.''
पुणेरीच मित्र तो! चटकन म्हणाला, ''हॅपी न्यू इयर!''

---

✳ हजारो हातांनी दिलं तरी
पूरग्रस्त मदतीनेच वाहून जातात.
पूर हादेखील निवडणुकीचा होतो जाहीरनामा
जनावरं, घरं, माणसं यांना मदत येत नाही कामा...

✳

---

## पाठारे प्रभु सोशल समाज

✳ समाजातर्फे दिनांक ०४-१०-२०१९ रोजी विलेपार्ले येथील कनकाई महोत्सवात रंगारंग कार्यक्रम सादर झाला. त्याचा समग्र वृत्तांत पुढील अंकी.

✳ हौशी कला मंदिरचे स्नेहसंमेलन दिनांक २६-१०-२०१९ रोजी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात होणार आहे. त्याचा वृत्तांत पुढील अंकी.

✳

कथा

# व्रत

**★ उज्ज्वला र. ब्रह्मांडकर ★**

शनिवारची दुपार होती. ऑफिस दुपारी दोनलाच सुटलं होतं. घरी मस्तपैकी जेवून मी पलंगावर लोळत पडले होते. हातात लायब्ररीतून वाचायला आणलेली नवी कादंबरी होती. हळुहळू डोळ्यांवर सुस्ती चढत होती.

एवढ्यात बेल वाजली. एकदा वाजली. पलंगावरून उठेपर्यंत दुसऱ्यांदा वाजली... आणि मग... थोड्या थोड्या वेळाने वाजतच राहिली. मी माझी चाल मुद्दामच हळू केली. ही बेल माझ्या परिचयाची होती.

नक्कीच लता आली होती. मी दार उघडलं. दारात लता उभी होती. दार उघडताच ती वादळासारखी आत घुसली...

'मीना, चल आटप लवकर... आपल्याला जायचंय.''

हे तिचं नेहमीचंच होतं. कुठेही गेली तरी त्या घरची मालकीण असल्याच्या तोऱ्यात ती भराभर हुकूम सोडीत रहायची.

''अगं, पण कुठे?'' मी विचारलं.

''कुठे म्हणजे काय? पिक्चरला.''

''ए, आज नको ना.''

''झाला सुरू नन्नाचा पाढा?''

''माझा आज मुळीच मूड नाहीय बघ पिक्चरला जायचा.''

''शी! काहीतरीच काय? पिक्चरला जायला मूड कशाला लागतो?''

''खरंच लता, आज नको. माझं डोकं दुखतंय...''

मला खरंच कंटाळा आला होता पिक्चरला जायचा. म्हणून शेवटी एक दुबळी सबब मी हळूच पुढे केली.

''डोकं दुखतंय तर ॲनासिन घे. काय वाटेल ते कर. पण आज पिक्चरला जायचं म्हणजे जायचंच. आज मी तुझं काहीही ऐकणार नाही.''

''नाहीतरी कधी ऐकतेस माझं?''

''असं म्हणू नकोस हं मीने, तू खरं सांग, तू माझं जास्त ऐकतेस की मी तुझं?''

तिचं म्हणणं बरचसं खरं होतं. ती मुकाट्याने माझ्या इच्छा प्रमाण मानायची. पण आज ती काहीच ऐकायला तयार नव्हती.

''हे बघ आत्ता चार वाजतायत. मी साडेपाचपर्यंत येते. पावणेसहाचा शो आहे. तू तयार रहा. समोरच तर थिएटर आहे. रात्री नऊपर्यंत घरी येऊ...'' असं म्हणून ती आली तशीच धाडकन निघूनही गेली. ती गेली त्या दिशेला मी पहातच राहिले.

इतक्यात आई हॉलमध्ये आली - ''मीना, लताबरोबर मुळीच सिनेमाला जायचं नाही.''

मी दचकून आईकडे पाहातच राहिले - ''एऽऽआई, काय मस्करी करतेस गं?''

''मस्करी नाही मीनू, मी सीरिअसली बोलतेय.

''अगं पण का?'' ... मला खरंच कळेना आई असं का म्हणतेय ते. खरं तर लता अन् मी चांगल्या मैत्रिणी... कॉलेजमध्ये एकत्र आलो अन् योगायोगाने पुढे एकाच ऑफिसमध्ये आमची वर्णी लागली.

नुकतीच एस.एस.सी.च्या दालनातून बाहेर पडलेली आम्ही फुलपाखरं कॉलेजच्या प्रांगणात स्वच्छंदीपणानं बागडत होतो. झाडाचे काटे टोचणार नाहीत इतपत सावधगिरीनं फुलांतील मध चाखत होतो. मोकळा श्वास भरभरून घेत होतो. सोनचाफ्यासारखं स्वच्छ ऊन, बरसणारी वर्षा आणि स्वेटरने ऊबदार केलेला माघातील गारवा सारख्याच तन्मयतेने, अनोख्या जाणीवेने पीत होतो. कॉलेजच्या

## वात्रटिका
## खोटुराव खोटारडे

खोटुराव खोटारडे खोटं बोलतात भारी
घशात शब्द अडकतात, खरं बोललं तरी.
लोक म्हणतात, ''मौन पाळा, थोडं गप्प बसा.''
खोटु म्हणतात, ''गप्प बसून दुखतो माझा घसा''

**-डॉ. सुमन नवलकर**

पहिल्या वर्षापासून एम. ए. पर्यंत आणि पुढचीही दोन तीन वर्षे आमची ही मैत्री दिसामासाने, पळापळाने वाढतच होती.

अगदी एका ताटात नाही तरी एका पाटावर बसण्याएवढी आमची मैत्री निश्चितच होती. एकीच्या वेदना दुसरीच्या हृदयाला जखम करीत नसल्या तरी समजू शकत होत्या. एक मनमोकळी, बोलघेवडी मुलगी म्हणून आमच्या घरी ती सर्वांना आवडत होती.

मग असं असताना आईने आजच विरोध दर्शवावा ह्याचं मला खूप आश्चर्य वाटलं.

मी आईला पुन्हा विचारलं, पण आईचं आपलं एकच पालूपद चालू.

शेवटी आईनं सांगितलं - ''मीनू खरी गोष्ट मला माहित नाही. पण लताला आजकाल कुणी चांगलं म्हणत नाही. लता फार फ्री वागते कुणाही मित्राबरोबर. कुठेही जाते म्हणतात. तू तिच्याबरोबर फिरणं बंद कर...''

मला खरंच हसू आलं. मी म्हटलं - ''आई, अगं हल्ली जग एवढं पुढे गेलंय - आता मित्र आणि मैत्रिणी यात फारसा फरक मुळी कुणी मानतच नाही. आणि मी तर तिच्यासारखी मित्रांबरोबर जात नाही ना? ती माझ्याबरोबर असते तेव्हा एकही मित्र नसतो आमच्याबरोबर. मग तू का घाबरतेस?''

''तसं नाही सोनुले...'' आई असं हृदयाच्या कप्प्यातून बोलायला लागते, जेव्हा तिला खूप काळजी वाटत असते तेव्हा. आत्ताही आई असंच बोलायला लागली - ''अगं, मुलीची अब्रू म्हणजे काय; तडा गेला की कायमचाच.''

''काहीच्या काही हं आई तुझे! कशावरून कुठे पोहोचलीस? माझ्याबद्दल अशी काळजी करण्याचं कारणच काय?''

''नाही कसं मीनू? अगं तू प्रत्यक्षात तशी नसलीस तरी केवळ तू तिच्याबरोबर फिरतेस म्हणून लोक तुलाही नावं ठेवतील. 'संगती संग दूषणम्' असं वचनच आहे. केवळ ढेकणाच्या संगे हिरासुद्धा भंगतो. मग मानवाची काय कथा?''

''अगं पण माझ्याबद्दल खात्री नाही का तुझी?''

''तसं नाही गं बाळ. अगं ताडाच्या झाडाखाली बसून दूध प्यायलं तरी लोकांना ताडी घेतली असंच वाटतं.''

इतका वेळ आमचा संवाद मुकाट्यानं ऐकत असलेला शरदसुद्धा म्हणायला लागला. ''होय ताई मीसुद्धा कित्येक दिवस सांगीन सांगीन म्हणतो पण धीरच झाला नाही बघ. शिवाय लहान तोंडी मोठा घास घेतल्यासारखं झालं असतं. पण लताबद्दल कॉलेजमध्ये जे काय ऐकू येतं ना, ते सांगण्यासारखं नसतं. अगं दिलीपची बहीण आहे ना तुमच्या ऑफिसमध्ये, ती काय काय सांगते तिच्याबद्दल!''

आता मात्र मी सुद्धा गंभीरपणे विचार करू लागले.

लता आणि मी - आम्ही अगदी भिन्न स्वभावाच्या होतो. खरं तर आमची मैत्री जुळली कशी हाच प्रश्न होता. दोघींच्या स्वभावात खूपच फरक होता. ती जितकी चपळ, तितकीच मी संथ. मी निवांतपणे बसून पुस्तकांच्या विश्वात रमायची तर; तिच्या पायाला सदैव भिंगरी बांधलेली. मी जितकी शांत तितकीच ती अवखळ.

ह्या तिच्या अवखळ चपळतेलाच सर्व लोक चंचलता म्हणत असावेत का?

आमच्या दोघीत एकच गुणसाधर्म्य होतं. ते म्हणजे बडबड. आम्ही दोघी विलक्षण गप्पिष्ट होतो. एकदा का चालना मिळाली की गप्पांना अंत नसायचा.

आमच्या गप्पासुद्धा विविध विषयांवरच्या असत. अगदी साहित्यापासून ते ऑफिसमधल्या भानगडीपर्यंत.

पण एक खरं होतं की ती स्वतः कुणालाच नावं ठेवीत नसे. नुसत्या ऐकीव गोष्टींवर विश्वास ठेवत नसे.

खरं तर माझ्या दृष्टिकोनातून ती एक परोपकारी मुलगी होती. गंमतीनं तिला सर्वजण 'सोशल वर्कर' म्हणतही होते. आज काय कुणाला साडी खरेदी करायची तर लता बरोबर हवीच. कुणाला ब्युटी

पार्लरमध्ये जायचं तर लताशिवाय कसं होणार? कुणाला बायकोला काही प्रेझेंट द्यायचंय - घ्या लताचा सल्ला. कुणाला शॉपिंगला कंपनी हवीय, लता आहेच हक्काची.

ती आणि मी संध्याकाळी बरोबरच निघायचो, ऑफिसमधून. पण घरी मात्र एकत्र फार थोड्या वेळा यायचो.

ती पुष्कळदा कुणाबरोबर तरी कोणत्यातरी कामासाठी वेगळ्याच दिशेला निघून जायची. मला नेहमी आग्रह करायची. पण मला हे मनातून पटतच नव्हतं. तसे तिचे परोपकार खटकण्यासारखे नव्हते. पण मनातून कुठेतरी काहीतरी टोचायचं. कसला तरी सल जाणवायचा. कसली तरी वेगळी जाणीव माझ्या मनाला नेहमी व्हायची. पण नेमकं उमगत नव्हतं.

एकदा असेच आम्ही स्टॉपवर बसची वाट बघत उभे होतो. गप्पांमध्ये बसची वाट बघण्याचा कंटाळा जाणवत नव्हता. थट्टामस्करीला ऊत आला होता. आणि अचानक एक कार स्टॉपजवळ थांबली. लता पटकन त्या कारच्या दिशेने धावत गेली. कारमध्ये बसलेल्या माणसाशी काहीतरी बोलली आणि तिथूनच तिनं ऑफिसात तिच्या शेजारी बसणाऱ्या काळेला हाक मारली. दोघेही त्या गाडीत बसून निघून गेले. काळे आमच्याच भागात राहात होता. हे मला माहीत होतं. म्हणूनच मला आश्चर्यही वाटलं की मला न बोलवता तिनं काळेला का बोलवलं? पण मी तो विषय तिथेच सोडला. परत कधी तिला विचारलंही नाही.

माझ्याही कानांवर हळुहळू तिच्याबद्दल काहीबाही येऊ लागलं होतं. पण मी सर्व काही ऐकून विसरून जात होतें.

आणि मला वाटतं, म्हणूनच आमची मैत्री टिकली असावी. ती काही का करेना. आपल्याला काय करायचंय या भावनेनं मी तिच्याशी पूर्वीसारखीच निर्लेप मनाने वागत होते. माझेही कितीतरी सहकारी चांगल्यापैकी मित्र होते. तसेच तिचेही असतील - त्यात काय झालं? - असा विचार मी करीत होते.

लता पक्की व्यवहारी होती. ती सगळ्यांनाच धूप घालीत नव्हती. तिच्याभोवती गोंडा घोळणाऱ्यांची संख्या कमी नव्हती. ती होतीही तशीच सुंदर! नाकीडोळी नीटस अन् तरतरीत होती. हजारात नाही तरी शंभरात उठून दिसण्यासारखी होती. आणि मुख्य महत्त्वाचा होता तो तिचा गोड, लोभसवाणा चेहरा व त्या चेहऱ्याला साजेसं खडीसाखरी बोलणं. पण एखादी व्यक्ती तिला पटली नाही तर त्या व्यक्तीला खड्यासारखं उचलून ती बाजूला करी.

त्यातल्याच कुणीतरी तिच्याविरूद्ध विष कालवलं असेल असं मला वाटायचं.

एक दिवस ती माझ्या सेक्शनमध्ये आली होती. थोडसं बोलून ती निघूनही गेली. एवढा वेळ अनिमिष नेत्रांनी तिच्याकडे बघणारा साठे उठून माझ्या टेबलाकडे आला आणि म्हणाला -

''मीना, तुला काहीच माहिती नाही का?''

''कसली?''

''ह्या लताची?''

''म्हणजे?''

''अगं, ती मुलगी चांगली नाही. तिच्याशी तू जास्त मैत्री करू नकोस. तुला मी एक चांगली मुलगी म्हणून ओळखतो. तू आहेस भोळी. तुला माणसांची मुळीच पारख नाही बघ.''

मला खरं तर साठेच्या आगाऊपणाचा भयंकर राग आला होता. चांगली नाही तर हा कशाला तिच्याशी बोलायचा प्रयत्न करीत होता? पण दुसऱ्याला दुखवणं माझ्या स्वभावातच नाही म्हणून मी गप्प बसले.

पण एक गोष्ट प्रकर्षानं माझ्या लक्षात येऊ लागली की लता मुलांबरोबर जास्त मैत्री करते, मैत्रिणींपेक्षा ती मित्रांमध्ये जास्त रमते. सगळीकडे तिच्या मैत्रिणी कमी झाल्या होत्या. सदासर्वकाळ मुलांबरोबरच ती दिसायची.

मी तिला म्हणायची - ''लता, सारखी कुठे जात असतेस गं संध्याकाळी?''

यावर ती उत्तर द्यायची -

''अगं काय करणार? तो जोशी आहे ना, त्याचं थोडं काम होतं. माझ्या ओळखीनं होणार होतं. म्हणून गेले होते.''

## जरा हसा!

✳ आंब्याच्या झाडाला आंबे येतात. पण...
वडाच्या झाडाला कधीच वडे येत नाहीत!

✳

## वात्रटिका
## आरामखुर्ची

आरामखुर्ची करायची अख्खा वेळ आराम
म्हणायची, ''द्या की मला कोणी काही काम.''
नाहीतर म्हणते, ''मला मला थोडे उभे करून ठेवा,
पाय पसरून बसून-बसून आला बाई थकवा.''

**-डॉ. सुमन नवलकर**

किंवा

''आज माझ्याकडे आपटे येणार आहे. त्याच्याबरोबर आज मी जाईन हं घरी.''

मला हे खूपच विचित्र वाटायचं. पण 'आपल्याला काय करायचयं?' ह्या विचारानं मी गप्प बसत असे. जास्त चौकशा माझ्या स्वभावातच नव्हत्या. लोक मला जे काही येऊन सांगत, ते सर्व मी मनातच ठेवीत असे. जास्त खोलात शिरून त्यावर चर्वितचर्वण करणं मला मुळीच पसंत नसायचं.

काही मुली म्हणायच्या - ''बरी ह्या लतालाच मुलं कामं सांगतात? आणि मुलींचंही हिच्याकडे कधी कामच नसतं.''

पण हे म्हणताना आपणही कधीकाळी लताकडून बरीच कामं करवून घेतली आहेत हे त्या सोयिस्करपणे विसरायच्या.

मुलंही तशीच-साठेसारखी. स्वत: गोंडा घोळायचा आणि ती बघत नाही म्हणून तिला नावं ठेवायची.

खरंच! मी सुद्धा त्या दृष्टिकोनातून विचारच केला नव्हता. ती खरंच वाईट असेल का? कधी असं काही न बोलणारी आईही तिच्याविषयी असं मत प्रदर्शित करून गेली होती. तसं जर खरं असेल तर... तर मला जपूनच वागायला हवं. आई म्हणते तसं माझंही नाव खराब होईल का?

होईलही कदाचित. 'समानशीले व्यसनेषु सख्यम्।' असं वचनच आहे ना संस्कृतमध्ये, तेच उलट करून म्हणणार की या दोघींची मैत्री आहे म्हणजे ही मीनलसुद्धा तशीच असणार. सर्व लोक माझ्याकडे बोट दाखवणार. वरून गोड बोलणार आणि मागून निंदा करणार.

छे! छे! नाही नाही! असं होता कामा नये.

पण... पण... मी करू तरी काय?

लताची मैत्री तोडून टाकू? पण कशी? ती माझ्याशी एवढी चांगली वागते! तिला कशी तोडून टाकू? माझ्याच हातांनी लावलेलं हे स्नेहाचं, मैत्रीचं रोपटं उपटून टाकू? पण.. ही मैत्रीची वेल आता चांगलीच फोफावलीय. ह्या वेलीचे तंतू चिवट आहेत. उगाचच तिला दुखवू?

का? तिनं माझं काय वाईट केलंय?

केवळ जग तिला वाईट म्हणतं म्हणून ती वाईट ठरते का?

लोक काय हजार तोंडांनी बोलतात. खरं तर कसंही वागलं तरी माणसाची निंदा होतेच. फार साधेपणाने, भोळेपणाने वागलं तर कधी कधी 'फ्री' हा शिक्का बसतो. शिष्टपणाने वागलं तर 'आढ्यतेखोर' म्हणतात. आपलं काम बरं आणि आपण बरं असं वागलं तर 'माणूसघाणा' म्हणतात.

परवा साठे म्हणाला, 'तुला माणसांची पारख नाही.'

पण माणसाची पारख करायचे निकष कुणी ठरविले? माणसांनीच ना?...

...कुणीतरी माझे खांदे गदागदा हलवत होतं.

मी माझ्या विचारांच्या तंद्रीतून जागी झाले. दचकून वर पाहिले. लता उभी होती. 'माझे विचार हिला कळले असतील का?' ह्या विचारने माझं मलाच ओशाळं वाटू लागलं. ते ओशाळवाणा भाव चेहऱ्यावर उतू जाऊ लागला. लतालाही कळलं की काहीतरी बनसलंय.

''काय झालं गं? अशी का बसलीयस? अन हे काय? तयार नाही झालीस?''

''लता...'' हा माझाच आवाज का?... मी तिच्याकडे बघण्याचं टाळत होते. माझ्या डोळ्यात तिनं खोलवर वाकून पाहिलं. तिथं तिला तो ओशाळेपणाचा तुपकट तवंग दिसला असावा.

तिनं पुन्हा विचारलं, ''काय झालं मीना?''

मी डोळे खाली ठेवूनच उत्तरले - ''आज आपण पिक्चरला नको जाऊया.''

''पण मी तिकीटं काढलीयत.''

''प्लीज लता, तिकीटं परत कर. किंवा दुसऱ्या कुणालातरी घेऊन जा.'' मी माझा आवाज शक्य तेवढा कोरडा ठेवत म्हणाले.

लतानं एकवार माझ्याकडे पाहिलं. ती काहीच न बोलता दरवाजाकडे जाऊ लागली. मलाच राहवेना.

''थांब लता' मी पटकन पुढे धावत गेले. तिचे खांदे धरून तिला वळवलं आणि विचारलं- ''रागावलीस लता ?''

''छे!'' ती हसून उद्‌गारली. पण... पण मला जाणवलं. ते ओढून ताणून आणलेलं हसू होतं.

मी तिला म्हटलं - ''लता, आपण असं करू या. तिकीट परत करू आणि फिरायला जाऊ. तू थांब मी आत्ता आलेच...''

पाचच मिनिटात मी सर्व आवरून तिच्याबरोबर बाहेर पडले. सारसबागेची आम्ही वाट धरली. नेहमीसारखे विविध विषय काढून आम्ही गप्पा मारायचा प्रयत्न करीत होतो, पण..

आज कुठेतरी काहीतरी चुकत होतं. गप्पांची भट्टी नेहमीसारखी जमत नव्हती. मनं मोकळी होत नव्हती.

खरं तर आज दोघींचीही स्थिती अशी होती की -

खूप काही सांगायचंय
मन मोकळं करायचंय
पण शब्दच सापडत नाहीत
विचार व्यक्त होतच नाहीत.

शेवटी आम्ही सारसबागेत पोहोचलो. एक निवांत कोपरा पाहून तिथे बसलो.

नेहमी सतत चिवचिवणारी चिमणी आज शांत बसली होती. मला वाईट वाटलं. माझ्या घशात दाटून आलं. मीच मग बोलायला सुरुवात केली.

''लता इथे किती प्रसन्न वाटतं नाही? मनाचा सगळा शीण नाहीसा होतो बघ. ह्या पवित्र देवालयासमोर बसल्यावर नकळत आपलं मनही प्रसन्न होतं..''

हे वाक्य मी उच्चारलं... आणि दचकून लताकडे पाहिलं.

आज कसं काय होत होतं? आमच्या दोघींच्या संभाषणात हे असे शब्द तोलून मापून आजमावून बघण्याची कधीच गरज पडली नव्हती.

शब्दांमागूनी शब्द धावती
शब्दांची ना उणीव पडे...

अशीच आमची आजवरची स्थिती होती. पण आज अगदी उलटं झालं होतं. नुसताच झालाय मनामध्ये

कल्लोळ सगळ्या भावनांचा
निचरा कधी होणार सर्व
मनामधल्या आवर्तांचा
ओथंबलेल्या आवर्तांचा
ओथंबलेल्या मेघांपरी
हृदय जड झाले आहे
कोसळणाऱ्या पर्जन्याची
मन वाट पहात आहे...

अशीच स्थिती आमची दोघींची झाली होती.

लताचं लक्ष माझ्याकडे नव्हतं. दूरवर आकाशात विहरणारा एक ढग दिसत होता. त्याच्याकडे टक लावून पाहत ती बोलू लागली.

''... मीना, मला माहीत आहे तुझ्या मनात काय चाललं आहे ते...''

मी दचकून तिच्याकडे पाहू लागले. माझं दचकणं तिला जाणवलं असावं. ती बोलत राहिली.

''अशी दचकू नकोस मीना. मला सर्व माहीत आहे की, लोक माझ्याबद्दल काय काय बोलतात.''

''लता... मग....''

''तरी पण मी अशी का वागते असंच विचारायचंय ना तुला? मीना तू खरंच भोळी आहेस. तू जग ओळखत नाहीस. फार फार दुष्ट आहे हे जग. जे मदतीचा हात पुढे करतात, त्यांची मदत घेऊन मग त्याच हातावर थप्पड मारतं हे जग. हा मदत करायचा वारसा कुणाकडून मिळाला मला माहीत आहे? माझ्या वडिलांकडून. माझी आई अत्यंत स्वार्थी होती. अशीही एक आई असू शकते मीना... स्त्री जातीची अनंत चांगली रूपं तू तुझ्या आईत पाहिली असशील. पण माझ्या आईचं हे रूप फार भयंकर आहे. माझ्या पप्पांच्या पैशाकरताच तिनं त्यांच्याशी लग्न केलं.

पण त्या पैशाचा उपयोग फक्त स्वार्थासाठी करणं

## जरा हसा!

✳ टॅक्सी चालक - बाबूजी, ब्रेक फेल हो गयी। गाडी रुकतीही नही । क्या करू?
गाडीतील सवारी - मूर्खा! पहिल्यांदा मीटर बंद कर.

✳

## वात्रटिका

### घड्याळ

बाळोबाला वाटते घड्याळाची भीती,
म्हणतो, ''याच्या तालावर नाचायचं किती?''
घड्याळ म्हणतं, ''मला आपलं करशील मागेपुढे.
उगवणाऱ्या सूर्याला का म्हणशील थांब थोडं?''

**-डॉ. सुमन नवलकर**

तिला मंजूर होतं. दुसऱ्यासाठी काहीही करणं - पैशानं नाहीच पण शब्दानंही कोणाच्या उपयोगी पडणं तिच्या व्यवहारात बसत नव्हतं. माझ्या वडिलांचा स्वभाव थेट माझ्यासारखाच होता. सर्वांसाठी झटायचं, जेवढं जमेल तेवढं करायचं ही त्यांची उदात्त विचारसरणी होती. पण पुढे पुढे जगाने त्यांचा पैसा संपत आल्यावर त्यांच्याकडे पाठ फिरविली. त्यांच्या पैशावर पुढे आलेले लोक त्यांना क:पदार्थ मानू लागले.

त्यातच माझी आई पैशासाठी त्यांना सोडून दुसऱ्या एका व्यापाऱ्याबरोबर निघून गेली. तेव्हापासून त्यांचा स्त्रीजातीवरचा विश्वास उडाला. मी तेव्हा खूप लहान होते. त्यांनी माझं मी मुलगी म्हणून तोंडही पाहायचं नाही असं ठरवलं आणि मला आजोळी नेऊन ठेवलं. इतका त्यांना स्त्री जातीबद्दल तिटकारा निर्माण झाला. मला हे सर्व पूर्वी माहीत नव्हतं. कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असताना एक दिवस आजोबांना आलेलं बाबांचं पत्र माझ्या हातात पडलं. तोपर्यंत मला वाटायचं की आईवडील मला नाहीतच.

पण मी किती झालं तरी बाबांची पोटची मुलगी आहे. ते पत्रातून माझी नियमित चौकशी करीत. पैसे पाठवीत. ते पत्र पाहिल्यापासून मी त्यांना बघायचा हट्ट घेतला. बाबाही आता थकले होते. तो पूर्वीचा कट्टर द्वेष आता थोडा शिथिल झाला होता. त्यांना माझी, माझ्या स्वभावाची सविस्तर बातमी आजोबा कळवतच होते. त्यांचा समाजसेवेचा वारसा माझ्यात उतरल्याचं बघून त्यांना सामधान वाटलं. हे व्रत मी तसंच पुढे चालवीन असं वचन दिलंय मी त्यांना. हे सर्व करताना फ्री वागणं आलंच नाही का?'

''पण लता लोक म्हणतात की तू... तुझी मुलांबरोबरच जास्त मैत्री असते... मुलींपेक्षा...' मी भीतभीतच म्हटलं.

''खरंय मीना... मी आत्ता तुला सांगितलं तसा स्त्री जातीबद्दलचा एक प्रकारचा आकस हा माझ्याही मनात बसला - माझ्या बाबांच्या आयुष्याची ही परवड ऐकून. आणि खरं सांगायचं तर बघ आपण पुरुषांना आपमतलबी म्हणतो. पण बायका पण तेवढ्याच स्वार्थी असतात. खरं सांगू? आपल्या सुरक्षिततेची काळजी आपणच घेऊ शकतो. आपलं वागणं चोख असलं तर कुणाची काय टाप आहे आपल्या केसाला धक्का लावायची?''

''पण मुलींपासून तर तुला असा धोका नाही. मग त्यांना तू का टाळतेस?''

''खरं सांगू? बायकांचा फाजील चौकसपणाच मला आवडत नाही. पुरुषांचं तसं नसतं. त्यांचं काम झालं की ते जास्त खोलात शिरत नाहीत. एकतर मीच त्यांना तेवढं लांब ठेवते. भावनांची गुंतवणूक कधीच होऊ दिली नाही.' लता आवेशाने बोलत होती. तिचा तो अभिनिवेश मला नवीन नव्हता. तिची ही रुढीची चौकट मोडणारी मतं माझ्या परिचयाची होती.

तिचं नेहमी हे सगळं असंच उलट असायचं. प्रवाहाच्या विरूद्ध पोहण्याची तिला पाहिल्यापासून जबरदस्त हौस. फक्त एवढंच की ह्या हौशीतला आनंद. ते झपाटलेपण ओळखायला आपणही असंच स्वत:ला झोकून द्यायलं हवं.

''मला फक्त एवढंच वाईट वाटतं मी, की ज्या लोकांसाठी मी जीव तोडून झटले, त्यांची कामं करून दिली, तेच लोक आज माझ्या विरूद्ध बोलतात. बायका बोलायच्याच. त्यांची मजल तेवढीच. घर, संसार आणि खोट्या नितिमत्तेच्या कल्पना उराशी कवटाळत जन्म घालवणार त्या. कधी त्या पाण्याबाहेर तोंड काढून मोकळा श्वास घेणार नाहीत. आपल्या विश्वापलीकडलं काही बघण्याचा प्रयत्नही करणार नाहीत, तर समजून घेणं दूरच. नुसती कूपमंडुक वृत्ती. पण मी जोशीबरोबर फिरले तर ते दात दाखवतात, तेच लोक स्वत:चं काम असताना मला टॅक्सीतून नेत होते. तेव्हाची मी तीच होते ना? की मी बावळट बनून त्यांच्या प्रयत्नांना बधले नाही म्हणून वाईट ठरले?''

''लता काय बोलतेयस?''

''खरंय ते मीना. काही जणांनी प्रयत्न केले मला जाळ्यात ओढण्याचे - अगदी लग्न झालेल्यांनीसुद्धा.

पण मी फसले नाही. अर्थात असे लोक अगदी थोडेच. पण सगळ्या मुली मात्र एकजात मूर्ख. आपणच आपल्या स्त्री जातीला बट्टा लावतोय हे त्यांच्या मुळीच लक्षात येत नाही मला नावं ठेवताना. खरं तर त्यांनी प्राणपणानं समर्थन केलं पाहिजे माझ्या वृत्तीचं. निदान नावं तरी ठेवू नयेत त्यांनी मला. पण कुचाळक्या करण्यात बायका पहिल्या येतील.. मीना, तूच एक मला सगळ्यात वेगळी वाटलीस. माझ्या आईने माझ्या वडिलांशी डायव्होर्स घेतलाय हे सगळ्या ऑफिसला ठाऊक आहे.''

''काय म्हणतेस?''

''आश्चर्य वाटलं ना ऐकून? आणि हे माहीत झाल्यावर तर सर्वांनी टोमणे मारून बेजार केलं मला. आत्तासुद्धा तू विचारलंही नाहीस. फक्त मनात बेचैन झालीस. कसं विचारावं हा प्रश्न तुला पडला. तू स्पष्ट विचारलं असतंस तरी मला तुझं कौतुक वाटलं असतं. पण बाकीच्या मुली तशा नाहीत. मला खूपदा टोमणे ऐकावे लागतात. पण मी हसून साजरं करते. आणि यामुळेच मला मुलांची संगत बरी वाटते. निदान टोमणे मारून तरी बोलत नाहीत.

आणि खरं सांगू? अगदी मनाच्या कप्प्यातलं गुपीत... मला कुणावर रागावताच येत नाही बघ. कुणीही कितीही बोललं तरी मी आपली प्रत्येकाशी नेहमीसारखीच वागते. म्हणून काहीजण मला निर्लज्ज-सुद्धा म्हणतात. म्हणू देत. अगं, तो आकाशातला ढग दिसतोय ना, तो पावसाळ्यातील कृष्णमेघ असला तरी लोक नावं ठेवतात आणि दुष्काळातील पांढरा मेघ असला तरी पाऊस पडत नाही म्हणून त्याच्या नावानं बोट मोडतील. माणसांची जातच ही अशी...''

लता बोलतच होती. आणि मी? मी सुन्न होऊन ऐकत होते. एका दर्दभऱ्या दिलाची आगळी दर्दभरी कहाणी. फिरत होते मीच प्रश्नांच्या भोवऱ्यात, चांगलं काय आणि वाईट काय ह्या आवर्तनात.

बरसत होते धुवांधार
जलमोती शब्दांचे
झाले मुक्त कोंदटलेले
आसमंत विचारांचे

पण तरीही माझ्या मनात दाटत होता संभ्रम की ह्या समाजसेवेच्या नशेमध्ये ही कुठे वहात जाणार आहे. मला आज सारख्या माझ्याच कविता आठवत होत्या -

जरी कळे मोहामध्ये
सर्वनाश आहे
तरी दिव्याकडे पतंग
झेप घेत आहे
असे का हा बुद्धीनाश
की भावना समर्पणाची

क्षणिक सुखामध्ये लपली बीजे विनाशाची. ही विनाशाची बीजं ठरतील का? की ह्या 'व्रत' वृक्षाला यशाची मधुर फळे येतील? कुणास ठाऊक!

माझं मन मात्र भोवंडून जातंय. लताच्या मतांनी, उलट सुलट विचारांनी ग्लानी येतेय. कुठे तरी लताच्या जवळ जातेय असं वाटत असतानाच भोवऱ्यात सापडून जागच्या जागीच गरगरत राहावं तसं वाटतंय. कुठे तरी लता पूर्णपणे समजलीय असं वाटता वाटताच तिच्याभोवतीचं एक अदृश्य कवच जाणवू लागतं. आणि कळेनासं होतंय खरं काय नी खोटं काय ते!

*

## चिंतनिका

-नलिनी तळपदे

जोवरी अपुला भार भुईला
होत नाही तोवरी
खुशाल जगुनी आनंदाने
गाठावी शंभरी

*

हात पाय नि बुद्धी शाबूत
ताठ कणा अन् मान
असल्यावरती फांदीवरती
पिकले पानही झुलते छान

*

असून होते अडचण आणि
नसून होतो खोळंबा
वाढत जाई वेड्यापरी वय
तोबा तोबा—

*

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Modern/Modified Vanaprastha

## (Aadhunik Vanaprasthashram)

### ✶ Rashmi Velkar ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

When I decided to opt for **Aadhunik Vanaprasthashram,** that is modern or modified Vanaprasthashram, as usual I was bombarded with lots of comments, discussions, counselling etc etc.

I tried to yell that Its Vanaprasthashram guys, not Sanyasashram. And that too Modern or modified Vanaprasthashram; but no one was interested in listening or understanding.

Wikipedia informs that *Vanaprastha* is a part of the Vedic Ashram System. It is considered as a transition phase from a householder's life with greater emphasis on Artha and Kama (wealth, security, pleasure) to one with greater emphasis on Moksha (spiritual liberation).

But I will follow only the first part that is giving up my household responsibilities, which I have completed satisfactorily and efficiently, I hope. But I do not intend to give up enjoyment. I intend to lead a good life without considering to fulfill others' needs or expectations as I have done till date. Food, TV, books, music and no rigid routine, no encroachments of surrounding people on my thoughts or deeds-- That's my idea of Vanaprasthashram.

My quota of good behavior and dancing to the tunes of others in this life is complete. I am done. No more worrying about what others may think or criticize. No obligations any more. No 'pahune/ guest special' adjustments any more—such as -arrange for their special treats, gifts or visits, convenient to them, oh no no, that's history. Whether they like it or not. I plan to dictate my life as I wish.

I can keep **Moksha on hold** for future consideration. At present '**meri marzi'** or my wish is the motto of my life and my idea of modified vanaprasthashram.

Here at Gagan Nulife, Kamshet, a resort residence for seniors, I am able to live according to my idea of modified vanaprasthashram.

A Nulife resident owns a flat/an apartment and chooses to live as per her / his moods and requirements. And Do not have to give explanations to anyone for choosing whichever way one wish to live.

Those who prefer to participate in various activities, meeting people, enjoying friends' company happily indulge in celebrating various festivals or special days and participate in sport's activities or arts and craft sessions and yoga sessions and so on.

And those, like me, who wish to enjoy solitude are left alone. I am very happy to enjoy my peaceful existence away from crowd. Whenever I feel like participating in any particular activity, I can do so. I enjoyed outdoor activity, a game of Tambola, went for a movie night but I do not participate in all the activities regularly.

Again, you have a choice of cooking your own food in your kitchen, in your apartment or you can enjoy healthy, tasty, sumptuous meal

at community dining hall. You get the vegetarian and non-vegetarian menus for the next week in advance at the end of previous week and you can decide what to choose. You can get meal coupons or opt for meal plans. I appreciate it as I do not have to stick to one plan, either vegetarian or non-vegetarian food and everyday choose what to eat according to my mood.

I have plenty of free time and try to use it wisely. And I think books, TV, Internet, Google and Social media is very useful in that process. Mobile phone helps me stay connected with near and dear ones.

'FB Gyaan', that is a post on Facebook, informs about Neuroscience and the 'Sanskrit Effect'. Sanskrit scholars in India learn to chant ancient texts from a tender age which had an amazing effect on the brain. Neuroscience shows how rigorous memorising can help the brain, which is termed as "Sanskrit Effect'. Vedic mantras increase the size of brain regions associated with cognitive function, including short and long-term memory. This finding corroborates the beliefs of the Indian tradition which holds that memorising and reciting mantras enhances memory and thinking.

I want to keep my memory intact. As my father had suffered from Alzheimer's disease, a chronic neurodegenerative disease, I try out various memory exercises to avoid or prolong this hereditary fate. On reading about this "Sanskrit Effect', I decided to recite all the 'aartis' and 'mantras', I know. It keeps me occupied in the morning in the pleasant way. I am not a very religious person nor an atheist / a 'nastik'. This memory exercise creates a pleasant atmosphere. Reminds me of celebrating Ganapati festival with my cousins at my grandmother's place in my childhood and also Ganapati celebration and Satyanarayan puja at our place at Vasai some years ago. Happy Memories. Don't know whether it is helping my brain to function better or not, but at least I have a satisfaction of taking care of my memory.

I also try many word games and puzzles on Internet. I was suggested to try a game of Draw Something—as a memory exercise, but drawing is my enemy number one since school days, so I am not willing to try it out.

Leisure of reading books without any distraction is another advantage of choosing this lifestyle.

This concept of residence for seniors is still not **understood** and **accepted** here in **India.** Mainly due to an ego problem, I think. If a person wishes to stay at Home for seniors, ego of his or her children or near relatives is hurt. They consider it as an insult to them as they are not able to look after the concerned person. "What will people think?" is the only consideration they have. They still have the age-old idea of 'Vrudhashram' or old-age home, where old people/senior citizens have to share everything including space, food, entertainment like TV with other inmates and they still believe that those who are not looked after by their close relatives or children, only they are forced to live in homes. They should try to change their views and understand this new concept.

Homes for seniors is a **necessity** in this modern age. There are many parents who are

## जरा हसा!

✳ टीचर - आपके पापाका नाम अंग्रेजीमें बोले।
स्टुडंट - ब्युटिफूल रेड अंडर वियर।
टीचर - क्या बकवास है? हिंदीमें बताओ।
स्टुडंट - सुंदर लाल चढ्डा!

✳

कविता

## अगतिक

-हेमंत विनायकराव तळपदे

अगतिक असतो आपण सारे
जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर
असहाय आहे शक्तिमान हा जीव
आरंभ ते त्याच्या मोक्षावर
जन्म घेतो या जगी हा
मानव असे परावलंबी
बालपण जरी सजीव हसरे
असे ते स्वकीयांच्या अंकी
काया आपुली सुदृढ असता
यौवनी लाभे ते अनमोल क्षण
परि रोग, व्याधी, व्यंगे ग्रासिता
अनुभवा दिले ते जीवन भीषण
सरतेशेवटी हा बलवान कृमी
अंतिम श्वास घेई या इहलोकी
परि अविचल राही शव तयाचे
अगतिक पहुडे त्या सरणावरती

*

staying alone as children are staying abroad. It's a wonderful chance for them to lead an independent life and still enjoy the company of others facing similar problems. No need to share anything. It definitely **does not highlight** their helpless condition, even though many people in India still believe it to be true. I have willingly and thoughtfully chosen this lifestyle; it is not a helplessly taken decision. My children always respect my wishes and support me unconditionally.

I have opted it for two main reasons, -- **healthcare and security.** I wanted to plan my **secure yet independent** stay somewhere before people around me start avoiding me or my phone calls, fearing that they will have to take care of me in a medical or other emergency as my children are staying abroad. I do not wish to be a burden on anyone. So, I had decided long back to get an apartment in a home for seniors, which offers a comfortable lifestyle and healthcare and a good security system.

Gagan Nulife, Kamshet, a resort residence for seniors, of international standards, provides me with my two important basic needs, healthcare and security, and convenience of hassle-free living, offering many more facilities. Such as

- Daily housekeeping and concierge/ caretaker services, and weekly laundry service.
- Regular shuttle services to nearby areas.
- Highly trained and experienced security to ensure the safety and comfort of residents
- 24x7 Ambulance service with driver on call to ensure transportation in case of medical emergency
- A Wellness Center with qualified and trained nursing staff on call 24X7
- A fully equipped hospital, which is almost ready and will be operational within a month—OPD has already started
- 100% Power Back Up --24x7 genset backup in your apartment and also for lifts/elevators of all buildings, common lobbies areas of each wing, staircases and pathways moving all along the campus so you don't get stuck up anywhere to reach your home
- Nutritious, simple yet delicious food featuring many regional favourites in a large community dining hall
- E-Kart or Buggy on call for inter campus travel enabling you to move anywhere in the campus and not confining to your house due to restricted mobility issues

So far, I am glad that I managed to take a sensible decision of settling here in this wonderful, safe and secure environment and thoroughly enjoying my **Aadhunik Vanaprasthashram.**

*

# चलो थायलंड-बँकॉक-पटाया

**⁎ अपर्णा कीर्तिकर ⁎**

Some travel to Discover, some travel to explore, some travel to escape, some travel to celebrate.

We travel to celebrate.

बहिणीचा व भावाचा पासपोर्ट आला आणि आता कोठेतरी परदेशी वारी करावी असे ठरले. इतरांप्रमाणेच प्रथम साऊथ इस्ट एशियाच्या 'बँकॉक-पट्टायाला' भेट देण्याचे ठरले. कारण सध्या लँड फ्री डेस्टिनेशन असलेल्या थायलंडने पर्यटकांना मोफत व्हिसा उपलब्ध केला आहे. त्यामुळे देशांतर्गत फिरण्याइतक्या खर्चात आपण थायलंडची परदेशी वारी करू शकतो.

प्रसन्न वातावरण, स्वच्छ व पारदर्शक पाणी असलेले समुद्र किनारे, विविध जलक्रीडांची (वॉटर स्पोर्टस्) उपलब्धता, थायफूड, माशांच्या विविध लज्जतदार प्रकारांचा आस्वाद आणि त्याबरोबरच स्वस्त आणि मस्त खरेदीसाठी थायलंडला पर्यटकांची नेहमीच पहिली पसंती असते.

त्यामुळे आम्ही तिघी बहिणी, भाऊ, बहिणीचे यजमान व मुलगा असे सहाजण निघालो थायलंडला. भाच्याने सहलीचे सर्व नियोजन केले व त्याप्रमाणे आम्ही २४ नोव्हेंबर २०१८ रोजी सकाळच्या विमानाने निघून सुमारे ४ तासांच्या प्रवासानंतर बँकॉकच्या 'सुवर्णभूमी' विमानतळावर उतरलो. तेथून दोन तासाच्या प्रवासानंतर `Bangkok sukhumvit' ह्या हॉटेलमध्ये पोहोचलो. स्थानापन्न झाल्यावर तेथून सुमारे १० मिनिटांच्या अंतरावर असलेल्या 'स्वान रेस्टॉरंट'मध्ये भोजनासाठी गेलो. प्रथमच थाई जेवणाचा आस्वाद घेतला. विश्रांती घेऊन संध्याकाळी हॉटेलसमोरील रस्त्यावरून चालत चालत 'नाना स्कवेअर' (आपल्या 'नाना चौका'सारखे वाटले ना!!) व आसपास फिरण्यास गेलो. दुपारचे भोजन मनसोक्त व उशीरा झाल्याने रात्री स्ट्रीट फूडचा आस्वाद घेतला.

२५ नोव्हेंबर रविवार, सकाळी नाश्ता घेऊन स्थलदर्शनासाठी निघालो. प्रथम पाचूचा बुद्ध (एमराल्ड बुद्ध) व नजिकच असलेल्या 'द ग्रँड पॅलेस' पहाण्यास गेलो. मुख्य गाभाऱ्यात योगाच्या स्थितीत बसलेली ध्यानस्थ बुद्धाची मूर्ती मूल्यवान अशा पाचूपासून बनविलेली असून सुमारे ६६ से.मी. उंचीची ही मूर्ती भरजरी कपड्यात असते. १७८२ साली स्थापन झालेले हे देऊळ थायलंडमधील सर्वात पूज्य व पवित्र असे बौद्ध देवालय आहे. देवालयाच्या मठीमध्ये (आश्रम) भिंतीवर रामायणातील सुमारे १७८ भित्तीशिल्पे (म्युरल्स) साकारलेली आहेत.

१७८२ साली राज्यारोहण झाल्यावर किंग रामा फर्स्ट यांनी 'द ग्रँड पॅलेस' बांधण्याची आज्ञा केली. सुमारे २१८४०० चौ. मी. एवढ्या प्रचंड मोठ्या परिसरात अनेक सुंदर इमारती बांधलेल्या आहेत. १७८२ पासून १९२५ सालापर्यंत राजघराण्यातील सदस्यांचे अधिकृत निवासस्थान होते. राज्याचे प्रशासकीय कामकाजदेखील येथूनच चालत असे. आता मात्र फक्त सण-समारंभ व उत्सवापुरतेच राजघराण्यातील सदस्य याचा वापर करतात. या भव्य महालाच्या चहुबाजू पाचूचा बुद्ध, वस्तुसंग्रहालय इ. इमारतींनी वेढलेला आहे. बाहेरूनच हा परिसर दाखविला जातो. सेल्फी काढण्यासाठी उत्तम स्थान आहे.

बँकॉकमधील 'पहुडलेला बुद्ध' (रिक्लायनिंग बुद्धा) प्रसिद्ध असून ४६ मी. लांब १५ मी. उंच व ५ मी. लांबीचे पाय असलेली बुद्धाची प्रचंड मूर्ती सोन्याच्या मुलाम्याने मढवलेली आहे. मूर्तीची पाऊले पर्लने

## वात्रटिका
### मैत्री

बोक्याची झाली मांजराशी मैत्री
एकमेकांबद्दल दोघांनाही खात्री
उंदराची मात्र पाचावर धारण
दोघांची मैत्री त्याच्या भयाचं कारण

**-डॉ. सुमन नवलकर**

सुशोभित केलेली असून तळपायावर बौद्ध वचने चित्रित केली आहेत.

द टेंपल ऑफ डॉन किंवा वॅट अरुण. हिंदु देवता 'अरुण' (उगवत्या सुर्याची किरणे) यावरून ह्या देवालयास हे नाव दिले गेले आहे. किंग रामा २ याने हे देवालय बांधले असून 'चाओ फ्राया' नदीच्या (द चाओ फ्राया रिव्हर) पश्चिम तीरावर आहे. ८१ मी. उंच मुख्य पॅगोडामध्ये हे देवालय असून बँकॉकची ती निशाणी (लँडमार्क) आहे. मुख्य पॅगोडाच्या भोवती चार लहान पॅगोडा अशी त्याची रचना असून पोर्सलीनच्या तुकड्यांनी त्यांची सजावट केलेली आहे. पर्यटक मुख्य पॅगोडापर्यंत पायऱ्या चढून जाऊ शकतात. तेथून बँकॉकचा सुंदर नजारा दृष्टीस पडतो. वरून दिसणारे सूर्यास्ताचे दृश्यही मनोहारी आहे.

चातू चक हे बँकॉकमधील 'वीकएंड ओपन एअर मार्केट' स्वस्त व मस्त खरेदीसाठी प्रसिद्ध आहे. ह्या बाजारात असंख्य दुकानदार व फेरीवाले असून प्रामुख्याने विविध आधुनिक फॅशनेबल कपडे, पादत्राणे व इतर आभूषणे रास्त भावात मिळतात.

सोमवार १६ नोव्हेंबर रोजी सकाळी 'टेस्को मॉल' मध्ये खरेदीसाठी फिरलो. संध्याकाळी चाओ फ्राया रिव्हर क्रूझसाठी गेलो. वेगवेगळ्या कंपनीच्या असंख्य बोटी तेथे असून पर्यटकांची खूप गर्दी होती. आमची सहल संध्याकाळी ७ ते ९ अशी होती. त्यात रात्रीच्या भोजनाचाही समावेश होता. थायलंडची राजधानी असलेल्या बँकॉक शहराच्या मध्यवर्ती भागातून चाओ फ्राया नदी वहात असून या मुख्य नदीच्या काठाने थाई लोकांच्या वसाहती आहेत. या नदीतून जलप्रवास करणे हा एक वेगळाच अनुभव असतो. बोटीत बसून स्वादिष्ट जेवणाचा आस्वाद घेत नदीकाठची प्रमुख स्थळे विद्युत रोषणाईने झगझगत असतात. हे दृश्य सुखावून जाते.

मंगळवार २७ नोव्हेंबर सकाळी थायलंडच्या आरमाराचे जनक Krom Luang Chumphon Khet Udom Sak यांचे स्मृतिस्थान बघितले. त्यांचा १९ मे हा पुण्यतिथी दिवस 'द रॉयल थार नेव्ही डे' म्हणून साजरा केला जातो. नंतर सेन्ट्रल मॉलमध्ये शॉपिंगसाठी गेलो. भरपूर फिरल्यावर व थोडी खरेदी केल्यावर तेथील एका थाई रेस्टॉरंटमध्ये दुपारचे भोजन केले.

आज ताईचा वाढदिवस आमच्या हॉटेलमध्येच केक कापून व कॉन्टिनेन्टल जेवण घेऊन साजरा केला.

बुधवार २८ नोव्हेंबर रोजी सकाळी नाश्ता घेऊन रायाँगकडे प्रयाण केले. हे एक बीच डेस्टिनेशन असून गोव्यातील एखाद्या गावासारखे वाटले. आम्ही बनायन रिसोर्टमध्ये उतरलो. छोटी छोटी कॉटेजेस होती. रिसॉर्टच्या समोरच रस्ता व त्याला लागूनच लांबच लांब पण अरुंद किनारा व पलिकडे अथांग सागर. किनारा नारळीच्या झाडांनी व्यापलेला व त्यांच्या सावलीत असंख्य छोटी छोटी धाब्यासारखी ओपन एअर रेस्टॉरंट होती. किनाऱ्यावर फेरफटका मारून, सूर्यास्त पाहून तेथेच रात्रीचे भोजन केले. रेस्टॉरंटच्या बाहेर मोठ्या टाक्यांमधून जीवंत मासे (प्रामुख्याने मोठमोठ्या कोलंब्या) ठेवलेले होते. त्यातून ताजे जीवंत मासे काढून शिजवून देतात.

गुरुवार दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी नाश्ता घेऊन 'को-सॅमेट'ला भेट देण्यास गेलो. हे फारसे परिचित असे बेट नाही. पण सुंदर समुद्रकिनारे व ते कोरलने समृद्ध आहेत. जेथे जलक्रीडा फारशा केल्या जात नाहीत त्यामुळे पर्यटकांची फारशी गर्दा नसते. आराम करण्यासाठी व ताज्या माशांचा आस्वाद घेण्यासाठीच येथे पर्यटक येतात. स्वच्छ पारदर्शक, नितळ निळा समुद्र हे येथील वैशिष्ट्य, बँकॉकपासून सुमारे २ तासाच्या अंतरावर असलेले हे बेट थायलंडच्या आखाताच्या पूर्व किनाऱ्यावर आहे.

संध्याकाळी परत रिसॉर्टवर येऊन रात्री समुद्र किनाऱ्यावरील धाब्यावर बार्बेक्यू प्रॉन्सचा मनसोक्त आस्वाद घेतला.

शुक्रवार, ३० नोव्हेंबर रोजी सकाळी नाश्ता

स्थापना : २१-१०-१९६०

पेढी : २६ १४ ४६३०
वास्तव्य : २६ १६ २६९१
मोबाईल : ९७०२२२५५९९

।। श्री ज्योतिबा प्रसन्न ।।

# श्रीकांत बाबुराव हरचेकर ज्वेलर्स

## सोने, चांदी, हिरे व कल्चर्ड मोत्यांच्या दागिन्यांचे व्यापारी

: कामाची वेळ :
**सकाळी ९ ते १.००**
**सायंकाळी ४ ते ८.३०**
**सोमवार बंद**

भिडे बंगला, महात्मा गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व),
मुंबई - ४०० ०५७

करून किनाऱ्यावर असलेल्या मासळी बाजाराला भेट दिली. ताजे, फडफडीत विविध मासे बघून दृष्टीसुख अनुभवले.

त्यानंतर पट्टायाकडे प्रयाण केले. तेथे मरीन ड्राईव्हसारख्या रस्त्यावर असलेल्या 'बाबोना बीच फ्रंट लिव्हिंग' ह्या हॉटेलमध्ये आमची राहण्याची व्यवस्था होती. आम्ही स. ११.३० वाजता तेथे पोहोचलो. पण चेक-इन दुपारी २ वाजता होते म्हणून सामान तेथेच ठेवून सेन्ट्रल मॉलला भेट दिली. थोडी खरेदी करून दुपारचे भोजन करून रु. ३.३० वाजता हॉटेलवर परत आलो.

पट्टायासुद्धा तेथील समुद्रकिनारे, जलक्रीडा व वॉकिंग स्ट्रीट मार्केटसाठी प्रसिद्ध आहे. त्या रात्री प्रसिद्ध असा 'अलकॅझर शो' पहाण्यासाठी गेलो. बहुसंख्य 'लेडी बॉय' असून त्यांनी खूपच सुंदर नृत्ये सादर केली. अप्रतिम मेकअप, रंगीबेरंगी झगमगीत कपडे घातलेले हे लेडी बॉय सुंदर स्त्रियांसारखेच दिसत होते.

शनिवार १ डिसेंबर रोजी जलप्रवास करून जोमटींन बीचला भेट दिली. पट्टायापासून जवळच पण शांत अशा ह्या बेटाजवळ असलेले प्रवाळखडक, पहाण्यासाठी पर्यटक जातात. तसेच स्नॉर्केलिंग, अंडरवॉटर सी वॉकिंग, पॅराशुटींग, जेट स्किईंग, बनाना राईड ह्या जलक्रीडांसाठी हे प्रसिद्ध आहे. काचेचा तळ असलेल्या बोटीने आम्ही 'प्रवाळखडक' (कोरल्स) पहाण्यास गेलो. अर्धा तास फिरलो पण निराश झालो. परत किनाऱ्यावर येऊन वाळूत असलेल्या बीच चेअर्सवर बसून आराम केला. तेथेच दुपारचे भोजन केले. भावोजींनी व भाच्याने समुद्रात पोहोण्याचा आनंद लुटला व संध्याकाळी हॉटेलवर परतलो. रात्री हॉटेलच्या समोर असलेल्या वॉकिंग स्ट्रीटवर जाऊन थोडी खरेदी व भोजन केले.

रविवार २ डिसेंबर रोजी सकाळी बँकॉकला जाऊन परत मुंबईकडे प्रयाण केले. कुटुंबीयांसमवेत केलेले हे परदेशी पर्यटन संस्मरणीय झाले.

*

!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!



सौ. स्मिता व श्री. चंद्रशेखर विष्णू धैर्यवान

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Switzerland - Heaven on Earth & Picturesque Europe

✶ Nutan Jayant Kirtikar ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Travelling is my passion, and I have been indulging in it ever since my college days. I have been fortunate enough to have a husband who shares my passion and together we have travelled the whole of India, from Kashmir to Kanyakumari and from Dwarka in the west to Jagganath Puri in the east. In between we have been abroad to Singapore and Malaysia and also to Nepal, but the 7 sisters have still eluded us, which God willing, we will definitely visit in the near future. Earlier we used to plan and travel on our own, but after becoming senior citizens, we thought it prudent to go on conducted tours of reputed Travel Companies.

In the month of May this year, we went on our much awaited Europe tour, through a travel company which speicalises in Europe Tours. Our Kuwait Airways flight was from Mumbai to London with a three hour halt at Kuwait. On landing at Heathrow Airport we were greeted by a blast of cold air, which gave us an idea of the shape of things to come in the rest of our tour. The road from the airport to our hotel was lined with well-trimmed trees and the half an hour's drive was very refreshing. The temperature was below 10C, quite in contrast to the summer heat of Mumbai. On reaching the hotel we rested after more than 15 hours of travel.

Our real tour started the next day, with a visit to the Buckingham Palace, the seat of power of the British Royalty, which ruled our country for nearly 200 years. The outward architechture was quite simple, but what caught our attention were the multi-coloured uniformed guards. There were quite a few attractive monuments and gardens around the palance. The city tour of London covered trafalgar square, piccadilly Circus, Parlament Houses, Charing Cross station and london bridge (made famous by the Kindergarten Nursery Rhyme) on the river thames, and big ben, from atop the London Eye (the biggest Giant Wheel) we could see London city far & wide and it was very beautiful.

Afternoon was spent in exploring the Madam Tus Saud's, the world's largest



exhibition of wad works, which included many important Indian personalities also. The 3-4 storied museum had many different sections and was a photographer's delight. (at the end of the tour, we learnt that entire Europe is so clean and picturesque that one is glued to the camera to catch each and every scenic beauty)

From London we went to Harwich Cruise Terminal and set sail to Holland and reached there next day morning. The bunk bed cabing and the dining hall/bar of the cruise ship was quite an experience. From Holland cruise terminal we were picked up by a luxury coach, by which we travelled for the rest of our tour till Rome. The driver is called the coach captain, and our coach captain was Kevin who was very particular & knowledgeable. He did not lose his way even once covering about 4000 kms over



8-9 countries.

The biggest attraction of Holland was the stunning ''Kevkenhof'' Tulip Garden made famous by Amitabh and Rekha song in the film silsila. It has tulips of every hue & colour size & design and coverex a huge area of about 32 hectares with as many as 7 million tulips, daffodils and hyacinths. From there we proceeded on a one hour cruise along the ancient canals of Amsterdam and our overnight halt was at Gent, a beautiful small town. The next day we reached Brussels and visited ''ATOMIUM'' a giant steel structure having huge steel balls, interconnected by steel stems. Later we saw the magnificent ''Grand Place'', Town hall and royal palace and the much over rated ''Mannekin Piss'', in the evening we reached Paries and travelled along the famous ''Champs Elysees'' to see the ''Arc de Teiomphe'', ''Concorde Square'', ''National Assembly'' and the ''Louvre''.

The next day we saw the majestic EIFFEL TOWER from close quarters and were taken to



the top most level to get a birds eye-view of Paris. It was a lovely experience, travelling by two different lifts to reach the top most level, where it was extremely windy, but it was worth the effort, to get a full scale 360 view of Paris. After Lunch we travelled about 4 hours to reach.

The 6th day started with the tour of ancient town of Metz with its old churches, and avenues from where we proceeded to Germany's Black forest Region to see the famous Cockoo Clock Factory and savour the authentic Black Forest Cake. From there we travelled to Schaffhausen to view the magnificent Rhine Falls, considered to be one of the biggest in Europe. The boat ride in the river took us very close to the falls to experience the shower on our face & body.

The next day we reached Lucerne in Switzerland, the hallmark of our Europe tour.

Nobody was very much interested in seeing the Weeping Lion Monument carved out of single rock or the ancient Wooden Kappelbrucke Bridge. Everyone was eager to see Mount Titlis and enjoy the snow. There were a series of security checks on the way up. The First cable car ride took us to level one which had a restaurant serving Indian Foof (Paav Bhaji) the 2nd big Rotair Cable Car (which accommodated about 50 people) took us to the Ice Flyer Level. An open rope way (made famous in the Hindi Movie- An Evening in Paris) with snow all around us. It was a ride to remember for the rest of our lives. We enjoyed the snow which was slippery and difficult to walk on for about 2 hours. after which we returned to our hotel.

Next day we visited Liechtenstein - one of the smallest countries in Europe, and took a train ride through its capital Vaduj with a photo-stop near a pictureque stream. After lunch we crossed over to Austria and went to Watten to see the world famous SWROWSKI CRYSTAL MUSEUM. Later we travelled to innsbruck to see the Golden Roof and Helbinghaus - a building resembling a Wedding Cake.

After breakfast on the next day we preceeded to take a boat ride to Venice to see the saint Mark's Square and clock Tower, the





Murano Glass Factory and the Bridge of Sighs.

Later we enjoyed a Gondola ride in the canals of Venice and remembered the Amitabh and Zeenat Aman Song ‘‘Do Labzon ki Kahani’’ in the film ‘‘The Great Gambler’’.

Next day we went to the ancient and legendary city of Rome and saw the Trevi Fountain- known as the Fountain of Wishes and the Colosseum or the Amphitheatre where the Roman Kings and Royalty used to watch the Bull Fights and the other games. In the afternoon we saw the Vatican City - the smallest nation in the world. Here we saw the majestic saint peter's Basillica, The Vatican Palace and the Pope's residence.

On the last day we said goodbuy to our new found friends and proceeded to Rome Airport for our journey back to Home-Sweet-Home, with our mind flooding with memories of our Europe Tour.

*

!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!

सौ. स्वाती व श्री. प्रणवेश मूर्ति धैर्यवान

**With Best Compliments from**

# Dr. Sneha Kothare

MDS (Pediatric Dentistry)

**Tel: +91 98337 50115**

**With Best Compliments from**

# Sheetal
# &
# Vishal Bijlani

लेख

# औषधे तारक की मारक

**✶ रसिक विजयकर ✶**

शंभर-दीडशे वर्षांपूर्वी वैद्यक क्षेत्रात औषधांची क्रांती झाली नव्हती. जी आता आपण अनुभवतो. .तेव्हा प्लेगची साथ आली, टायफाईडची साथ आली की, रोगी हमखास दगावण्याचे प्रमाण कित्येक पटीने जास्त होते. एकच औषध सर्वांना सारख्याच मात्रेत देत असत, कारण भूल द्यावयाचे म्हणजे डोक्यात हळुवार सोटा मांडण्याची पद्धत होती. शंभर वर्षात आपण कोठून कोठे गेलो आहोत! मेडिकल टेक्निकल इंडस्ट्रीचे भरीव योगदान आहे. पण हे मेडिकल टेक्निकल इंडस्ट्रीचे वैद्यकीय तंत्रज्ञान निर्माण होताना होणारे बाजारीकरण हे एक नको असलेले वास्तव आहे ! हेदेखील तितकेच खरे.नवीन नवीन औषध कंपन्या नवीन नवीन औषधे घेऊन स्पर्धेत उतरू लागल्या. सर्व नफ्याची समीकरणे पटापट बदलू लागली.

वैद्यकीय व्यवसायाचे प्रथम शास्त्र म्हणजे औषध. डॉक्टर व औषध कंपन्या एक दुसऱ्यांना पूरक राहिल्या पाहिजेत. डॉक्टरने स्वत:च्या अनुभवांती पेशंटला कुठले औषध उपायकारक असेल हेच दिले पाहिजे. औषध कंपन्यांनी डॉक्टरवर दबाव आणून आपले खर्चिक औषध पेशंटला देण्याची कळत नकळत कृती करू नये.

सर्वसामान्य माणसाला दैनंदिन लागणाऱ्या वस्तू तो बाजारात जाऊन स्वत: बघून घेत असतो . दुकानदार त्यावर दबाव आणत नसतो की तुम्ही ह्याच वस्तू घेऊन जा. तसे करत असल्यास आपण सरळ दुसऱ्या दुकानात जाऊ शकतो. पण औषधखरेदीचे तसे नसते. डॉक्टरांनी सांगितलेली, औषधाच्या लिस्टमध्ये ज्या कंपनीची औषधे सांगितलेली असतात; तीच आपण खरेदी करतो .कारण आपला डॉक्टरवर विश्वास असतो. साधे अँटिबायोटिक औषध डॉक्टर ठरवत असतो. तो अधिकार कधीही पेशंटला येणार नाही. डॉक्टरांची खरेदीवर हुकमत किंवा सत्ता ही औषध कंपन्यांनी बरोबर ओळखली आहे. त्याचा ते आपल्या महा पाशवी नफेखोरीसाठी पुरेपूर फायदा करून घेतात. त्यासाठी या डॉक्टर मंडळींना निरनिराळी प्रलोभने दाखवली की ह्यांचे नफ्याचे टक्के अनेक पटीने वाढले जातात.

हल्ली विटामिन डी ची लाट आहे. सर्व जगभर खप वाढलाय. खरोखरच त्याचा उपयोग होतो का?कारण यावरील काही रिपोर्ट असेही दर्शवतात की 'विटामिन डी'मुळे कॅन्सर वाढू शकतो. हे विटामिन लघवीवाटे बाहेर टाकले जात नाही. इतर विटामिन सारखे शरीरात जमा होते. पण त्याचा साईड इफेक्ट होऊ शकतो. आता आपण काय खरं मानायचं ?

काही फार्मासिटिकल कंपन्या नवीनच क्लुप्त्या करतात. आपली जी कॅप्सूल बाजारात स्वस्त म्हणून खपली जात आहे तिचे उत्पादन बंद करावयाचे व त्यात काही उपयोग नसलेला घटक मिसळून तीच कॅप्सूल आता दामदुपटीने बाजारात आणावयाची म्हणजे पूर्वीची स्वस्त असणारी कॅप्सूल मिळतच नाही म्हटले कितीही महाग असणारी कॅप्सूल आपल्याला घ्यावयास भाग पडते.

काही कंपन्या नवीन अँटिबायोटिक काढतात. ही औषधे नेमक्या लोकांसाठी उपयुक्त असतात. पण कंपन्यांना अमुक मालाचे टार्गेट पूर्ण करायचे असते. विक्री अमुक टक्के झाली आहे हे दाखवायचे असते. मग त्याला हातभार कोणाकडून लागतो? नॉन ऍलोपथी डॉक्टर कडून. हायर अँटिबायोटिक साध्या सर्दी वर लिहून देतात. याचा परिणाम काय होतो? परिणाम म्हणजे त्या हायर अँटिबायोटिक्समुळे शरीरात रेजिस्टन्स निर्माण होतो व सरतेशेवटी औषध वाया जाते. जेव्हा हवे तेव्हा काहीही उपयोग होत

## जरा हसा!

✳ नवरा - नेहमी नेहमी 'आम्ही सारे खवय्ये' बघतेस! पण तुझ्या स्वयंपाकाला अजून चव नाही.
बायको - तुम्ही नेहमी 'कोण होणार करोडपती' बघता. मी काही म्हणते का तुम्हाला?

✳

---

नाही.

मल्टी नॅशनल फार्मास्युटिकल कंपन्यांना काही प्रमाणात प्रतिबंध करावयाचा असल्यास जेनेरिक औषधाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला पाहिजे. जेनेरिक औषध म्हणजे काय ? ब्रँडेड नेम औषध असतात .त्याच्या गुणवत्तेची तेवढीच परिणामकारक जेनरिक औषधे असतात. ब्रँडेड औषधासाठी जेवढ्या काळजीने उत्पादन केले जाते तेवढ्या काळजीने जनरिक औषधे बनवली जातात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेनेरिक औषधे ही ब्रँडेड औषधापेक्षा भलतीच स्वस्त असतात. सर्व डॉक्टरांना नेहमीची ब्रँडेड औषधे लिहिताना त्या बाजूला जनरिक औषधे पण लिहून देण्याची सक्ती केली पाहिजे. तरच ह्या जेनेरिक औषधाची लोकांमध्ये सजगता येईल. अशी औषधे मिळू शकतात याची लोकांना जाणीव होईल. प्रश्न राहतो तो म्हणजे अशी जेनेरिक औषधे फार थोड्या दुकानात उपलब्ध असतात. पुरवठा फार कमी असतो. सरकारने यात लक्ष घातले पाहिजे. यामुळे लोकांचा औषधे, गोळ्यांचा खर्च फार कमी होईल. पण असेदेखील ऐकीवात आहे की मल्टिनॅशनल फार्मासिटिकल कंपन्या आपल्या फायद्यासाठी काहीही करू शकतात. त्यामुळे जेनेरिक औषधाची उपलब्धता कशी कमी होईल ह्याची ते पुरेपूर काळजी घेतात .अशीही पाशवी पक्कड या फार्मासिटिकल कंपन्यांची आहे ! थोडक्यात जी औषधे आपणास घ्यावयास सांगितली जातात ती कितपत आपल्याला तारक आहेत की मारक आहेत याच्यावर नियमित लक्ष ठेवा.!

चिंतनिका

# अनुभव पत्र

**-मिलींद कोठारे**

साठी उलटल्यानंतर सहज विचार करीत असता एक विचार मनात डोकावला. माझ्यासारख्या सामान्य कर्तृत्वाच्या माणसाने आत्मचरित्र वगैरे लिहिणे म्हणजे हास्यास्पद होऊ शकते. परंतु बराच विचार केल्यावर माझ्या असे लक्षात आले की आपल्या आयुष्यात आलेला अनुभव नक्कीच नोंदवून ठेवावा. त्याचा उपयोग किमान आपल्या कुटुंबीयांना नक्कीच होईल.

अनुभवपत्रात खालील मुद्यांचा समावेश केल्यास ते पुढील पिढीस मार्गदर्शक होऊ शकते.

१) आपले बालपण अधिक चांगले कसे होऊ शकले असते; याविषयी टिप्पणी लिहावी.

२) आपल्या आयुष्याला मार्गदर्शक कलाटणी देणाऱ्या घटना (त्यातून घ्यायचा बोध)

३) आपल्या कुटुंबाचा जैविक वारसा (Genetic Strength) त्यामुळे आपले आयुष्य वेगळ्या दिशेने गेले असते का? (Career choice you need to make with these strength).

४) आपण पाळलेली अधिक शिस्त किंवा न जमलेली जी आपल्याला आपल्या पुढील पिढीकडून अपेक्षित आहे.

५) संपत्ती निर्माण करणे हे एका पिढीचे काम नाही. म्हणून जर तुम्ही काही उपाय / मार्ग शोधले असतील; तर ते पुढच्या पिढीला कळायला हवेत.

६) काही क्लृप्त्या किंवा धंद्याचे इंगीत (Skill sets/ Trade secrets you have developed which you want to pass on to family)

७) एखादी व्यक्ती किंवा संस्थेकडून आपल्याला मार्गदर्शन किंवा मदत झाली असल्यास त्यांचे ऋण फेडण्याची अपेक्षा आपल्या वारसाकडून असेल तर त्याचा उल्लेख अशा अनुभवपत्रात करण्यास काहीच हरकत नसावी.

✳

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# वसुधा

**✶ हेमंत विनायकराव तळपदे ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

'वसू ए वसू, माझा चष्मा कोठे आहे?' जयवंतराव हाका मारू लागताच वसुधा बाल्कनीतून आत आली आणि ''बाबा का जोरात हाका मारता? सर्व बिल्डिंगला कळले ना, तुमचा चष्मा हरवलाय तो. हा काय पेपरच्या खालीच ठेवला आहात.'' रोज तेच लटके भांडण. घरी आल्यावर जयवंतरावांना वसुधाच्या नावाचा जप करण्याची सवयच जडली होती. आणि वसुधालाही बाबांचे लटके हट्ट पुरवताना जरादेखील राग येत नसे. जणू काही हे सर्व तिच्या अंगवळणी पडले होते. वसुधाची आई मालतीबाई मात्र या वादात पडत नसे. ती जयवंतरावांना चांगलीच ओळखत होती. या माणसाचे आपल्या पोटच्या पोरीवर अपार प्रेम आहे हे ती जाणून होती. आणि जयवंतरावांनाही वसुधाशिवाय चालतच नव्हते. घरी असले की काहीना काही कारण घेऊन ते वसुधाच्या नावाचा जप करत. वसुधाही त्यांच्या मागण्या निमूटपणे पूर्ण करत असे. मग कधी पेपर दे, चहा कर, थोडेसे पोहे कर अथवा माझ्याबरोबर कॅरम खेळ असे अनेक प्रकार.

आता वसुधा २२ वर्षांची झाली होती. जयवंतराव व मालतीबाई रानड्यांचे हे एकमेव अपत्य. अभ्यासात हुशार. शाळेत प्रथम पाच क्रमांकात उत्तीर्ण होणारी सालस मुलगी. घरी नमुनेदार कोकणस्थ ब्राह्मणी संस्कार. पूजापाठ, देऊळ, उपवास अंगी बाणवलेले. मालतीबाईंच्या प्रेम शिस्तीत वसुधा चांगले शिक्षण घेऊन एमएससी झाली व एका नामांकित कंपनीत ती नोकरी करत होती. जयवंतरावांना आपल्या पोरीचा नेहमीच अभिमान वाटत असे. माझी मुलगी उच्चशिक्षित आहे, संस्कारी आहे; आम्हा दोघांचा जीव की प्राण आहे; हे सांगताना त्यांचा स्वर किंचित उंचावत असे. तसे पाहता जयवंतराव रानडे केवळ इंटर कॉमर्स उत्तीर्ण. घरच्या बेताच्या परिस्थितीमुळे ते लवकरच नोकरीला लागले. सदूमामांच्या ओळखीमुळे त्यांना देना बँकेत नोकरी मिळाली. वेळेवर लग्न झाले आणि मालती सहस्रबुद्धे ही सालस मुलगी मालती रानडे होऊन त्यांची धर्मपत्नी झाली. दीड वर्षात त्यांना अपत्य झाले. त्यांनी लाडाने तिचे नाव 'वसुधा' ठेवले. वसुधा दिसायला नीटनेटकी होती. आठव्या वर्षी जयवंतरावांना तिच्यात गायनाची उपजत आवड आहे हे उमजले. त्यांनी तिला प्रोत्साहन देत पाबळकर सरांकडे तिची गायनाची शिकवणी सुरू केली. जयवंतरावांना रागदारीविषयी ज्ञान नव्हते. पण आपली वसुधा चांगला सराव करते हे पाहून ते मनोमनी सुखावत. मालतीबाई आपले मातेचे कर्तव्य चोख बजावत. वसुधाची शाळा, गाण्याची शिकवणी, गृहपाश, सखोल वाचन, खाणेपिणे इ. गोष्टी काटेकोरपणे सांभाळत. पण तरीही वसुधा व बाबांचे एक वेगळेच नाते होते. दोघेही एकमेकांच्या स्वरांच्या हिंदोळ्यावर उमजत. बाबांना वसू आणि वसुला बाबा आदर्श होते.

आता वसू २३ वर्षांची झाली होती. तिला शास्त्रीय गायनही चांगलेच अवगत झाले होते. पाबळकर सरांनी अनेक कार्यक्रमात तिला गाण्याची संधी दिली. जयवंतराव स्वत: वेळ काढून तिच्या शास्त्रीय मैफिलींना हजर रहात. तसा त्यांचा इमिटेशन ज्वेलरीचा व्यवसाय होता. पण वसुशिवाय त्यांच्या जीवनात रंगच नव्हते. अशाच एका गाण्याच्या मैफिलीत त्यांची ओळख पुण्याच्या केळकरांशी झाली. केळकर कुटुंब पुण्यात मगरपट्टा परिसरात स्थायिक होतं. केळकर स्वत: एसबीआय बँकेत ऑफिसर तर पत्नी शारदा माध्यमिक शिक्षिका. त्यांचा एकच मुलगा शशांक २७ वर्षांचा होता. नुकताच गेली २ वर्षे तो वकिलीची प्रॅक्टीस करत

होता. केळकर कुटुंबाशी जुजबी ओळख हळुहळू वाढत गेली. अन् दिवाळीच्या दिवसात केळकरांनी वसुधाला मागणी घातली. जयवंतरावांना वसुधाचे इतक्या लवकर लग्न व्हावे हे मान्य नव्हते. पण मालतीबाईंनी 'लग्न करण्यास काय हरकत आहे? समोरून मागणी आहे तर आपण का नाकारावे?' असा विचार ठेवला. वसुधाने मात्र बाबांना मान्य असेल तर मी लग्नास तयार आहे असे मत मांडले. शेवटी जयवंतराव लग्नास मंजुरी देण्यास तयार झाले व पुढच्या मे महिन्यात वसुधा व शंशाकचे लग्न धूमधडाक्यात पार पडले. लग्नासाठी पुण्याची मंडळी दादरच्या हॉलमध्ये उतरली. जयवंतरावांनी सर्व खर्च सढळपणे केला. वसुला ऐकावे लागू नये म्हणून मालतीबाईंनी वरपक्षाचे मानपान, विधी, स्वागत चांगलेच केले. आलेल्या पुणेरी पाहुण्यांनीही जयवंतराव मालतीबाईंच्या आतिथ्याचे कौतुक केले अन् सरतेशेवटी वसुच्या पाठवणीचा क्षण उभा राहिला. जयवंतराव मनाने कोसळलेच होते. आपल्याला आपली वसुधा आता आपणास दुरावणार ह्या विचारांनी त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. वसुधाही त्यांना घट्ट बिलगली व रडू लागली. शेवटी मालतीबाईंनी धीर करून त्यांना वेगळे केले व शशांकच्या हाती वसुधेला सोपवले. 'आमची वरू हळवी आहे हो, तिचा नीट सांभाळ करा', ही आर्जवी विनंती जयवंतरावांनी केळकरांना केली. केळकरांनीही 'घाबरू नका. मी आहे' अशी प्रेमळ हमी जयवंतरावांना दिली. शेवटी वसुधा रानडे ही मुलगी वसुधा केळकर म्हणून शशांकची अर्धांगिनी झाली. शशांक तसा मनाने समंजस मुलगा. त्याला वसुधा मनापासून आवडली होती आणि वसुधाही एक अनमोल संस्कारी हिरा होती. फक्त तिच्या सासूबाई शारदाबाई थोड्या कडक व तापट स्वभावाच्या होत्या. मी म्हणेन तेच खरे ही त्यांची उपजत वृत्ती होती. आणि तेच वसुधाला जड जाणार होते.

लग्न झाल्यावर वसुधा सासरी पुण्याला आली. नवीन माणसे, नवीन घर, मगरपट्ट्यासारखा विकसित होणारा विभाग. पण वसुधा समंजस होती. मुख्य म्हणजे मालतीबाईच्या प्रेमळ पण संस्कारी शिस्तीत वाढलेली होती. तिचे मन अजूनही बाबा आणि आईसाठी तळमळत होते. खासकरून आपल्या वियोगामुळे बाबांची मन:स्थिती काय झाली असेल याचा तिला अंदाज होता. तसा तिचा नवरा शशांक प्रेमळ व समंजस होता. पण आपल्या आईच्या अहंभावाची त्यालाही कल्पना होती. म्हणून सुरुवातीलाच त्याने वसुधाला, 'सर्व काही चालेल पण फक्त आईशी जमवून घे' असा प्रेमळ सल्लाही दिला. सासरे सुजीत केळकर उमदे व्यक्तिमत्व होते. पण शेवटी त्यांचेही शारदाबाईंच्या हेकेखोरपणापुढे चालत नव्हते. वसुधाने आपले केळकर कुटुंबातील स्थान ओळखले व ती हळुहळू केळकर कुटुंबात स्थिरावली.

पण चार महिन्यांनी एक अघटीत झाले.

**कविता**

## माझा प्रियसखा

**-सुहासिनी कीर्तिकर**

शिणून भागून मी
येता उंबरठ्याशी
दोन्ही हात पसरून
वाट पहात उभा असतो राजा
माझ्या घराचा दरवाजा
नको असलेले 'मॅटर'
'डिलीट' करून, कंटाळून
मी गच्चीत मारते फेऱ्या
तेव्हा माझा सखा बिलगतो जरा
तो असतो झुळझुळता वारा.
का करायचा ताठा?
कशाला करायचा आटापिटा?
कशाकरता तुडवायच्या संसारातल्या वाटा?
सगळ्या प्रश्नांची रसाळ उत्तरं देतो
माझा स्वयंपाकघरातील ओटा.
हे सगळे माझे मित्र म्हणतात,
''अगं वेडे!
रोजच असतो तुझा
व्हॅलेन्टाईन्स डे!''

*

## वात्रटिका

### व्हॉटस्ॲपच्या तालावर

बस, ट्रेन, घरात, बाहेर
आपलं एकच छान,
नाही भूक, नाही तहान,
नाही वेळेचं भान
स्मार्टफोनवर झुकून-झुकून
दुखू लागलीय मान,
व्हॉटस्ॲपच्या तालावर
डुलतंय खानदान

**-डॉ. सुमन नवलकर**

वसुधाच्या आईला अचानक हार्टअटॅक आला. त्यांना अंधेरीला खाजगी रुग्णालयात भरती केले. जयवंतरावांनी फोनवर वसुधाला बातमी सांगितली. वसुधाचे अवसान तेथेच गळाले. पण शशांकने तिची समजूत घातली. ''आपण त्वरित कारने मुंबईला जाऊ'' असे सांगून त्याने मुंबईला जाण्याची तयारी सुरू केली. पण शारदाबाई आडव्या आल्या. ''ताबडतोब जाण्याची गरज नाही. थोड्याच दिवसात त्या ठीक होतील. मग आपण सर्वजण जाऊया. आज बुधवार आहे. शनिवारी केळकर लवकर घरी येतील. मग चार तासात मुंबई गाठू'' असा त्यांनी हेका ठेवला. वसुधा आता बिथरली. तिची लाडकी माय जीवन मरणाच्या दारी होती. बाबा एकटेच पडले होते. ते त्यांच्या लाडक्या वसुच्या आधाराची वाट पहात होते. आता थांबणे शक्य नव्हते. वसुधाने सासूबाईंना विनवणी केली, ''पाहिजे तर मी एकटीच जाते. आपण शनिवारी कारने या.'' असे सांगितले. शेवटी शशांकने आईची समजूत घातली. ''आम्ही दोन दिवसात परत येऊ. मग तुम्ही निघा.'' असे आईला समजावले. शेवटी केळकरांनीही मध्यस्थी केली. शशांक व वसुधा ताबडतोब कारने निघाले. हॉस्पिटलमध्ये बाबांना गंभीर व उद्विग्न बसलेले पाहून वसुधाला रडू कोसळले. जयवंतराव खरोखर हादरले होते. मालतीबाईंचे असे काही होईल हे त्यांच्या स्वप्नातही नव्हते. त्यांनी वसुधेला गोंजारले व ''देव आपल्याला या संकटातून निश्चितच तारेल,'' असे ते म्हणाले. आता वसुधा व शशांकने हॉस्पिटलचा भार उचलला. आईची औषधे, डॉक्टरांशी बोलणे, जयवंतरावांचे जेवण इ. कामे वसुधाने स्वीकारली. शशांकही जयवंतरावांबरोबर सावलीसारखा राहिला. नातेवाईक विचारपूस करत होते. कॉलनीतली माणसे मधेमधे येत होती. पण आणखी दोन दिवसात मालतीबाईंना दुसरा अटॅक आला. डॉक्टरांनी शिकस्त केली व त्या बचावल्या. वसुधा आईसाठी तळमळत होती. रडूनरडून तिचे डोळे सुजले होते. घरातील वातावरण पार बदलले होते.

पण रविवारी दुपारी शशांकचा फोन वाजला. पलीकडे शारदाबाई बोलत होत्या. त्यांनी मालतीबाईंना तब्येतीबद्दल शशांकला विचारले. परंतु शशांकने आजच सासूबाईंना दुसरा अटॅक आला व त्या सिरीअस आहेत असे सांगताच त्या भडकल्या. आपला मुलगा आपल्याशी खोटं बोलतोय, आपल्याला फसवतोय. काही करून तो मुंबईला राहू पहातोय, असे त्यांना वाटू लागले. सुनेने आपल्या मुलाला कह्यात घेतले. आता तो आईचे ऐकणार नाही असे त्यांना वाटले. त्यांनी शशांकला वसुधाला घेऊन पुण्यात परत ये. ताबडतोब नीघ, असे दटावले. शशांक भडकला व त्याने आईला इतकी निर्दयी होऊ नकोस. जयवंतरावांना आपल्या आधाराची गरज आहे. मालतीबाई खरोखरच सिरीअस आहेत असे सांगितले. पण शारदाबाई ऐकेनात. ''तू माझा मुलगा आहेस. माझे तुला ऐकावेच लागेल. जयवंतराव एकटेच निभावू शकतात. बायकोचे इतके ऐकू नकोस'' वगैरे दुषणे देत त्यांनी शशांकची कानउघडणी केली. शेवटी शशांकचाही नाईलाज झाला. त्याने वसुधेला ''आपण पुण्याला परत जाऊ व मग ७-८ दिवसांनी आईचे मन वळवून परत येऊ'' असे समजावले. वसुधा मनोमनी उदास झाली. आपला नवराच या कठीण समयी आपली पूर्णपणे पाठराखण करत नाही; याचे तिला फारच लागले. पण तरीही ती जाण्यास तयार झाली. तिला मात्र आईला या स्थितीत सोडून जाणे फारच जड जात होते. पण जयवंतरावांनी तिची मन:स्थिती ओळखली व 'वसू, घाबरू नकोस. देव आपल्या पाठीशी आहे. मालतीचे काहीही वाईट होणार नाही. तू आपल्या घरी परत जा. सुखाने संसार कर' असे निक्षून सांगितले. वसुधाचा

नाईलाज झाला. ती शशांकबरोबर पुण्याला परतली. त्या दोघांना परतलेले पहाताच शारदाबाईंचा अहंकार शांत झाला. पण वसुधा व शारदाबाईंच्या नात्यात एक स्पष्ट दरी उभी राहिली.

काळ धावतच होता. सुदैवाने मालतीबाई घरी आल्या. जयवंतरावांनी जेवण्यासाठी व घरकामासाठी बाई ठेवली होती. वसुधाचा फोन सकाळ संध्याकाळ सुरू होता. आईची अपार माया व वडिलांचे वास्तव्य तिला तिच्या कर्म कमतरतेची जाणीव देत होते. पण सासुबाईंच्या अहंकारी स्वभावापुढे तिचे काहीही चालत नव्हते. शशांकलाही आईचे वागणे पटत नव्हते. पण तो गप्प होता.

-आणि आता कालचक्र उलटे फिरले. शारदाबाईंना ताप येऊ लागला. सुरुवातीला वायरल इंफेक्शन वाटले. शारदाबाईंनी एक गोष्ट डॉक्टरांपासून लपवून ठेवली होती. त्यांचे डोके नेहमीच दुखत असे. त्यामुळे रात्री शांत झोपेसाठी त्या पेन किलर्सची स्ट्राँग गोळी घेत असत. त्यामुळे कदाचित की काय; त्या गोळ्यांचा वाईट परिणाम त्यांच्या दोन्ही किडन्यांवर झाला. आणि त्यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या. जेव्हा हे स्पष्ट झाले तेव्हा केळकर कुटुंब मानसिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाले. काय करावे या विवंचनेत केळकर व शशांकला रात्र सरत नव्हती. शारदाबाई तर गप्पच झाल्या. या जगात आपण फार काळ जगणार नाही याची त्यांना जाणीव होती. डॉक्टरांनी केळकरांना किडनी प्रत्यारोपण पर्याय सुचविला. पण ते इतके सहजसाध्य नव्हते. कारण शारदाबाईंच्या किडणीशी जुळणारा दाता मिळणे आवश्यक होते. शशांकने त्याच्या मित्रपरिवारास दाता शोधण्याची विनंती केली. दिवस सरत होते. शारदाबाईंची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत होती. वसुधा निमूटपणे घरची कामे करत होती. पण तिचे संसारी मन आतल्या आत झुरत होते. शारदाबाई कशाही वागल्या तरी त्या तिच्या सासूबाई व शशांकच्या आई होत्या. कसेही असो ती केळकर कुटुंबाचा एक घटक होती आणि तिने निर्णय घेतला.

आठवड्याभरात सकाळी दहा वाजता डॉ. सानेंनी केळकरांना फोन केला. ''एक आनंदाची बातमी. किडनीदाता सापडला आहे. तुम्ही आज संध्याकाळी शारदाबाईंना हॉस्पिटलमध्ये दाखल करा. जमल्यास दोन-तीन दिवसात किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करावी लागेल.'' असा तो फोन होता. केळकरांनी किडनीदात्यास किती पैसे द्यावे लागतील अशी विचारणा केली. पण किडनीदाता उदात्त मनाने किडनी दान करत आहे असे डॉ. सानेंनी सांगितले. संध्याकाळी शशांक व केळकर शारदाबाईंना हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले. वसुधा मात्र ''कॉलेजच्या लग्न झालेल्या मैत्रिणीकडे जाऊन येते'' असे सांगून दुपारीच गेली होती. शशांक काहीसा चिडला होता. अशा वेळी वसुधाने सासूबाईबरोबर रहाणे जरूरी होते. पण मालतीबाईंच्या आजारपणात आईने केलेला अपमान वसुधाने मनात बाळगला असेल असे त्याला वाटले. दुसऱ्या दिवशी शारदाबाईंची किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाली व तो संपूर्ण दिवस शशांक व केळकर हॉस्पिटलमध्येच होते. वसुधाचा फोन स्वीच ऑफ येत होता. रात्री केळकर हॉस्पिटलमध्ये राहिले व शशांक घरी आला. त्याला बेडवर वसुधाची चिठ्ठी मिळाली. माझ्या खास मैत्रिणीचा अपघात झाला आहे. तिचे पती बाहेरगावी आहेत. मी सात दिवस शिवाजीनगरला तिच्याजवळ राहीन. नंतर तुम्हाला फोन करून सविस्तर सांगेन असा मजकूर होता. पण हा मजकूर संदिग्ध होता. शिवाजीनगरची मैत्रीण कोण? अपघात कसा झाला? याबद्दल वसुधाने अवाक्षरही लिहीले नव्हते. वसुधाच्या फोनची वाट पाहण्याशिवाय शशांकपुढे पर्याय नव्हता. तो मनात चरफडत राहिला.

पाचव्या दिवशी वसुधा घरी परतली. तिचा चेहरा मलूल होता. ती थकलेली वाटत होती. कदाचित मैत्रिणीच्या अपघाताने ती मनी खचली असावी असे

## वात्रटिका

### लेखक

आजोबा सांगायचे नातवाला रोज नवी गोष्ट
नातू म्हणे, 'झोपण्याआधी गोष्ट मला हवी'
गोष्टी रचून सांगता-सांगता आजोबांनी लिहिलं पुस्तक
गोष्टीवेल्हाळ नातवामुळे आजोबा झाले मोठ्ठे लेखक

**-डॉ. सुमन नवलकर**

केळकरांना वाटले. शशांकही नाराज होता. त्यानेही वसुधाकडे जास्त चौकशी केली नाही. संध्याकाळी शशांकबरोबर वसुधा सासूबाईंना पहायला हॉस्पिटलमध्ये गेली. पण शारदाबाईंनी तिच्याकडे पाहिलेही नाही. इतक्यात डॉ. साने शारदाबाईंना पाहण्यास आत आले. वसुधाला तेथे पाहून चपापले. पण बोलले नाहीत.

थोड्या दिवसांनी शारदाबाई घरी परतल्या. वसुधाने ओवाळणी करून त्यांचे स्वागत केले. केळकर मनोमनी खूष होते. शशांकही आनंदित होता. पण शारदाबाईंचा वसुधावरचा राग गेला नव्हता.

तीन महिने सरले. शारदाबाई व वसुधाच्या नात्यात एक दरी निर्माण झाली होती. दोघीजणी कुटुंबातल्या आपापल्या भूमिका वठवत होत्या पण मायेचा ओलावा त्या नात्यात राहिला नव्हता.

अन् एके दिवशी शारदाबाई सानेंच्या हॉस्पिटलमध्ये तपासणीसाठी गेल्या अन् एक विचित्र प्रसंग घडला. संध्याकाळी शारदाबाई घरी परतल्या. वसुधा स्वयंपाक करत होती. शारदाबाई स्वयंपाकघरात आल्या अन वसुधाच्या चक्क पाया पडल्या. वसुधा गांगरली. ''आई हे काय करताय? मला पापाचे भागीदार करू नका.'' असे वसुधा ओरडली. शारदाबाईच्या मागे केळकर व शशांक स्मितहास्य करत उभे होते. शारदाबाईंनी वसुधाला प्रेमाने कवटाळले व म्हणाला, 'वसुधा, खरंच मी धन्य आहे. तुझ्यासारखी त्यागमूर्ती सून म्हणून मला लाभली. पण मी मात्र अहंकारामुळे तुझ्याशी कठोर वागले. मला माफ कर. आजच दामलेबाई मला भेटल्या. त्या माझ्या वर्गमैत्रीण आहेत. तू डॉ. सानेंकडे किडनीदाता म्हणून नाव नोंदवण्यास गेलीस तेव्हा त्या तेथेच होत्या. त्या सानेंकडे हेडनर्स आहेत. तू त्यांना ओळखत नाहीस. पण माझी वर्गमैत्रीण असल्यामुळे तिने मला सर्वकाही खरे सांगितले. आजपासून तू माझी खरी मुलगी आहेस. मला तुझ्या आईबाबांचीही माफी मागायची आहे.''

वसुधा स्तंभितच झाली. तिने ही अपेक्षा केलीच नव्हती. पण नियतीला हे मंजूर नव्हते. त्या दिवसांपासून केळकरांचे कुटुंब एकदिल झाले. वसूधा सून नव्हे तर; मुलगी म्हणून त्या घरात वावरू लागली. जयवंतरावांची लाडकी वसू आता 'केळकरांची वसुधा' म्हणून घरात रमली.

कविता

# वरुणाचा रुद्रावतार

**-सौ. स्वागता विजयकर**

पावसाने केलाय कहर नि
नदी नाल्याना आलाय पूर ।
बुडले आहेत डोक्यापर्यंत
सातारा , सांगली आणि कोल्हापूर ।।१।।

मानव घरात बंदिस्त
तान्ही, रोगी भूकी आहेत ।
सर्वत्र निराशेचे सावट पसरलेय
मुकी जनावरही बुडली आहेत ।।२।।

वीज नाही , प्यायला पाणी नाही
जगाशी संपर्क तुटलाय ।
स्वप्नातही वाटले नसतील
अशा बिकट अवस्थेत फसल्यात ।।३।।

Army , Navy आणि NDRF
देव दूतासारखे वाटत आहे ।
आपल्या जीवाची पर्वा न करता
मदतीसाठी उभे आहेत ।।४।।

ह्याला जबाबदार कोण
असा विचार येतो मनात ।
शासन , माणूस की निसर्ग
दोषी मानणार कोणास ।।५।।

झालाय ह्या वर्षी
पुढच्या वर्षीही होणार ।
जर केलेत नाही प्रयत्न
तर संकट कसे हे टाळणार ।।६।।

*

पान उलटताना

# नाव असतं, म्हणून

**✶ डॉ. सुमन नवलकर ✶**

बारश्याला आत्या बाळाचं नाव बाळाच्या कानात हळूच सांगते. तेव्हापासून ते नाव बाळाला घट्ट चिकटतं. आपण त्या नावाने त्याला हाक मारायला लागतो. हळुहळू बाळाला समजायला लागतं की ते त्याचं स्वत:चं नाव आहे. त्याच नावाने शाळेत प्रवेश, नोकरीचा अर्ज, विवाह, पारपत्र, आधारकार्ड - सर्वांमध्ये हे नाव फिरत राहातं. पुढे ती व्यक्ती मोठी होऊन जर नावारूपाला आली, तर ते नावही सर्वतोमुखी होतं. 'आपलं मूलही या व्यक्तीसारखं मोठं व्हावं', या इच्छेने अनेक लोक आपल्या मुलांचंही तेच नाव ठेवायला लागतात.' नावामध्ये काय आहे?' असा प्रश्न विचारणाऱ्यांनाही जाणवायला लागतं की नावातच सर्वकाही आहे.

लग्नामध्ये पत्नीचं नाव बदलण्याची प्रथा आता हळु-हळू मागे पडत चाललीय. आपलं जन्मापासूनचं नावच पुढे चालत राहावं, याबद्दल स्त्रिया आग्रही होत चालल्या आहेत. जन्मापासून लावलेल्या नावाबद्दल त्यांना वाटणारी आत्मीयता हे याचं कारण असावं. किंवा जे नाव आपण आपली ओळख म्हणून सांगत आलो, ते आपल्यापासून हिरावलं जावं, ही कल्पना त्यांना अयोग्य वाटत असावी.

एखादी व्यक्ती काही कारणाने बदनाम झाली, तर त्या व्यक्तीच्या नावाविषयीही माणसांना तिरस्कार वाटायला लागतो. आपल्या मुलांची अशी नावं ठेवायला माणसं कचरायला लागतात. 'प्राण' किंवा 'प्रेम' नाव सहजा-सहजी कोणी आपल्या मुलांचं ठेवताना दिसत नाही. या उलट ऐतिहासिक किंवा पौराणिक काळातील थोर व्यक्तींची नावं आजही शेकडो वर्षानंतर तितकीच मान्यता पावलेली दिसतात. लग्नानंतर पती-पत्नींना एकमेकांची नावं रुचायला लागतात. त्या नावांभोवती त्यांच्या भावना आपोआपच गुरफटल्या जातात. याउलट एखाद्या व्यक्तीने आपल्याला कधी काही त्रास दिला, तर त्या व्यक्तीचं नावही आपल्याला त्रासदायक होतं. त्याच नावाच्या दुसऱ्या एखाद्या व्यक्तीबरोबर मैत्री किंवा नातं जोडायला आपण कचरू लागतो.

बहुतेक नावांना काही अर्थ असतात. चांगला अर्थ असलेली नावं लवकर लोकप्रिय होतात. पण नुपूर, काजल अशी काही नावं कानांना गोड लागतात; म्हणूनच लोकप्रिय झालेली आपण पाहतो. काळाच्या ओघात अनेक नावं विरून जातात. नवी नावं जन्माला येतात. यामुळेच आपल्या आजी-आजोबांची नावं आपल्याला भारदस्त वाटतात. नातवंडांची नावं पोरकट वाटतात. हीच नातवंडं पुढे आजी-ओजाबांच्या भूमिकेत जातील, तेव्हा त्यांचीही नावं त्या कालखंडात भारदस्त वाटायला लागतील आणि नातवंडांसाठी नवी पोरकट वाटणारी नावं निर्माण होतील. पूर्वी एखाद्या स्त्रीचं मूल जगत नसेल, तर जगावं म्हणून त्याचं दगडू, धोंडू, असं नाव ठेवण्यात येई. नाव ठेवण्यामागे भावना गुरफटलेल्या असायच्या त्या अशा. चेकवर नाव लिहिताना चुकून अक्षरात किंवा स्पेलिंगमध्ये फेरफार झाली तर चेक बाद होतो. मालमत्तेशी संबंधित कागदपत्रांमध्येही नाव अचूक असणं फार महत्त्वाचं असतं. वृद्धापकाळापर्यंत आपल्याला साथ देणारं हे नाव मृत्यूच्या प्रमाणपत्रातही आपली ओळख बनून राहातं. आपण आयुष्यभरात जे काही चांगलं-वाईट करतो त्यावर, आपलं नाव मृत्यूनंतर कशाप्रकारे घेतलं जाईल ते अवलंबून असतं. लोक तेव्हाही आपल्याविषयी बोलू शकतात, ते आपल्याला एक नाव असतं म्हणूनच.

✳

भवताल

# नीतिमत्ता

**★ प्रणिता प्रभाकर ★**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे... हा अभंग संत तुकाराम महाराजांनी १७व्या शतकात लिहून ठेवला होता. परंतु त्याचा मतितार्थ आज २१व्या शतकातही चांगलाच लागू होतो.

निसर्गाचे आणि मानवाचे नाते कालातीत आहे. परंतु मानवाने जसजशी प्रगती केली, तसतशी त्याला (माझ्या मते) एक प्रकारची धुंदी चढत गेली. तो इतका बेधुंद झाला की; त्याने सजीव-निर्जीव काहीही न पहाता स्वत:च्या सुखासाठी आपल्या मार्गातील अडथळ्याला दूर करण्यास सुरुवात केली. त्याचा समूळ नायनाट करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत राहिला. ह्या सर्वांच्या परिणामांची तमा बाळगण्याइतका वेळतरी कुठे होता त्याच्याकडे? नैसर्गिक संपत्ती जणू काही आपली स्वत:ची आहे असे त्याला वाटू लागले. शिक्षणाच्या जोरावर त्याने अनेक शोध लावले. स्वत:ला सुखात कसे ठेवता येईल ह्याचा फक्त त्याने विचार केला आणि तोसुद्धा नैसर्गिक संपत्तीच्या जोरावर! जसजशी वर्षे पुढे जात गेली व प्रगतीच्या वाटा मानवाला वाकुल्या दाखवून बोलावू लागल्या तसा तो बिथरला आणि नैसर्गिक संपत्तीवर घणाघाती हल्ला करण्यास सुरुवात केली. गिरीगुहेत, कडेकपारीत राहाणारा मानव व वल्कले नेसणारा मानव आज गगनचुंबी इमारतीत राहातोय व वल्कले जाऊन नानाविध तऱ्हेचे कपडे परिधान करतोय. गिरीगुहेत राहाणारा मानव निबीड काळोखात राहात होता. त्याला काळोखात/अंधारात उजेड असतो ह्याची अजिबात जाणीव नव्हती. कालांतराने मानवाने चरबीद्वारे उजेड कसा पाडता येतो ह्याचा शोध लावला व ही जवळजवळ ४००० वर्षांपूर्वीची गोष्ट होय. साहजिकच आहे की, सर्व प्राणिमात्रांमध्ये मनुष्यप्राणी हा सर्वात श्रेष्ठ मानला व गणला जातो. ह्याचे कारण म्हणजे देवाने दिलेल्या मेंदू नामक तल्लख अवयवामुळे. जसजशी वर्षे लोटली तसतशी मानवाने वेगवेगळे शोध लावून स्वत:ला यद्ययावत् स्थितीत आणले. सर हंफ्री डेव्ही ह्यांनी १८०२ मध्ये Incandescent light म्हणजेच प्रदीप्त दीप तयार केला/शोध लावला तो त्यांच्या खाणीतील उत्खननातील स्फोटापासून सुरक्षित राहण्यासाठी होय. त्याही आधी सुमारे १७४६ मध्ये बेंजामिन फ्रँकलिन ह्यांनी lightening rod म्हणजेच आकाशात चमकणारी वीज काठी होय, ह्याचा शोध लावला. अर्थातच त्यांचा सर्वश्रूत असलेला उजेडाच्या पतंगाचा प्रयोग होय. तर १८७७ च्या सुमारास सर थॉमस एडिसन ह्यांनी विजेच्या दिव्यांचा शोध लावला. ह्यासारखे अनेक शोध अनेक शास्त्रज्ञांनी लावले; परंतु त्याने निसर्गाची अजिबात हानी झाली नाही.

ह्या शोधांनी व उत्क्रांतीने मानवाला उत्स्फूर्तता मिळाली खरी, परंतु अगदी २०व्या शतकापर्यंत म्हणजे माणसाने चंद्रावर पाऊल ठेवले तेव्हापर्यंत त्याला मुळीच कल्पना नव्हती की, आज नवीन ग्रहावर ठेवलेले पाऊल उद्या आपल्याला घसरून पडायला लावेल. ह्याचा अर्थ असा नव्हे की, मानवाने जे पाऊल उचलले ते चुकीचे होते; परंतु चंद्रावर पाऊल ठेवल्याने मानवाला स्वर्ग दोन बोटेच उरला नाही; तर त्याचे हात स्वर्गालाच पोहचले की काय; असे वाटून मग तो एका वेगळ्या आवेशाने पुढील वाट सरू लागला. तो फक्त पुढे धावू लागला. मागे वळून पाहायला तो विसरला. आणि मग ह्या सर्वांचा जो व्हावयाचा तोच परिणाम होऊ लागला. आपल्या कर्तृत्वाने जर समोरचा दु:खी होत असेल किंवा त्याला यातना होत असतील किंवा त्याला सल पोहचत असेल तर नक्कीच आपण त्याकडे दुर्लक्ष न करता ते अनुभवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

हीच बाब आपण निसर्गाशी जोडू शकतो.

निसर्गाने आपल्याला भरभरून दिलेले आहे. कोणे एके काळी भारत हा समृद्ध देश म्हणून मानला जात होता. त्याला सुवर्णकाळ म्हणूनही लोक ओळखत होते. कारण भारत देश हा धनधान्याने विपुल असा देश म्हणून ओळखला जात होता. ही विपुलता पाहून माणसाच्या डोळ्यांवर एक प्रकारचा पडदा निर्माण झाला. त्याला काही सुचेनासे झाले व तो वेडापिसा झाला. ही नैसर्गिक संपत्ती आपलीच आहे व आपणच त्याचे मालक आहोत ही भावना त्याच्यात निर्माण झाली. माणसाने त्याचा पुरेपूर फायदा करून घेण्यास सुरुवात केली व त्याची परिणती जी व्हावयाची तीच झाली, व आज आपण सगळे त्याचे परिणाम भोगत आहोत. कुठलेही संचित जास्त वेळ टिकत नाही हे खरे आहे! निसर्गाचे जे संचित आहे किंवा होते त्याचा आपण स्वार्थी उपयोग केला व 'जसे करावे तसे भरावे' ह्या उक्तीप्रमाणे आपल्याला त्याची भरपाई करावी लागत आहे. आज सगळीकडे एकच आरोळी ऐकू येते. ती म्हणजे झाडे लावा... झाडे जगवा. माणसाला देवाने दिलेल्या मेंदू नामक अवयवाचा दुरुपयोग केला असे मी म्हणेन, कारण त्याने फक्त आपलीच प्रगती पाहिली, आपल्याच प्रगतीचा विचार केला. दुर्दैवाने निसर्गाशी कधीच संवाद साधला गेला नाही. त्यामुळे 'अति तेथे माती' ह्या म्हणीप्रमाणे निसर्ग आपल्यावर रुसला व त्याने स्वत:चे तांडव नृत्य करण्यास सुरुवात केली. परिणामी जागतिक तापमानवाढीच्या म्हणजेच global warming च्या भस्मासुराला तोंड देण्याची पाळी आपल्यावर आली आहे.आपण फक्त वृक्षतोड केली नाही तर नदी-नाले, समुद्र, डोंगर जे नैसर्गिक आहे त्यावर आपण मात केली व आपण पृथ्वीवर कसा स्वर्ग निर्माण करू शकतो हे दाखवण्याचा फोल प्रयत्न करीत राहिलो. स्वत:च्या भरभराटीसाठी डोंगर फोडून सपाट केले व त्यावर वस्ती निर्माण केली. कारखान्यातील निरुपयोगी वस्तू किंवा रसायने जवळच्याच नदीनाल्यात पुढचा पाठचा काहीही विचार न करता सोडून दिली गेली, ज्यामुळे पाणी दूषित झाले. प्लास्टिकचा कचरा समुद्रात टाकत गेलो. त्यामुळे जलचरांचे आयुष्य धोक्यात आले. म्हणजेच समुद्रातील माश्यांवर त्याचा परिणाम होऊ लागला. वृक्षतोड करून स्वत:साठी सोयी सुविधा म्हणजेच रस्त्यांचे रुंदीकरण, बस आगार किंवा मेट्रोसाठी आगार बनविण्यासाठी जंगल तोड करणे इत्यादी. हे फक्त आपल्या भारतातच नव्हे जगातही तेच सुरू आहे. अगदी काही महिन्यांपूर्वीची बातमी होय. ती म्हणजे ब्राझीलमधील अमेझॉन येथे पर्जन्य वनाला rain forest ला  लावली गेलेली आग सोयाबीनच्या शेतीसाठी लावली गेली. असो. परिणामी डोंगर फोडणे व वृक्षराजींचा नायनाट करणे म्हणजे पावसाचे प्रमाण कमी होणे व पर्यायाने मनुष्यप्राण्यावर पाणी-पाणी म्हणण्याइतपत वेळ येणे होय!

हे सर्व होत असताना आपणच आपल्या प्रगतीचा मारेकरी होऊ  अशी भीती एका शास्त्रज्ञाला वाटली व तो म्हणाला 'जे पृथ्वीवर स्वर्ग उतरवू पहातात/पृथ्वीला स्वर्ग बनवण्याचा प्रयत्न करतात ते दुसरे तिसरे काहीही न बनवता फक्त नरक बनवतात!' हे वाक्य आहे ऑस्ट्रियास्थित डॉ. कार्ल पॉपर (Dr Karl Popper) जे विज्ञानाचे प्रभावी तत्त्वज्ञानी होते. (Influential Philosopher of Science) त्यांनी विसाव्या शतकात Falsification Theory म्हणजेच बनावटीचा सिद्धांत प्रकाशित केला. ज्याचा अन्वयार्थ माझ्या लेखाशी मी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. तसेच सर टॉम स्टोपर्ड (Sir Tom Stoppard) एक ब्रिटिश नाटककार ह्यांनी त्यांच्या `The Coast of Utopia' ह्या  नाटकात एक छान वाक्य घातले आहे. `It is only we human who want to own the future too' आपणच आपल्या भविष्याचे मालक बनू पहातो / मानव स्वत:च स्वत:च्या भविष्याचा मालक बनू पहातो!!!

*

## जरा हसा!

* रस्ते साधे होते तेव्हा माणसे साधी होती.
आत्ता....
रस्ते डांबरी झाले
तेव्हापासून माणसे डांबरट झाली!!'

*

# The Veracious Velkars of Good OL' Mumbai

✶ Dr. Raikar ✶

Noted architect, accomplished author and committed activist, Pratap Velkar is undoubtedly one of our most cherished living lengends. His first book Lokmanya Tilak and Dr. Velkar is a timeless gem blessed with a discerning foreword by noted journalist and author Arun Tikekar. This is not your everyday biography, it is a treasure trove of invalubale information on Mumbai of Tilak's time, a vivid account of the city's participation in Lokmanya's political movement.

The book recounts the essence and significance of the symbiotic relationship between Lokmanya Tilak and the author's father Dr. Motiram Balkrishna Velkar; it also throws perceptive light on the lives and contributions of several selfless activists and mavericks who toiled under the stewardship of Lokmanya Tilak, including Dr. Velkar, Dr. D. D. Sathe, S. V. Lalit, Dr. N. D. Savarkar, and Dadasaheb Karandikar.

At the outset, the author provides a brief history of the Pathare Prabhu clan as also that of the Mumbai etropolis where the Prabhus settled for good. What follows is a fluid description of landmark events and movements steered by lgends like Vishnushastri Chiplunkar, Lokmanya Tilak, Shivram Mahadeo Paranjpe, and the great revolutionaries Chapekar Brothers as also key happenings including.

The highly purposeful social and political events of Dr. M. B. Velkar's student days, prime among them the W C Rand and Lt. Ayerst assassination, and the subsequent trial and execution of Chapekar brothers that left a deep impact on Velkar, then a school student.

the herculeam efforts of Dr. Velkar to inculcate nationalistic sentiments in fellow Mumbaikars of his time, especially the people of his Pathare Prabhu clan who, barring some great exceptions, were invariably known for their laid-back and insular notions of well-being and community develpment, as also their imprudent ''more loyal than the king' allegiances to the powers-that-be (which have sadly resurfaced with a vengeance among their so-called modern-day scions)

the unconditional faith that Dr. Velkar had in Lokmanya's vision, mission and leadership, and his tight rope walk as a practicing physician and a fierce social activist & Tilak follower.

Tilak's home rule movement and Mumbai's involvement in it, notably the brainwave of booking a Tilak special train to participate in the 1916 Lucknow Congress that Dr. Velkar and Dr. Sathe germinated and successfully implemented to the tee (a tradition that continued for the next four years, to attend the subsequent Congress sessions)

The 1918 special session of Congress and the historic protest during the willingdon Memorial meet of December 11, 1918 which saw Barrister Jinnah at his nationalistic best.

Tilak's 1919 England vist as the president of home rule league which had him and Dr. Velkar sharing the same accommodation (60 Talbot Road, Bayswater, London) as also

traveling together in P & O Egypt ship that left the English shores on November 6 and reached Ballard Pier, Mumbai on November 27. (Dr. Velkar chose to travel with Lokmanya rather than stay back in England to pursue the coveted MRCP degree, and he made the most of the journey time, relishing every bit of the edifying conversations with the great man.)

Tilak and Montagu-Chemsford reforms, Tilak Fund, and Tilak Purse

The last days of Lokmanya Tilak as Sardar Griha, Mumbai and life after Tilak

The outcome of Pratap sir's physical and intellectual labour is for all to see, only if we care to open our eyes and look back. In documenting the contribution of mavericks like the doctor duo of his father and Dr. Dinkar Sathye, both fierce Tilak loyalists and committed activists affectionately addressed as the Mumbai-based jai- Vijay dou of Lokmanya, Pratap sir had to preserve several weathered files, documents and notes-his father's correspondence and newspaper clippings - spanning two generations.

This book also cherishes the work of several lesser known karmayogis of that era, including the two dynamic siblings of the great V. D. Savarkar (one a literrary genius and the other a dental surgeon but both equally active in the national struggle), Tilak Follower Dadasaheb Khaparde, Bhosla Military School founder D. B. S. Munje, 'Sandeshkar' Achyutrao Kolhatkar, fearless martyr Anant Laxman Kanhere, Committed Pathare Prabhu Volunteer Dinanath Vittal Rao, only to name a few.

Even the annexures to the book are full of little known but illuminating facts - Tilak's command over language and his astounding people skills, his inclusive approach to public speaking, his sparkling sense of humour, his outstanding liberalism (which defied his 'orthodox Brahmin' image), the sheer diversity of his followers, his journalistic principles and editorial conviction, the clarity of his thoughts and beliefs, and scores of amusing annedotes and happenings during Tilak's England visit.

Dr. Velkar was no ordinary activist. In 1903. while still a teenager, he formed the Pathare Prabhu Knowledge improving Society, a body of young minds committed to nationalistic thought and action. The society regularly hosted talks and lectures of great thought leaders to inspire the common people to shun their regressive tendencies and become more holistic about crucial issues of national significance. In 1990, at his behest, a grand Pathare Pabhu exhibition of artistic creations held at Takurdwar, Mumbai had noted reformer Gopal Krishna Gokhale as the guest of honour, not some Britisher, as was the wont till that point in time. A few prejudiced old timers, unhappy with the new wave, asked him contemptuously "Why Gokhale, why not Tilak, who you rave about in public?"

(पान ५२ वर)

!!प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा!!

सौ. नीता
व
श्री. नरेंद्र जयकर

कथा

# कडू बदाम

✶ कै. शालिनी शामराव कोठारे (नागपूर) ✶

'अपराध माता काय मानी....' विद्या हे वाचता, वाचता नकळत गहिवरली. पुढे वाचत राहिली. तरीही पुढील पोथीवर नकळत दोन अश्रू खळलेच! मग मात्र वाचन बंद करून तिने मान वर केली. तिची नजर आकाशात दूरवर गेली. अजून पूर्ण उजाडलेही नव्हते. गॅलरीच्या दारात, गालिचावर बसून, ती नेहमी पोथी वाचत असे. या गॅलरीतून, आकाशाचाच तुकडा व उचंच उंच वाढलेले बुचाचे झाड फक्त दिसे. उभे राहून आसपास नजर फिरवली, तर मात्र घरामागच्या छोट्याशा जागेत लावलेली विविध झाडे दिसत.

आकाशाचे रंग क्षणोक्षणी पालटत होते. विद्याला आठवले, या रंगांबद्दलसुद्धा आईभाऊ किती कौतुकाने बोलत असत! 'बघ तरी, आपण इथे आलो तेव्हा समोरच्या घराच्या छपरामुळे सूर्योदय दिसत नसे. ऋतू बदलला अन् सूर्याची दिशाही बदललीय. काय झक्क दिसतोय बघ सूर्य! 'भाऊ, आईला सांगत असायचे. एखाद्याने 'गुड मॉर्निंग' म्हणून सकाळ छान करून टाकावी, तसेच आईभाऊंचे सकाळचे हितगुज विद्याला सुखावीत असे. परंतु या समोरच्या बदामवृक्षाने या सुखास कीड लावली.

या बदाम वृक्षाचे रोपण केले तेव्हा भाऊ किती खुषीत होते! एखाद्या लहानग्या कुत्र्याच्या पिल्लाची काळजी घ्यावी, तसे भाऊ या बदाम वृक्षाची काळजी घेत. मुंबईहून विद्याने आईभाऊंना तिच्या घरी आणले होते. तेव्हा तिचे मन साशंक होते. मुंबईत दादाच्या घरी येणारे, जाणारे नातेवाईक असत. इथे त्यांना करमणार कसे? हा प्रश्न तिला पडे. शिवाय त्यांचे औषधपाणी व्यवस्थित आपल्याला जमेल नं? ही देखील शंका डोकावून जाई 'गाडीचा प्रवास, या वयात सोसेल नं? नेऊ नं त्यांना माझ्याकडे?' - अशी रीतसर दादाची परवानगी घेऊनच तिने हे धाडसी पाऊल टाकले होते. परंतु इथे झाडाझुडपांच्या सोबतीत दोघेही छान रमलेली पाहून, विद्या निःशंक होत होती. गॅलरीत बसल्या बसल्या, 'प्रूनिंग हवं' म्हणत, आई कुंडीतील गुलाबांची पानं खुडीत असे. भाऊ रोज सकाळी डोक्यावर टोपी चढवून, हाती काठी घेऊन फिरून येत. येताना बकुळ, पारिजात, जास्वंद, मिळतील ती फुले आणून हार गुंफण्यास आईपुढे टेबलवर ठेवीत.

कधीकधी खालील बागेतच ते वेलणकर काकांबरोबर फिरत. विद्याने व वेलणकरकाकींनी छोट्याशा जागेत लावलेली झाडे ते न्याहाळीत. 'यंदा मधुमालती छान फुललीय नाही? क्लिसक्लिलचा वेल नीट वर चढवायला हवा' - असे भाऊ व वेलणकरकाकांमधील संवाद, पहिल्या मजल्यावरील गॅलरीत बसलेल्या आईच्या कानी पडत. क्वचित दोघेही हात मातीत घालत. त्याचवेळी लावलेले बदामाचे रोपटे पुढे रंगाचा बेरंग करणार हे विद्याच्या ध्यानीमनीही आले नव्हते. परंतु झाडाला तरी का दोष द्यायचा? लावलेल्या ठिकाणी बिचारे मुकाट वाढत होते. वारंवार त्या कटु प्रसंगाची आठवण देत बसत होते.

विद्याचे हात भराभर कामे आटोपीत होते. मन मात्र वारंवार भूतकाळात शिरत होते. अवेळी आलेल्या पावसाने गॅलरीतील सामानास स्नान घडत होते म्हणून त्या दिवशी विद्या हलवाहलवी करत होती. तिला मदत करण्याच्या उद्देशाने तिथे आलेले भाऊ लहान मुलासारखे पावसात भिजत होते. 'काय हे! कपडे बदला ते! सर्दी होईल! 'आई म्हणत होती 'काय एवढं वाकून पाहताय?' 'अगं ते बदामाचं रोपटं जगलंय! आयतं पावसाचं पाणी मिळतंय त्याला!' भाऊ म्हणाले. गॅलरीच्या पाईपमधून धार थेट बदामावर पडत असल्याचा नवीन शोध

लागल्यापासून, पाऊस नसतानाही भाऊ पाईपजवळ पाणी ओतू लागले.

एकदा खालून वेलणकरकाका म्हणाले, 'अहो घालू आम्ही पाणी!' 'छे हो! चांगली धार पडते इथून! तुम्ही बालदी उचलायचे कष्ट कशाला घेता!' या भाऊंच्या बालिश उद्योगामुळे, गॅलरीतील काही जुने आल्बम्स ओले झाल्याचे विद्याच्या लक्षात आले. तेव्हा तिने ते सामान गुपचूप उंचावर ठेवले. भाऊंचा निरागसपणा आणि प्रौढ समंजसपणा याचे मिश्रण विद्याला गंमतीचेच वाटे. सहा महिन्यात कितीतरी नवीन झाडे भाऊंनी खालच्या बागेत लावली होती. तऱ्हेतऱ्हेची फुले, पाने आणून त्यांची बॉटनीकल नावे सांगून भाऊंनी तिला समृद्ध केले होते. आईभाऊ असतानाच क्लिमक्लिलला पहिला बहर आला होता. सफरचंदी वासाचे ते गुलाबी गुच्छ निरखतांना विद्या आई भाऊइतकीच आनंदली होती. गावच्या आजोबांच्या घरासमोरील बुचाच्या वृक्षांची आठवण करून देणारे बुचाचे झाड, फूल न धरलेला परंतु भाऊंच्या प्रयत्नाने तरारलेला चाफा, कितीतरी लाडात आईभाऊंनी जीव गुंतवला होता. आईने 'नको, नको' म्हणावे तरी, भाऊ चवळी, डबलबीच्या वेलांना छोट्या बालदीने पाणी घालत. आता फुलांनी डवरलेली बोगनवेल, आईभाऊ असताना मात्र हिरवीकंच होती. कॅमेरा असता तर या डंवरलेल्या वेलीचा फोटोच काढून तिने आईभाऊंना पाठवला असता. ग्रिलवर झेपावणारी बोगनवेलीची फांदी बाहेर काढून खिडकी लावताना, तिची नजर परत खाली गेली. कोरांटीतील फुलातून वर आलेला बदामवृक्ष जणू तिच्याकडे पाहून हसत होता. इतक्या झाडाझुडपातून या बदामवृक्षाने मात्र तिला पार हरवले होते. आता अगदी गॅलरीत येऊन त्याने बदामफळ दिले तरी काय उपयोग होता? तिच्या उत्साही कर्मफळाला या बदामवृक्षाने कीड लावली होती.

बदामाच्या झाडावर पाईपमधून पडणाऱ्या पाण्यामुळे की काय त्याच्या मुळाशी कांटेकोरांटी चांगलीच फोफावली होती. खाली राहणाऱ्या वेलणकरकाकी देवपूजेसाठी कोरांटीची फुले तोडीत असत. एका पहाटेस वेलणकरवहिनींऐवजी त्यांची पाहुणी भाची फुले तोडीत होती. पहाटेच्या अंधुक प्रकाशात बदामाजवळ कोणी आहे हे भाऊंना जाणवलेच नसावे. त्यांनी वरून पाईपमधून सोडलेल्या पाण्याची धार सरळ पाहुणीच्या परडीत पडली. वीज कडाडावी तसे उच्च सुरात शब्द गरजले, 'काय हे! अंगावर पाणी टाकताय? दिसत नाही कोणी उभंय ते?' भाऊ एकदम दचकलेच (असावेत) 'अरे! सॉरी हं! पण स्वच्छ आहे हं पाणी!' पाहुणीला विनोद कळलाच नाही. 'स्वच्छ असलं म्हणून काय झालं? इतकीच हौस आहे तर खाली येऊन सगळ्याच झाडांना घाला की पाणी!'

पाहुणे इतके ताशेरे झाडेतो वेलणकर पती, पत्नी अंगणात उतरले. भाऊंनी ताबडतोब कापडाचा बोळा लावून पाणी बंद केले होते. पण का कोण जाणे, वेलणकरकाकांचाही पारा चढला. त्यांनीही अद्वातद्वा बोलायला सुरुवात केली. काकांचा ओळखीचा स्वर कानी येताच विद्या धावत गॅलरीत आली. तिने वाकून खाली पाहिले. तिचा चेहरा पाहून पाहुणीने नव्याने पाणी अंगावर पडल्याचे सांगितले. वेलणकर काका, काकीच्या चेहऱ्यावरील रागीट आविर्भाव पाहून विद्या चकितच झाली. 'तुम्हाला हे शोभत नाही' असे मोठ्याने न म्हणताच फक्त त्याअर्थी दृष्टिक्षेप त्रिकुटावर टाकून तिने भाऊंना हात धरून आत आणून खुर्चीवर बसविले. मोठ्यांचा आदर करावा - हे केवळ पुस्तकी ज्ञानच ठरावे? वास्तविक वेलणकर काका काकू वयाने भाऊंपेक्षा लहानच! पाहुणीने नाही परंतु त्यांनी तरी भाऊंच्या वयाचा विचार करायला हवा होता! कालपर्यंतचा सगळा गोडवा क्षणार्धात अपशब्दांनी धुळीत मिळवावा? भाऊ अजूनही दिग्मूढ अवस्थेत होते. तिच्या मनाच्या पाटीवर अपशब्दांचा चराच पडला होता. नशीब! आईच्या कानावर अजून काही गेले नव्हते! खालून अजूनही

## वात्रटिका
### रवानगी

छाप नाही, काटा नाही, नाणं असं खट्याळ
अक्षावरती राहायचं उभं तिन्ही त्रिकाळ
कधीही करा टॉस, नखरे त्याचे पाहून,
पिगीबँकेत रवानगी टाकली त्याची करून

**-डॉ. सुमन नवलकर**

बदसूर येत होते. वाईट पार्श्वसंगीताने रंगीत सकाळ बेरंगी झाली होती.

विद्याने भाऊंसमोर चहाचा कप ठेवला. गुपचूप चहा पिऊन झाल्यावर, टोपी घालून काठीसह भाऊ फिरावयास बाहेर पडत होते. विद्याला वाटले म्हणावे, 'थांबा! एकटे जाऊ नका, मीही येते!' पण ते कसे शक्य होते? आईला एकटे टाकून ती भाऊंबरोबर जाऊ शकत नव्हती. ती नकळत इतकेच बोलून गेली 'भाऊ, खाली काका काही बोलले तरी तुम्ही काही बोलू नका हं!' 'मी कशाला काही बोलेन! मला असं किती दिवस रहायचंय इथे!' भाऊंच्या उत्तराने तिच्यावर दिग्मूढ होण्याची वेळ आली. खरेतर तिला म्हणायचे होते, 'नाही भाऊ! गैरसमज होतोय तुमचा! ते माझे शेजारी म्हणून नव्हे तर तुमच्या वयाचाही मान न ठेवणाऱ्यांशी न बोललेलच बरं... किती झटक्यात मैत्रीचे बंध तोडले त्यांनी!

पण यातील काहीच ती बोलू शकली नाही. भाऊ न विसरता बागेचे फाटक बंद करून फिरायला गेलेही!

विद्याचे लक्ष कामात लागेना. भाऊंची वाट बघत ती पुढील गॅलरीत उभीच राहिली. थोड्या वेळाने भाऊ परतले. धोतराच्या सोग्यात आजही पारिजातकाची टवटवीत फुले होती. परंतु आज वेलणकरकाकींना त्यातील वाटा जाणार नव्हता. कथा कादंबऱ्यातून, मित्रमैत्रणींच्या अनुभवातून, विद्याने वृद्धांच्या अनेक समस्या वाचल्या व ऐकल्या होत्या. वृद्धापकाळी होणारी हळुवार मने, तरुणांच्या उधाणलेल्या मनांना जपता येत नाहीत. म्हणून समस्या उद्भवतात असे तिला वाटे. तरुणांच्या हुरुपाला, आधुनिकतेला, वृद्धांची अनुभवी काठी आडकाठी बनते, अशी तिची समजूत होती. पण या बदमावृक्षाच्या निमित्ताने हा समजही चुकीचा वाटू लागला होता. तरुणच काय, अनेक पावसाळे पाहिलेले वेलणकरदांपत्यही वृद्धास समजू शकले नाहीत? का? पाहुणीच्या तोफेला ते खीळ का घालू शकले नाहीत? भाऊंना अनोळखी समजून त्यांनीही ताडताड का बोलावे?

स्वत: विद्यानेही किंकर्तव्यमूढ बनून बसायला नको होते!'इतक्या वयोवृद्ध व्यक्तीस दुरुत्तरे करणे तुम्हाला शोभत नाही' - असे जर ती मोठ्याने म्हणाली असती तर प्रश्न सुटला असता? की शब्दाने शब्द वाढू नये म्हणून ती गप्प बसली-तेच बरोबर होते? भाऊंचे 'सॉरी' काकांना पुरेसे का वाटले नाही? स्वत:लाच प्रश्न विचारून विद्या अधिकच अस्वस्थ होत होती. 'मला असं किती दिवस रहायचंय इथे' हे भाऊंचे उद्गार वारंवार आठवून तिचे डोळे पाण्याने भरत होते. भाऊ स्वत:ला इथे 'पाहुणे' समजत होते - ही कल्पनाच तिला दु:खी करत होती. ज्या उमेदीने आपण आईभाऊंना मुंबईहून इथे आणले ती उमेदच या एका प्रसंगाने नष्ट झालीय असे तिला वाटू लागले.

आईभाऊ मुंबईस परतून काही वर्षे झालीत. आता तर त्यांची वेलणकरांशी गाठही पडणार नाही. परंतु त्या कटु प्रसंगानंतर आपण वेलणकरांना वरती चहापानास बोलवून भेट घडवली असती तर? परत मैत्रीचे सूर जुळले नसते. कदाचित पण न जाणे त्यांनी भाऊंना 'सॉरी' म्हटले असते का? आपल्या गप्प बसण्याने सारे चुकलेच का? विद्याचे मन तिला खात असते.



दारावरची बेल वाजली आणि विद्या भूतकाळातून वर्तमानात परतली. दार उघडताच, एक ओळखीशी वाटणारी परंतु अनोळखी स्त्री, कडेवर छोट्या बाळाला घेऊन उभी असलेली दिसली. ‘कोण आपण?’ असे तिच्या तोंडून निघण्याआधीच ती स्त्री म्हणाली, ‘मी खाली वेलणकरांकडे आलेयं. तुमच्या मागच्या गॅलरीतून झाडाचे बदाम काढता येईल का?’ ‘अं? बदाम?’ ‘हो, दोन तीन तयार दिसताहेत, काठीने काढू का खालून?’ ही तीच वेलणकरकाकांची भाची-भाऊंचा मनोभंग करणारी - खरे तर विद्याला तिच्या कडेवरील छोट्याला घेण्याचा मोह होत होता. पण तो टाळून विद्या म्हणाली ‘छे हो! फळे चांगली नाहीत - कडू आहेत त्याचे बदाम!’

दार बंद करून विद्या मागील गॅलरीत गेली. डोळ्यातील पाणी पुसता, पुसता, ‘कडू’ म्हटल्याबद्दल तिने बदामवृक्षाकडे बघत ‘सॉरी’! म्हणून टाकले.

(‘ललना’मासिकात पूर्वप्रसिद्धी व पारितोषिक प्राप्त कथा)


**!!प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा!!**

**सौ. वर्षा**
**व**
**श्री. विवेक सिद्धकुमार देसाई**


**कविता**

## अंतर

**सौ. उज्ज्वला र. ब्रह्मांडकर**

घेतो जेव्हा माणूस जन्म
नसते नाव, असतो श्वास
उत्सुकतेच्या नजरेमधुनी
आयुष्याचा असे आभास ।।धृ.।।
दिवसागणिक उमलते जगणे
इंद्रधनुषी हे भासे जीवन
इवलाल्या डोळ्यांतुनी दिसते
आकर्षक अन् सुंदर, छान
आयुष्य सरकते पुढे पुढे अन्
खूप पायऱ्यांचा हा ध्यास।।१।।
स्वप्ने बघतच घेई भरारी
आशा आकांक्षांचा पाऊस
तारुण्याच्या उंबरठ्यावर
श्वासात मिसळलेला दुसरा श्वास
जीवनाच्या चित्रात भरती
घटनांचे सप्तरंग खास।।२।।
मावळत्या दिनकरास साक्षी
जेव्हा माणूस ठेवी अंती
काय मिळविले, काय गमविले
हिशोब लिहितो मनावरती
इच्छा अपुऱ्या ठेवुनी जातो
असते नाव, नसतो श्वास।।३।।
श्वास आणि नाव यातले
अंतर म्हणजे आयुष्य असे
किती चालावे, कसे जगावे
गणित वेगळे याचे असे
आयुष्याचा पट उलगडतो
प्रत्येकाची रीत ही खास।।४।।

# अनुवाद-संवाद

## AGE

**By Late Shalinee Shamrao Kothare, Nagpur**

Age - I never denied you
You, who have been with me
The moment I was born
As a Baay, you were given the love
And pampering you deserved
Even as a toddler, my Mom
And my Grandmom
Gave their special attention to your needs
And while you were stepping away
From toddlership, giving me awareness
Of my duties, to learn the social norms,
To become a worthy social being;
Though yet a child,
My father lovingly met
All my tantrums and childish needs,
And uncle, a stern disceplainarian
scolded, yet felt a genuine love
For my poetic learnings,
How else would be give me
(and not my five siblings)
A book by the poet ‘Bee’?
I cherished the spcialness
And Age, all my writings
Displayed my understanding of you!
Oh, Age, even as you charged me
Every moment, every year,
From a child to youth, to a mature person,
And now an old woman,
Never a frivolous poet ever,
As I change with you,
My poems too were changing garb
As suited my Age -
That's You! My Age That's you!

## अरे माझ्या वया

अनुवादिका **-कल्पना सुभाष कोठारे**

**वया** - नाकारले ना मी कधीच तुजसी
जन्मले मी अन् बिलगलास मजसी
झाले लाड तव अती बाळपणी
पुरवले चोचले तुझे आई, आजींनी
लळा लाविला तुजसी त्या दोघींनी
तव बाळपणी, व्हावे तू मोठा म्हणुनी
मम राजहट्टाचा डोलारा सावरला वडिलांनी
वसा जपला प्रेमाचा शिस्तप्रिय काकांनी
उगीच का पाच भावंडा वगळुनी
‘बी’ कवींचे पुस्तक दिधले भेट म्हणुनी?
काव्यप्रेम माझे खचित ओळखिले काकांनी!
**वया** - मीही जपले तुज वेगळेपणी
जरी जाशी बदलत तू क्षणोक्षणी
शैशव, किशोरीपण, प्रौढत्व सजवुनी
विविधरंगी कवितांनी, ना उथळपाणी!
आता बदलले मीही तुजबरोबरी
जाहले वृद्ध स्त्री खरोखरी
बदलत्या कविता, बदलत्या वसनापरी
वया, सतत जाणवे ही तुझी
साथ, संगत आजही मनोमनी
वया, कवितेतही तुझी जाण होती
पदोपदी! पदोपदी!

# अनुवाद-संवाद

## When here eyes were closed

By **Sheena Marie D'souza**

Of starry skies and blinking lights
A night of dancing fire-flies
With little hopes and big dreams
When she closed her eyes, she felt alive

A familiar pace, a scent she knew
That's where it all was true,
With wider smiles and sorrows few
Scarlet and yellow but never blue

Under the veil of her eyes closed
Away from the chaos, her reverie grows,
with true hearts and tears never
Together for infinity, eternity forever.

For in her dream the majic lasts,
Open eyes - athing of the past.
With less hurt and more proyer
At least in her dreams, you are there.

To always have her eyes sealed
hire in a world that has been healed
Where all loved and no one hated
Be in the world, with closed eyes,
She created

(THE HITVADA, Nagpur)

## एक रजनी

**अनुवाद - कल्पना सुभाष कोठारे**

चांदण्या नभाची, लुकलुकत्या दिव्यांची
एक रजनी नाचऱ्या काजव्यांची
थोड्या आशा अन् मोठ्या स्वप्नांची
डोळे बंद होताच, जिवंत होणारी
एक रजनी.

ओळखीच्या जागेची, ओळखत्या सुवासाची
सगळं खरंऽऽ, खरंऽऽ वाटणारी
खूपशा स्मितांची, दु:खे इवलुशी
लालपिवळ्या रंगांची, नसेलच काळीशी
एक रजनी

बुरख्याआड, पेंगुळलेल्या डोळ्यांची
गोंधळापासून दूर, केवळ स्वप्नांची
खऱ्या मनाची, नव्हेच अश्रूंची
एकत्र मीलनाची, अमर अमरशी
एक रजनी

तिच्या स्वप्नात, न संपणारी जादुई
उघडळे डोळे बांधुन भूतकाळाशी
कमी वेदना अन् खूप प्रार्थनांची
स्वप्नी अगदी खरीखुरी भासलेली
एक रजनी

डोळे चिकट बंद करून
छानशा सुंदर अशा विश्वातून
प्रेमात डुंबून, द्वेष विसरून
बंद डोळ्यांनी जन्मास घातलेली
तिनेच रचलेली स्वप्नीलशी
एक रजनी!

***

(पान ४५ वरून)

Dr. Velkar's reply was epic ''You won't be able to digest Tilak's extremism. Instead. Gokhale's soft ways would suit you fine.''

In 1914. Dr. Velkar incepted the Pathare Prabhu Progressive Association for cherishing the teachings of Maharashtra's saints, imparting technical education, and contributing to the national movement. In 1917, he formed the Pathare Prabhu Volunteer Core which helped to maintain decorum during Congress rallies and key events and also provided timely aid in difficult times like during the Influenza epidemic of 1918.

As an active member of the Mumbai Municipality, his profound literventions upheld the cause of the common people: whether in the context of First Tenants Bill, Victoria Garden restoration, ensuring regular water supply to Mumbaikars, Voting by Ballot, Providing sanitary houses for labourers, or the inception of a cooperative bank for South Mumbai merchants. His recurring fear that the ghastly Communal Award will end up dividing India if not arrested in time proved prohpetic, immediately post 1947.

Today, Dr. M.B. Velkar Street of Kalbadevi, Mumbai continues to remind us of Dr Velkar's contribution, albeit not many travel companies and tour operators would include it in their glossy Must Visit recommendations.

I consider myself fortunate to have read this book, which was reviewed by my father for Maharashtra Times way back in late 1990s; Pratapsir's letter conveying his heartfelt sentiments to my dad is a prized bookmark housed within the book's insightful pages, a souvenir for posterity.

For more about this father and son duo-the Veracious Velkars of Good Of Mumbai - as also to know about Pratap Velkar's other books, visit http://historicaldocumentsofpratapvelkar.blogspot.com

Sadly, nobody seems to be managing this site, emails to the ID furnished on the site fetch no replies and the information furnished here has unknowingly taken the form of a dump. We hope someone from the family will eventually take the lead in conveying the essence and credence of this rich Velkar legacy to the public at large.

We were indeed fortunate to have a telecon with pratap sir, and we found him inimitably agile and full of life. His warmth is priceless, which no blog or website can ever think of replicating.

Thank you, Pratap sir, for the highly potent literature you have gifted us. Your contribution, like your father's, is exceptional.

*

**With best wishes from**



**Mrs. Ronica**
**and**
**Mr. Sachin Vijayakar**

## पाठारे प्रभु महिला समाज

* समाजाचा १०३ वा वर्धापन दिन २२-९-२०१९ रोजी खार येथील सांस्कृतिक केंद्रात साजरा झाला. विनायक जोशी यांनी राधेची विविध रूपे दाखविणारी लाजवाब गाणी सादर केली. या उत्सवाचा आणि महिला समाजातर्फे दीपावलीनिमित्त गरजू महिलांना होणाऱ्या लुगडी वाटपाचा सविस्तर वृत्तान्त पुढील अंकी.

कविता

## ‘काळ्या पैशांचं पोर’

**-हेमंत विनायक तळपदे**

जन्म झाला जेव्हा त्याचा सारे आप्तजन आनंदिले
वाटलेल्या माव्याच्या पेढ्यांनी कौतुक घरोघरी जाहले
पाळणा, बाबागाडी, तीनचाकी त्याने मनोसक्त उपभोगिली
काळ्या पैशाच्या किमयेने ऐहिक सुखे त्यास लाभली.
बाप ओरबाडत होता सरकारी नोकरीचा फायदा
मुलगाही उमजत होता काळ्या पैशाचा कायदा
उर्मटपणा रुजत होता जवानीच्या त्या उंबरठ्यावरी
पैशाचा मदहोश वाढे शिक्षणाकडे दुर्लक्ष होई.
अनेक उपद्व्याप वाढले धंदेही अनेक झाले
बापाच्या काळ्या पैशावर अनेक सौदे सहजी जाहले.
परि काहीतरी चुकलेच, कंपनीने तगादा लावला
पैसे वेळेवरी न पहुचता यमराज घरी उभा ठाकला
तीन गोळ्या सुसाटत सुटल्या. छाती अन् डोक्याचा भुगा झाला
काळ्या पैशाचा ठिसूळ इमला जमिनीत नामशेष झाला.

## वात्रटिका

### भिंत

भिंतीला त्या होते कान
शेजार-पाजारचं ऐके छान
नको तो मजकूर ऐकला थोडा
तेव्हापासून म्हणते कानाला खडा

**-डॉ. सुमन नवलकर**

## अभिनंदन

✳ ‘पाठारे प्रभु चॅरिटीज’ या संस्थेने आपले सन्मानगीत या वर्षीपासून तयार केले आहे. ते डॉ. सुमन नवलकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरले आहे. चॅरिटीज आणि डॉ. सुमन नवलकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

✳ विद्यार्थीप्रिय प्राध्यापक कै. प्रभुराम जोशी यांच्या स्मृत्यर्थ ‘ग्रंथसखा’ तर्फे कार्यक्रम केला गेला. मृदुला प्रभुराम जोशी या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

✳


**With Best Compliments from**

**Mrs. Kajal**

**&**

**Mr. Paraj Bansidhar Dhurandhar**



**!!प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा!!**

**सौ. नीमा**

**व**

**श्री. जयपाल जयवंत नवलकर**

With best wishes from

**Siddharth**
**and**
**Minal Bhargava**

With best wishes from

**Waseem Khan**

With best wishes from

**Tandem**
**Communication**

With best wishes from

**Ashish Hiramanek**

लेख

# नटखट 'ट'

**✶ अनामिक ✶**

दोन व्यक्तींमध्ये संवाद होण्यासाठी शब्दांची गरज असते. स्वर आणि व्यंजन यांच्या संयोगानेच शब्द बनतो. पण शब्द कसा बनला ह्यासाठी कोणतेही नियम नाहीत. उदा. चपाती किंवा पोळी शब्द कसा बनला हे कोणत्याही नियमानुसार सांगता येणार नाही. एखादा नवीन शब्द जरी बनला तरी तो रूढ होण्यासाठी वा बोलण्यामध्ये जास्तीजास्त वापरला जाणे गरजेचे असते. प्रत्येक शब्दाला जरी अर्थ असला तरी त्यामधील कोणत्या अक्षरावर बोलताना जोर दिला जातो, त्यानुसार त्या शब्दामधून ध्वनित होणारा अर्थही बदलू शकतो. मराठी भाषेमध्ये सर्वसाधारणपणे शब्दाच्या शेवटच्या अक्षरावर जोर देवून बोलण्याची पद्धत आहे.

श्री. अरुण अनंत भालेराव यांनी किर्लोस्कर मार्च २०१२ च्या अंकामध्ये 'ट' ह्या अक्षराबद्दलची निरीक्षणे नोंदवलेली आहेत. त्या निरीक्षणासाठी त्यांनी वा. गो. आपटे यांच्या 'शब्द रत्नाकर' ह्या ग्रंथाचा आधार घेतलेला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार त्या शब्दकोशामधील सर्वात जास्त शब्द 'स' ह्या अक्षराने सुरू होणारे आहेत. 'स' अक्षरापासून सुरू होणारे आणि शेवटी 'ट' अक्षर असणारे एकूण १२८ शब्द आहेत. त्यांची वर्गवारी करता सकारात्मक अर्थ असलेले ३३ शब्द आढळले तर नकारात्मक छटा असणारे ७५ शब्द आढळले. हे प्रमाण ५८.५ टक्के भरते. त्याच बरोबर 'व' अक्षराने सुरू होणारे आणि 'ट' ने शेवट होणारे नकारात्मक छटा असलेले शब्द ५६.७ टक्के एवढे भरले. इतरही काही अक्षरांच्या बाबतीत असा धांडोळा घेतल्यानंतर त्यामधील सुमारे २५००० शब्दांपैकी नकारात्मक छटा दर्शवणाऱ्या शब्दांची संख्या ४६.७ इतकी भरली. ह्या सर्व आकडेवारीच्या आधारे ते असा निष्कर्ष काढतात की उच्चारण पद्धतीमुळे 'ट' शेवट असलेले शब्द नकारात्मक भावनाच विशेष करून दर्शवतात.

मराठी भाषेमध्ये उच्चारण पद्धतीनुसार क, च, ट, त, प अशा पाच वर्गामध्ये विभागणी केलेली आहे. उदा. च, छ, ज, झ ह्या वर्गाचे उच्चारण करताना दातांची विशिष्ट रचना अपेक्षित असते. त्यामुळे त्यांना दंतवर्गीय व्यंजने म्हणतात. प, फ, ब, भ, म यांचा उच्चार करताना ओठ गच्च मिटणे गरजेचे असते. त्यामुळे त्यांना ओष्ठवर्णीय व्यंजने म्हणतात. त, थ, द, ध, न यांच्या उच्चार करताना जिभेचा दातांना स्पर्श होत असतो. तर ट, ठ, ड, ढ, ण यांच्या उच्चारणप्रसंगी जीभ टाळ्याला चिकटवावी लागते. परिणामी प्रत्येक प्रकारचा वर्ण उच्चारताना आपल्या चेहऱ्याच्या स्नायुंचीही हालचाल वेगवेगळ्या प्रकारांनी होत असते. 'मूक बधीर' व्यक्ती ह्याचाच उपयोग करून तुमचे बोलणे समजावून घेत असतात.

श्री. भालेकरांनी त्यानंतर संत तुकारामंच्या गाथेचा अभ्यास केला. गाथेमध्ये 'ट' ने शेवट होणारे २७२ शब्द त्यांना आढळले. तुकाराम हे संत वृत्तीचे असूनही त्यांच्या गाथेमध्ये २७२ शब्दांपैकी ९ च शब्द सकारात्मक अर्थ दर्शवणारे मिळाले. तर १३१ शब्द नकारात्मक अर्थ दर्शवतात. तुकाराम हे संत वृत्तीचे असूनही नकारात्मक अर्थाची टक्केवारी साधारण तेवढीच आहे.

टठडढण ह्या गटातील इतर व्यंजनांचा अभ्यास केला असताही साधारणपणे अशीच आकडेवारी मिळते. 'ठ' ने शेवट होणाऱ्या ३०७ पैकी १९० शब्द म्हणजे ६१ टक्के शब्द नकारात्मक आहेत. 'ड' वर्गात १४४ पैकी १२० म्हणजे ८८ टक्के शब्द नकारात्मक आढळतात. ह्या मुद्याचा थोडा विस्तृत विचार करू या. त्यासाठी आपण 'कर' हा शब्द घेऊ या. ह्या शब्दामधले पहिले अक्षर 'क' हे कायम ठेवून दुसरे 'ट' हे अक्षर 'ट' वर्गातील इतर अक्षर ठेवून बघूया.

त्यानुसार तयार होणारे शब्द कट, कठ, कड, कढ, कण ह्या पाच शब्दांमधील एकही शब्द सकारात्मकता दर्शवत नाही.

आता दुसऱ्या प्रयोगामध्ये 'कट' ह्या शब्दामधील दुसरे 'ट' (शेवटचे) अक्षर कायम ठेवून 'क' हे अक्षर बदलून पाहू या. नवीन शब्द असे असतील. कट, खट, गट, चट, छट, जट, झट, तट, यट, दट, धट, नट, पट, फट, बट, भट, मट, रट, लट, वट, शट, सट आणि हट ह्यामध्ये बहुतेक शब्द नकारार्थी छटा दर्शवणारेच आहेत.

'ट' हे अक्षर शेवटी आल्यामुळेच अशी नकारात्मक भावना चेहऱ्यावर दिसते असे नाही. शब्दाच्या मध्ये आलेल्या 'ट'ने ही अशीच भावना व्यक्त होते. त्यासाठी भालेराव खालील उदाहरण देतात. 'वाट्टेल'ने मधील 'ट' वर जोर दिल्याने ट् अधिक ट जोडामुळे नकारात्मक भावना ठासून जाणवते. त्याचप्रमाणे वाट्टोळे, कंटक, झटक, नौटंकी, पटक, फाटका, बाटगा, लटक, हटक ह्या शब्दांत 'ट' जरी मधेच आलेला असला तरी ह्या शब्दांचे प्रयोग मात्र नकारात्मक भावच दर्शवतात.


**!!प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा!!**



**सौ. भारती**

**व**

**श्री. रसिक कृष्णराव**

**विजयकर**


वेगवेगळ्या वयोगटांत आपला वेगवेगळ्या शब्दांशी परिचय होत असतो. त्यांचा अभ्यास करताना १-५ वर्षे ह्या वयोगटामध्ये परिचित होणारे 'ट' कारान्त काही शब्द असे आहेत. टाटा, टक्कल, टणकन, टॅक्सी, टेलिफोन, टीव्ही, टोमॅटो, टाय, टायर, टॉवेल, टाळी, टिकली, टोपी, टुकटूक, टिल्लू ह्या शब्दांमध्ये नकारात्मक शब्द फारसे परिचीत होत नाहीत. टकल्या, टक्कर, टिल्लू असे काहीच शब्द ह्या वयात परिचीत होतात पण ५ ते १० ह्या वयोगटात नकारात्मक वाटणारे शब्द पहा. टपली, टाईमपास, टाळाटाळ, टाकाऊ, टिंगल, टिनपाट, टिवल्या बावल्या, टुरटुर, टोला, टोकणे. तसेच (ठोकणे) टिकोजीराव अशा प्रकारच्या ५४ शब्दांचा परिचय होतो.

मोठेपणी आपली आणखी काही शब्दांची ओळख होते. ते शब्द पहा. टक्कर, टग्या, टंचाई, टर, टरकावणे, टराटर, टरफल, सिद्धहस्त, टवळी, टवाळकी, टवाळ, टाळके, टिकोजी, टिंगल, टिच्चून, टीका, टुमणे, टोकणे, टोणगा, टोळभैरव, टोलवणे, टग्या, टचटचीत, टोमणा, टोपी घालणे, टोचणी, टंचाई, टारगट ह्यासारखे अनेक शब्द तुमच्या वयानुसार, अनुभवानुसार तुमच्या वापरात येतात. तर काही तरुणांचा उल्लेख पोरटा/टी, करंटा, दिवटा, कारटा/टी, सैराट, मोकाट अशा खास विशेषणांनी होत असतो. मानवी स्वभावांचे वर्णन करणारे (नकारात्मक) शब्द पण असेच आहेत. बावळट, धांदरट, भोळसट, पोरकट, अर्थवट, तिरसट.

रोजच्या व्यवहारातही आपण खात असलेल्या पदार्थांची विशेषणेपण पहा. तिखट, आंबट, खारट, तुरट, पाणचट, तेलकट, मातकट, जळकट ती सर्व

---

## प्रभुतरुणास भाऊबीज

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. सुनेत्रा वि. प्रधान स्मरणार्थ विजय प्रधानकडून | १००१/- |
| २) | सौ. प्रतिमा विनोद प्रधान | ५००/- |
| ३) | श्री. उर्मील विजय धैर्यवान | १२१/- |
| ३) | सौ ऐशाना आलोक प्रधान | १००/- |
| ४) | सौ. ऐश्वर्या तेज वेलकर | १००/- |

*

दोषदर्शकच आहेत. 'ट' ऐवजी 'ड' अंती असलेली चव ही 'कडू'च आहे.

तसे पाहिले तर 'इष्ट' हा प्रत्यय (इष्ट - योग्य) चांगला भाव दर्शवतो. जसे चविष्ट, स्वादिष्ट, तुष्ट. पण हाच प्रत्यय लावलेले असेही काही शब्द आहेत जसे खाष्ट, अनिष्ट, वितुष्ट, अरिष्ट, अशिष्ट जे नकारात्मक भावच दाखवतात.

आर्थिक व्यवहारातही फायदा सकारात्मक आहे. पण तोटा, घाटा, तंटा, किंवा कट, खोट, तूट, लूट, काटा हे शब्द नकारात्मकच वापरले जातात.

वैवाहिक जीवनातही 'पाट' म्हणजे दुसरे लग्न असते आणि 'घटस्फोट' म्हणजे शेवटच असतो.

सुखातील म्हटल्याप्रमाणे 'ट' सदृष्य उच्चार करताना चेहऱ्याचे स्नायूच तसा भाव दाखवीत असतात. म्हणून इंग्रजीमधील 'शिट' हा शब्द असतो व सेपरेट, शिट, शूट, शाऊट, स्लाइट, स्पिट, स्लॉट हे शब्द उच्चारताना चेहऱ्यावरचे भावही तसेच दिसत असतात ना?

अरुण अनंत भालेराव यांनी त्यांच्या लेखामध्ये अशा असंख्य शब्दांची जंत्री दिलेली आहे. एवढेच नव्हे तर व्याकरण, ध्वनीशास्त्राच्या दृष्टीकोनामधूनही विवेचन केलेले आहे. विस्तारभयास्तव त्यापैकी थोडाच भाग वाचकांसमोर सादर केलेला आहे.

'ट' अक्षराने अंत होणारे सगळेच शब्द नकारात्मक भावना दर्शवत नसतात. सहज विचार मनात आला म्हणून तुमच्या समोर मांडतो आहे. आपले सर्व शेजारी गुजरात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, गोवा, अशा नावांचे आहेत. पण फक्त आपलेच राज्य 'महाराष्ट्र' असे का असावे?

## वात्रटिका

### चिमणराव

चिमणराव कधीचेच फोटोत बसलेत जाऊन
तिथून आपले सर्वांकडे बघतात छान हसून
बायको म्हणते, ''भांडून-भांडून थकलात का हो भारी?
बोला काही, चालेल मला शिव्या घातल्यात तरी.''

**-डॉ. सुमन नवलकर**


**!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!**



**सौ. नीलन व श्री. दीपक माधव धैर्यवान**

## प्रभुतरुणास देणगी

⁕ श्रीम. मीना रमेश जयकरकडून त्यांची नात कु. दीपश्री (श्रद्धा) लोकेश प्रभाकर बारावी उत्तम रीतीने उत्तीर्ण झाल्याबद्दल रु. १०००/-

⁕ कु. अनुष्का आशीष नवलकर हिच्या परीक्षेतील यशाप्रीत्यर्थ सौ. आणि श्री. आशीष नवलकर याजंकडून रु. ५००/-

⁕ श्री. प्रताप मोतीराम वेलकर यांजकडून रु. १००/-

⁕

## परीक्षेतील सुयश

**एच. एस.सी. (बारावी)**

कु. दीपश्री (श्रद्धा) लोकेश प्रभाकर - ८४.४६% ५४९/६५०

**बी. एस.सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज, मुंबई विद्यापीठ)**

कु. अनुष्का आशीष नवलकर - ओजीपीए ९.८२ टक्के

⁕

## शुभेच्छा

श्री. रंजन खंडेराव विजयकर यांनी १६-९-१९ रोजी वयाची पंच्याहत्तरी गाठली. सत्कार्यरत श्री. रंजन यांचा पुढील आयुष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

⁕

## अभिनंदन

⁕ पद्मश्री सदाशिव गोरक्षकर यांनी भारतीय वस्तू संग्रहालय क्षेत्रात केलेल्या अतुलनीय कामगिरीस अभिवादन म्हणून 'पद्मश्री सदाशिव गोरक्षकर जीवनगौरव पुरस्कार' आणि ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या अभ्यासाबरोबर ऐतिहासिक पुरातत्वीय स्थळांच्या उत्खननांचे मूल्यमापन या क्षेत्रात पद्मश्री श्री. मधुकर केशव ढवळीकर यांनी दिलेल्या भरीव योगदानाबद्दल 'पद्मश्री मधुकर ढवळीकर शिष्यवृत्ती योजना' जाहीर करण्यात आणल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. विनोद तावडे यांनी २१ सप्टेंबर २०१९ रोजी दिली. सन २०२० पासून एक वर्ष ज्येष्ठ संशोधकास 'पद्मश्री सदाशिव गोरक्षकर जीवनगौरव पुरस्कार' तर पुढील पद्मश्री मधुकर ढवळीकर शिष्यवृत्ती या क्रमाने ही योजना राबविण्यात येईल. पद्मश्री सदाशिव गोरक्षकर जीवन गौरव पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, स्मृतीचिन्ह व रोख रक्कम पाच लक्ष असे असेल. पद्मश्री सदाशिव गोरक्षकर यांचे वारसाजतन, पुरातत्त्वशास्त्र आणि वस्तु संग्रहालय शास्त्र या क्षेत्रातील योगदान अतिशय मोलाचे आहे. ते छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम) आणि औंध (जि. सातारा) येथे संचालक होते. संग्रहालय व्यवस्थापन, पुरातत्व वारसा, संरक्षण, कला, वास्तुविद्या, प्राणीशास्त्र या विषयांचे तज्ञ होते. त्यांना भारतातील संग्रहालयशास्त्राचे 'भीष्म पितामह' असेही संबोधले जाते. 'राजभवन इन महाराष्ट्र', 'ॲनिमल्स इन इंडियन आर्ट', 'कालिदास ॲण्ड द महायोगी ऑफ घारापुरी', 'द मेरीटाईम हेरिटेज ऑफ इंडिया', 'डॉन ऑफ सिव्हिलायझेशन इन महाराष्ट्र' अशी त्यांनी पुस्तके लिहिली. आपल्या कारकिर्दीत संग्रहालय व्यवस्थापन शास्त्राची नवी परिमाणे परिभाषित केली. तसेच विविध कार्यक्रम, उपक्रम आणि प्रदर्शने आयोजित करून छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाला जागतिक नकाशावर मानाचे स्थान मिळवून दिले. सन २००३ साली भारत सरकारची 'पद्मश्री' मिळविणारे ते पहिले वस्तुसंग्रहतज्ञ होते. पुरातत्ववेत्ता, कलासमीक्षक, संग्रहालयशास्त्र तज्ञ अशा विविध भूमिका त्यांनी गाजवल्या.

महाराष्ट्राने डॉ. गोरक्षकर यांच्या निधनानंतर त्यांची उचित आठवण रहावी यासाठी त्यांच्या नावे जीवनगौरव पुरस्कार जाहीर केला. खरे तर, महाराष्ट्र शासनाचेच अभिनंदन.

⁕ श्री माताजी कनकेश्वरी परिवार, मुंबईतर्फे दरवर्षी थाटामाटात नवरात्रोत्सव साजरा होतो. त्याला श्री. तुषार अनंत कीर्तिकर, श्री. निरंजन अनंत कीर्तिकर, सौ. अनघा अमोघ कीर्तिकर, सौ. आश्लेषा महेन्द्र कीर्तिकर यांचे आर्थिक पाठबळ आणि स्वयंसेवा लाभते. याही वर्षी २९-९-१९ ते ७-१०-१९ या काळात हा महोत्सव विलेपार्ले येथील राजपुरिया बागेत साजरा होईल. शुक्रवार दिनांक ४-१०-१९ रोजी किर्तीकर परिवारातर्फे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. किर्तीकर परिवाराच्या ह्या मनोभावे सेवेस प्रभुतरुणाच्या मनोमन शुभेच्छा!

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र**
स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह ॲंड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : २६७८ ०० ४४